पाक्षिक

समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी

# द पीपल्स पोस्ट

स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : ६ अंक ३ रा । मूल्य : रु. ४० । दिनांक : १ ते १५ ऑक्टोबर २०२३



## ‘एक देश - एक निवडणूक’

एक देश–एक निवडणूक : लोकशाही मोडीत काढण्याचे षड्यंत्र! – चेतन शिंदे

एक देश–एक निवडणूक : बहुविधतेला मारक – बी.जी. वाघ

‘एक देश–एक निवडणुकीचा’ हेतू एकपक्ष एकनेता हुकूमशाही! – प्रा.एच.एम. देसरडा

‘एक देश–एक निवडणूक’ : संघाचा देशहितविरोधी कार्यक्रम! – डॉ. भालचंद्र कांगो

नि:पक्ष पत्रकारितेवरील कलंक – अनंत बागाईतकर


जगाला, अहिंसा, सत्य आणि सहिष्णुता
याची शिकवण देणाऱ्या
राष्ट्रपिता
महात्मा गांधी
यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन
अभिवादक
पाक्षिक
समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी
द पीपल्स पोस्ट

पाक्षिक समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी

# द पीपल्स पोस्ट

स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : ६
अंक ३ रा । मूल्य : रु. ४० । दिनांक : १ ते १५ ऑक्टोबर २०२३

**संपादक**
चेतन शिंदे

**मांडणी व सजावट**
गायत्री ग्राफिक्स्

**संपादकीय पत्रव्यवहार**
द पीपल्स पोस्ट कार्यालय
सीटीएस नं. १४४, मिल कॉर्नर छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, मिल कॉर्नर, औरंगाबाद – ४३१००१

**संपर्क**
८८८८५४१८२२ । ९५८८४५११५१

E mail : thepeoplespost2014@gmal.com

(या अंकातील सर्व लेखांचे हक्क सुरक्षित)
* अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक सहमत असलेच असे नाही.
* अंकातील कोणताही मजकूर पूर्वपरवानगी शिवाय वापरता येणार नाही.

**ऑनलाईन समन्वयक**
प्रतीक माधुरी

द पीपल्स पोस्ट    8888541822

- **जाहिरात विभाग संपर्क**
९८२१४४५४०९ / ८८०५१५१४५२

अंकाची वार्षिक वर्गणी ८००/– रुपये फक्त

- **द पीपल्स पोस्ट बँक अकाउंट डिटेल्स्**

द पीपल्स पोस्ट : SBI Bank
शाखा : समर्थनगर, औरंगाबाद
AC No. 37856373419
IFSC CODE : SBIN0007919
MICR No. : 431002010

ऑनलाईन पेमेंटसाठी येथे स्कॅन करावे

वर्गणीचा धनादेश, धनाकर्ष द पीपल्स पोस्ट या नावाने काढावा

**संपादकीय :** काय, आरक्षण निघालंय अराजकतेकडे? – ४ / एक देश–एक निवडणूक – **भास्कर नाशिककर** – ६ / एक देश–एक निवडणूक : लोकशाही मोडीत काढण्याचे षड्यंत्र! – **चेतन शिंदे** – १० / एक देश–एक निवडणूक : बहुविधतेला मारक – **बी.जी. वाघ** – १२ / 'एक देश–एक निवडणुकीचा' हेतू एकपक्ष एकनेता हुकूमशाही! –**प्रा. एच.एम. देसरडा** – १५ / 'एक देश–एक निवडणूक' : संघाचा देशहितविरोधी कार्यक्रम! – **डॉ. भालचंद्र कांगो** – १८ / **दिल्ली दरबार :** भाजपसाठी हिंदुत्व हाच खरा खेळ! – **विचक्षण बोधे** – १९ /**रेषा आणि फटकारे :** लोकशाहीच्या मुखवट्याआडून बेबंदशाही! – **संजय पवार** – २२ / निःपक्ष पत्रकारितेवरील कलंक – **अनंत बागाईतकर** – २४ / अंधश्रद्धा निर्मूलन, धर्मचिकित्सा आणि धर्मनिरपेक्षता : आव्हान आणि अपेक्षा – **अविनाश पाटील** – २७ / अखंडांमधून समजलेले म. फुले – **प्रा. सुभाष वारे** – ३० / **ग्रंथ परिचय :** महाराजा सयाजीराव आणि भारताचा स्वातंत्र्य लढा – **सुरक्षा घोंगडे** – ३३ / **कोणता भारत :** सरकारी शाळा निघाल्या भांडवलशाहीच्या दावणीला । मध्य प्रदेशातील गाईंचे रोज 'रस्ता रोको' आंदोलन – **तात्या विंचू** – ३६ / **कविता :** गांधी – **किरण शिवहर डोंगरदिवे** । सरणावरच पेटणार का? – **निशांत गुरू** । नाही असे नाही – **श्रीपाद भालचंद्र जोशी** – ३९ । खांब – **रामु सप्रे** – ४०

हे पाक्षिक, मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक चेतन भीमराव शिंदे यांनी मेत्ता प्रिंटर्स सीटीएस नं. १४४ मिल कॉर्नर, छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, औरंगाबाद ४३१००१ येथे छापून फ्लॅट नंबर ए–४०३, जीएन नं. १०/२, ग्लोरियासिटी, एमएसईबी पावर हाऊसजवळ पडेगाव, औरंगाबाद ४३१००१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. * संपादक चेतन भीमराव शिंदे (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांची राहील) सर्व वादविवाद औरंगाबाद जिल्हा न्यायालयीन कक्षेत. क्र. MAHMAR/2018/76460

संपादकीय

# काय, आरक्षण निघालंय अराजकतेकडे?

सर्वप्रथम एक गोष्ट समजून घ्यायला पाहिजे आणि ती म्हणजे आरक्षण सामाजिक न्यायासाठी आणि जातिअंतासाठी आहे. समाजात सर्वच आघाड्यांवर वर्षानुवर्षे पिळल्या गेलेल्यांसाठी आहे, ज्यात या वर्गाच्या विकासासाठी तरतूद म्हणून राज्यघटनेत आरक्षणाची तरतूद आहे. शिक्षण आणि नोकऱ्यांत ती महत्त्वपूर्ण ठरलेली आहे. याशिवाय आर्थिक तरतुदींसह अन्य गोष्टींचा समावेशही त्यात आहे. पिळवणूक होते ती सामाजिक (जातिभेद) धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक इ. क्षेत्रात. ज्यांचा आर्थिक क्षेत्रात विकास झालेला नाही, त्यांचा तो करण्यासाठी घटनेतच तरतुदी आहेत. पण त्या वेळोवेळी वापरल्या गेलेल्या नाहीत. ओबीसींचा जातीय स्तर एस.सी., एस.टी.पेक्षा थोडा वरचा असला तरी सामाजिक मागासलेपण त्यांच्याही वाट्याला काही प्रमाणात आले आहे. मंडल आयोगाने ओबीसींच्या विकासासाठी राखीव जागांच्या वर्तुळात त्यांना आणून सोडले. समाजातील एक मोठा (लोकसंख्येने) वर्ग राखीव जागांच्या वर्तुळात आला. या वर्गात कुणबीही आहेत. म्हणजे, कुणबी मराठा आणि मराठा कुणबीही आहेत. ज्यांच्याकडे कुणबी असण्याचा दाखला होता त्यांनाही सामावून घेण्यात आले. यात एक गंमत होती आहे. काहींच्याकडे कुणबी असल्याचा दाखला आहे; पण ज्यांना सामाजिक प्रतिष्ठा मराठा समाजासारखी आहे. काहींकडे मराठा असल्याचा दाखला आहे; पण त्यांचे जीवन कुणब्यासारखे आहे. काही मूळ मराठाच आहेत; पण त्यांची आर्थिक स्थिती खालावली असल्याने ते विकास करून घेऊ शकत नाहीत. त्यांनाही आरक्षण हवे आहे. म्हणजे सामाजिक मागासलेपणाकडून आर्थिक मागासलेपणाकडे आरक्षणाला सरकवण्यास भाग पाडले जात आहे. मुळात एखादा माणूस समाजात प्रतिष्ठित आहे की नाही हे मोजण्याचे साधन आर्थिक असू शकत नाही. असेल तर ते उप असते. मुख्य साधन असते ते, तो त्या माणसाचा सामाजिक दर्जा. हा दर्जा तो माणूस कोणत्या जातीत आहे यावरून ठरवला जातो. शूद्र कितीही श्रीमंत असला किंवा सत्तेत असला तरी त्याची धार्मिक प्रतिष्ठा शून्य असते. उपपंतप्रधान असलेल्या शूद्र जगजीवनराम यांच्या हस्ते झालेल्या पुतळ्याचे अनावरण सवर्णांनी बेकायदेशीर ठरवले आणि गोमूत्र टाकून पुतळा शुद्ध करण्यात आला. अशा अनेक गोष्टी आहेत. खुद्द शाहू महाराजांनाही शूद्र ठरवून दत्ताच्या वाडीत मंदिरप्रवेश नाकारण्यात आला होता. बॅरिस्टर असतानाही डॉ. बाबासाहेबांना तळ्यातील पाण्याला स्पर्श करण्यास आणि काळाराम मंदिरात प्रवेश करण्यास मज्जाव करण्यात आला होता. तुमचा आर्थिक, राजकीय आणि शैक्षणिक विकास किती आहे यापेक्षा तुमची जात कोणती आहे याला अजूनही महत्त्व आहे. म्हणूनच सामाजिक पिळवणूक या सूत्राला महत्त्वाचे मानले गेले होते. आजही अट संघर्ष करून सैल केली जात आहे आणि आर्थिक निकषाकडे ती नेली जात आहे.




सामाजिक मागासलेपण ठरवण्यासाठी रात्रीत समित्या नेमल्या जात आहेत.

जालन्यातील आंदोलनामुळे महाराष्ट्र पुन्हा एकदा राजकीय आणि सामाजिकदृष्ट्या हादरला. सर्व मराठ्यांना सरसकट कुणबी असल्याचे दाखले द्या आणि त्यातही मराठवाड्यातील कुणब्यांना निजामाच्या काळात नेऊन कुणबी ठरवा, अशी मागणी आली. सगळे राजकारणी आंदोलनकर्त्यांकडे धावले आणि मागण्या मान्य करण्याचा झपाटा सुरू केला. शिष्टमंडळावर शिष्टमंडळे पोहोचली. आंदोलनकर्त्यांचे हे मोठे यश म्हणावे लागेल. कारण त्यांनी जीव पणाला लावला होता. जाळपोळ, दंगल, गोळीबार अशा अप्रिय गोष्टी घडल्या. संख्येने आणि शक्तीने मोठा असलेला समाज आक्रमक बनला होता. आंदोलन करणारे ज्या समाजातले आहेत, त्यांचेच नेते मोठ्या प्रमाणात सत्तेवर आहेत. फडणवीसांसारख्या बलदंड नेत्याचा अपवाद वगळता बहुतेक नेते कुणबी, मराठा समाजातील आहेत. अनेक वर्षांपासून आपण हेच राजकीय चित्र घेऊन जगतो आहोत. महाराष्ट्रात विकास पावलेली आणि शंभराहून अधिक काळ सत्तेत असलेल्या घराण्यांची आणि त्यांच्या जातींची थोडी माहिती घेतल्यास लक्षात येते, की महाराष्ट्र कोण चालवतो आहे आणि शिक्षणापासून दूध-पाण्यापर्यंत बहुतेक गोष्टी कोणाच्या आहेत. अर्थात, सारेच मराठे, सारेच कुणबी श्रीमंत आहेत असे नव्हे. सत्ता काही घराण्यांतच अडकली. तिचे विकेंद्रीकरण झाले नाही. त्यामुळे तेथेही एक वरचा आणि एक खालचा वर्ग तयार झाला आहे. अन्य काही जातींमध्येही असेच घडते आहे. बऱ्याच जातींमध्ये चार-पाचच नेते पन्नास वर्षांपासून सत्तेत लोळत आहेत. तेथेही वर्गीय पातळीवर खाल-वर तयार झालेच आहे. एकूणच आपल्या देशातील केंद्रीकरणात अडकलेल्या सत्तेचा हा दोष आहे. पण या सर्व गोष्टी लक्षात घ्यायला कोणी तयार होताना दिसत नाही आणि सर्व प्रकारच्या विकासाचा मार्ग फक्त आणि फक्त आरक्षणातूनच जातो असे सूत्र तयार करण्यात आले. एकेका सरकारी नोकरीसाठी चाळीस हजार मुले अर्ज करतात, यातच आरक्षणाच्या मर्यादा स्पष्ट झाल्या. खिचडी

खाऊन शिकणारा एक वर्ग आणि डोनेशन भरून सिलिकॉन व्हॅलीत जाणारा एक वर्ग यातच आरक्षणाची मर्यादा स्पष्ट होते. आरक्षणाचे सूत्र काही देण्याच्या बाबतीत सरकार नागवे झाले आहे आणि याच काळात सामाजिक उद्रेक भडकायला लागले आहेत. मनुस्मृतीत उच्च मानल्या जाणाऱ्या ब्राह्मणापासून ते कुडमुड्या जोशांपर्यंत सर्वांच्याच मनात आरक्षण म्हणजे जादुची कांडी आहे, हे बिंबवण्यात राजकारणी यशस्वी झाले आहेत. पाटीत भाकऱ्याच नसताना किंवा त्या कमी असताना लांब लांब पंगती बसवण्याचा हा राजकीय खेळ आहे. विकासाचे अन्य मार्ग काढण्यात राजकारण्यांना वेळ नाही किंवा त्यासाठीची अक्कल नाही म्हणून हा स्वस्त मार्ग अवलंबला जात आहे. मागेल त्याला, संघर्ष करेल त्याला आरक्षण असे नवे सूत्र तयार करण्यात आले आहे. खाजगीकरणाने कल्याणकारी राष्ट्राची सर्व नखे आणि दात काढून घेतले आहे. बोळक्या तोंडाचे सरकार आता फक्त शिष्टमंडळे पाठवण्याचे आणि सरकारी वाहनांच्या ढुंगणावर खोट्या कल्याणकारी योजना लिहिण्यात धन्यता मानत आहे. या घोषणा कितीही वाचल्या तरी नग्नता काही लपत नाही.

आपण मागास होतो आणि आहोत हे सिद्ध करण्याची स्पर्धा चालू आहे. डॉ. बाबासाहेबांनी म्हटल्याप्रमाणे, एखादा समाज इतिहासात काय होता याबरोबरच तो वर्तमानात काय आहे, याचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. मंडल आयोगानेही हेच सूत्र बऱ्यापैकी वापरले होते. आपल्याकडे बरेच आदिवासी राजे होते. आजही आदिवासी भागात त्यांचे वारसदार आहेत. इतिहासात राजे असलेल्यांच्या वारसांना वर्तमानात आरक्षण का, असा प्रश्न कोणी विचारणे योग्य ठरणार नाही. कारण सर्व आदिवासी व्यवस्थेने नागवले आहेत. समाजाच्या डोक्यावर बसलेला ब्राह्मणही कोणे एका काळी पशूपालक होता. म्हणून त्यांना आज ओबीसी ठरवणे योग्य नाही. आज तो मनुस्मृतीनुसार जगाचा मालक आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या मावळ्यांना आरक्षण का, असेही विचारणे योग्य होणार नाही. निजाम काळात आम्ही कुणबी होतो असे सांगणारे खोटे आहेत, असे आपण समजू शकत नाही. पण एवढ्या एका कायद्यावर आपण लढाया करणे उचित आहे का, हे पाहणेही महत्त्वाचे ठरणार आहे. सरसकट मराठ्यांना कुणबी समजणे हे सरसकट मराठ्यांना तर रुचणारे आहे का? कुणबी बिनबी ही भानगड बाजूला ठेऊन सरसकट मराठ्यांना आरक्षण द्या, अशी मागणी त्यांनी लाखोंचे मोर्चे काढून यापूर्वीच केली आहे. या सर्व चक्रांचा अर्थ एकच होतो आणि तो म्हणजे देशातल्या सर्वच आर्थिक मागासांना (म्हणजे त्यात ब्राह्मणही आलाच.) आरक्षण द्या... काही राज्यांत ब्राह्मणांसाठी महामंडळे काढण्यात आली आहेत. काही ब्राह्मण पुजाऱ्यांना मासिक मानधन चालू आहे. कर्नाटकात पुजाऱ्याच्या लग्नासाठी मदत मिळते. हा समाज स्वभावाने सौम्य राहिलेला नाही. कुणा मंत्र्याच्या थोबाडीत मारा, कोण्या मंत्र्याचे मुंडके उडवा, कोण्या स्त्रीचे नाक कापा अशी भाषा तोही करू शकतो, करतो आहे. मुद्दा हा आहे, की आरक्षणाच्या नावाने जाती जाग्या होत आहेत, की अहंम जागा होत आहे? जर अहंम जागा होत असेल तर तो सामाजिक अराजकतेकडे वळतो. जालन्यातले आरक्षण बाहेर पडले आणि अन्य जाती रात्रीत पुन्हा संघटित होऊ लागल्या आणि आक्रमक भाषाही बोलू लागल्या. कोण्या जातीने कोण्या मंत्र्यावर येळकोट म्हणत भंडारा उधळला आणि विधानभवनाला घेराव घालण्याची घोषणा केली. अन्य जातीने महामोर्चे काढले. महापंचायती घेतल्या. अजून कोणी तरी काही काही भरणार आहे. मध्येच कोणी तरी आत्महत्या केल्याची बातमी आली. मराठ्यांचेही आंदोलन चालू आहे. अजून काही होणार आहे. आंदोलकांच्या ओठांवर आरक्षणाची भाषा असली तरी प्रत्यक्षात एक समूह विरुद्ध दुसरा समूह अशीच टक्कर होणार आहे. सरकार प्रत्येकाला खूश करण्यासाठी आणि मतपेट्या सुरक्षित ठेवण्यासाठी रात्रीत निर्णय घेते आहे आणि लोकांच्या दारीही जाते आहे. महाराष्ट्राला पुरोगामी करण्यास निघालेल्या आणि मुठीत हिंदुत्वही बाळगणाऱ्या सरकारची कोंडी होते आहे, असं कोणीतरी म्हणेल. पण तेही पूर्ण खरे असणार नाही. दुष्काळ, बेकारी, ताणतणाव यांसारख्या ज्वलंत गोष्टींवरून समाज आता आरक्षणाकडे वळला आहे. आरक्षण हेच संजीवनी आहे असे त्याला राजकारण्यांनीच सांगितले आहे. मराठा आणि ओबीसींची राजकारणात टक्कर होऊ नये म्हणून एका चतूर नेत्याने ओबीसींच्या प्रवर्गात मराठ्यांसाठी स्वतंत्र प्रवर्ग तयार करण्याची सूचना केली. एका भाड्याच्या घरात दुसरा भाडेकरू, अशी ही तऱ्हा आहे. दोन भाडेकरू गुण्यागोविंदाने नांदतील काय, याची खात्री कोणी देऊ शकत नाही. एकचा ढोल दुसऱ्याला ऐकू जाईल, एकाचा खणखणाट पहिल्याला ऐकू जाईल. जर बछडी, ऊंट समजून वर्ग तयार केला, तर वाघाच्या बछड्यांनी डरकाळी फोडायला सुरुवात केल्यावर किंवा ऊंटाने तंबूच उचलल्यावर हे ओबीसी काय करतील, याचे भाकीत करता येत नाही.

शेवटचा मुद्दा म्हणजे, राज्यघटनेबाहेर केलेल्या तडजोडी आणि राजकारणाभिमुख निर्णय सर्वोच्च न्यायालयात टिकतील काय आणि आजवरचा इतिहास काय आहे, हा प्रश्न शिल्लक उरतोच. कोटा वाढवण्यासाठी घटनादुरुस्ती करावी लागेल. ती एक दीर्घ प्रक्रिया आहे. केंद्र सरकारच्या हातात आहे. भाजपची राज्ये मोदींना अडचणीत आणणार नाहीत. ओबीसींना धक्का न लावता फडणवीस मराठ्यांना आरक्षण कसे देणार आणि ते टिकणार का, हा प्रश्न आहे. राज्यात आणि केंद्रात एवढे कायदेतज्ज्ञ आहेत आणि त्यांच्यापेक्षा आघाडीत आणि बाहेर असलेल्यांची डोकी अधिक चालणार आहेत काय? अगोदर शिष्टमंडळ, मग शिष्टमंडळ आणि सरकारशी चर्चा, मग समिती, मग सर्वपक्षीय चर्चा, मग समित्यांना मुदतवाढ, मग कोर्टबाजी, मग निवडणुका, मग पुन्हा आंदोलने असा हा खेळ सुरू होणार आहे, होत राहील. पूर्वीही असाच होत होता. सीमा प्रश्नाचे नेमके तसेच चालू आहे. प्रश्न एकच उरतो आणि तो म्हणजे फुले, शाहू आणि आंबेडकर यांच्या विचारांची तयार झालेली महाराष्ट्रातील वीण उसवू नये याची काळजी घ्यायला हवी. काही दिवसांपूर्वी महाराष्ट्रात ती कोल्हापूरपासून अनेक ठिकाणी उसवली आहे. राजकारणाने धगीवर पोळ्या भाजून घेण्याचे कामही मोठ्या कौशल्याने केले आहे. कोल्हापूरच्या महासंघामध्ये हा विषय सोडून कुणाला पाडायचे आणि गाठायचे यावर चर्चा झाली. लोक हो काही करा, पण अराजकतेकडे झुकू नका किंवा राजकारणाला तसे करू देऊ नका. अग्रलेख लिहिल्यानंतर पुढे काय घडणार, याची कल्पना ना आम्हाला आहे ना तुम्हाला आहे.

●●●

# एक देश - एक निवडणूक

**सरकारी खर्चाचा बागुलबुवा उभा करून 'एक देश-एक निवडणूक'चा मुद्दा पुढे रेटण्याऐवजी, त्यासाठी अनुकूल वातावरण आणि राजकीय पक्षांची तयारी करण्याचा आटापिटा करण्याऐवजी निवडणूक प्रक्रियेत सुधारणा कशा करता येतील, आचारसंहितेच्या पालनात कशी कठोरता आणता येईल, याचा विचार केला पाहिजे. शिवाय, निवडणूक सुधारणा करण्यासाठी काय काय उपाययोजना कराव्यात, कोणते नियम, कायदे आणखी कडक करावेत, यावर काम करणे रास्त ठरू शकते.**

**भास्कर नाशिककर**



आगामी लोकसभा निवडणुकीचे वेध सर्वच राजकीय पक्षांना लागले आहेत. २०२४ मध्ये होणारी निवडणूक केंद्रातील सत्ताधारी भारतीय जनता पक्ष आणि त्याच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) आणि काँग्रेससह विरोधी पक्षांच्या नव्याने स्थापित झालेल्या इंडिया आघाडी यांच्या दृष्टीने राजकीय अस्तित्वासाठी महत्त्वाची ठरणार आहे. भाजप आणि विशेषतः मोदी पुन्हा सत्तेवर आल्यास काय, असेही प्रश्न विचारले जात आहेत. इंडिया आघाडीच्या तीन बैठकांत आश्वासक विरोधी बळ वाढत आहे, हे लक्षात घेऊन एनडीएच्या रजतमहोत्सवाचा विसर पडलेल्या भाजपने त्यात पुन्हा बळ भरत पक्षीय संख्यात्मकदृष्ट्या आपण इंडिया आघाडीवर मात केल्याचे दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. आकर्षक घोषणाबाजी, जनतेचे लक्ष सातत्याने चर्चेकडे वेधून तिला त्यात गुंतवून ठेवायचे आणि मूळ प्रश्नांकडून तिचे लक्ष विचलीत करायचे, हा देशातल्या सत्ताधाऱ्यांचा फंडा राहिलेला आहे. स्वतः सातत्याने इलेक्शन मोडमध्ये राहायचे आणि त्यासाठी व्यूहरचना करत जाळे फेकत राहायचे, असा त्यांचा प्रयत्न राहिला आहे. इंडिया आघाडीची बळकटी मुंबईतील बैठकीतून दृष्टीपथात येत असतानाच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने संसदेच्या विशेष अधिवेशनाची घोषणा केली. त्याबरोबरच वन नेशन-वन इलेक्शन किंवा एक देश-एक निवडणूक या मुद्यावर चर्चा घडवून आणणे सुरू केले. माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद, गृहमंत्री अमित शहा, माजी कॅबिनेट सचिव सुभाष कश्यप, पंधराव्या वित्त आयोगाचे माजी अध्यक्ष एन.के. सिंग, ख्यातनाम विधिज्ञ हरीश साळवे, दक्षता आयोगाचे माजी प्रमुख कोठारी, ज्येष्ठ नेते गुलाम नबी आझाद अशा आठ जणांची समिती नेमली. देशाच्या इतिहासात पहिल्यांदाच राष्ट्रपतीपदावर राहिलेल्या व्यक्तीच्या अध्यक्षतेखाली अशी उच्चस्तरीय समिती नेमली गेली. या समितीत सहभागास लोकसभेतील काँग्रेसचे नेते अधीर रंजन चौधरी यांनी नकार दिल्याने या समितीत विरोधकांचा सहभाग राहिलेला नाही. ही समिती अशा प्रकारे निवडणूक प्रक्रिया राबवण्यासाठीच्या विषयावर अभ्यास, चिंतन करून, तसेच ही प्रक्रिया राबवण्यासाठी कोणकोणत्या कायदेशीर आणि घटनात्मक बाबी आड येऊ शकतात आणि त्यावर कशी मात करता येईल, असे सुचवण्याचे काम करेल. समितीची पहिली बैठकही कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली आहे.

### इंडिया की भारत आणि सनातन

गेल्या काही दिवसांत जी-२० देशांची शिखर परिषद दिल्लीत पार पडली. त्या गदारोळातच देशाच्या नावाचा उल्लेख इंडिया की भारत करायचा, यावरून चर्चा घडू लागल्या. राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू यांनी जी-२० परिषदेला राष्ट्रप्रमुखांना 'प्रेसिडेंट ऑफ भारत' नावाने निमंत्रण पाठवल्याने चर्चेला तोंड फुटले आहे. दुसरीकडे, सनातनच्या मुद्यावरून तामिळनाडूतील द्रविड मुन्नेत्र कळघमचे (द्रमुक) नेते उदयनिधी स्टॅलिन यांनी केलेले विधान, त्यावरून भाजपने उठवलेली राळ आणि त्यांच्या विधानाला मुख्यमंत्री एम.के. स्टॅलिन यांनी दिलेले बळ यामुळे आणखी नवा वाद रंगू लागला आहे. मणिपूरमधील हिंसाचार, अडानी समूहाची गुंतवणूक आणि त्यातील व्यवहारातील अनियमिततेचा उपस्थित होणारा मुद्दा यावरील लक्ष दुसरीकडे वळवण्यासाठी एक देश-एक निवडणूक मुद्दा पुढे केला की काय, अशी शंका विचारली जात आहे. त्यात सनातनच्या आयत्या मिळालेल्या मुद्याने भर घातली आहे. तथापि, समितीच्या स्थापनेमुळे एक देश-एक निवडणूक विषय आणखी पुढे जाऊ शकतो, हेही तितकेच खरे. एक देश, एक करप्रणाली, एक देश, एक रेशनकार्ड अशा आकर्षक घोषणा हे मोदी सरकारच्या कारभाराचे वैशिष्ट्य राहिले आहे. तथापि, सगळ्याच

बाबी जर केंद्रात सत्तेवर असलेल्या व्यवस्थेच्या हाती केंद्रित झाल्या, तर संघराज्य व्यवस्थेमध्ये असलेल्या राज्यांच्या हातात सत्ता कितपत राहणार आहे, राज्याराज्यातील सरकारांनी कारभार म्हणजे काय करायचे, की केंद्राच्या योजना त्यांच्या आणि स्वतःच्या निधीतून राबवायच्या आणि जीएसटीच्या परताव्यासाठी हात पसरायचे, हेही प्रश्न राजकीय विचारवंत विचारत आहेत.




**घोषणा जुनी, प्रश्न आजचा**

एक देश-एक निवडणूक ही तशी नवी घोषणा अजिबात नाही. २०१४ च्या निवडणुकीत भाजपनेच आपल्या जाहीरनाम्यात या विषयाला हात घातला होता. २०१५, २०१६ अशी सलग दोन वर्षे त्यावर चर्चा व्हायची. संसदीय स्थायी समितीतही तो विषय चर्चेला आला होता. माजी राष्ट्रपती प्रणव मुखर्जींनीही त्याचा उल्लेख पदावरून दूर झाल्यावर केला होता. कोविंद यांनी पदावर असताना भाषणात उल्लेख केला होता. एवढेच नव्हे, तर नरेंद्र मोदी यांनी दुसऱ्यांदा पंतप्रधान झाल्यावर जून २०१९ मध्ये एक देश-एक निवडणूक या मुद्यावर विचारविनिमयासाठी बैठक बोलावली होती. खरे तर भाजपचेच ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवानी यांचे राजकारण बहरात होते, तेव्हा त्यांनी या रचनेचा पुरस्कार केलेला होता. म्हणजेच या मुद्याभोवती चर्चा सातत्याने झडत आहे. खरे तर देश स्वतंत्र झाल्यानंतर १९६७ पर्यंत देशात एक देश-एक निवडणूक असेच वातावरण होते. १९५२, १९५७, १९६२ आणि १९६७ च्या निवडणुका तशाच झाल्या होत्या. तथापि, विविध कारणांनी राज्य सरकारे विसर्जीत होणे आणि त्या-त्या वेळी विधानसभांच्या निवडणुका होणे, तसेच १९७० ची लोकसभा विसर्जित करून, १९७१ मध्ये सार्वत्रिक निवडणूक होणे या सगळ्या गदारोळानंतर एक देश-एक निवडणूक हे चित्र बदलले गेले. आजच्या घडीला देशात प्रत्येक वर्षी कोणत्या ना कोणत्या राज्यांच्या विधानसभांच्या तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका सुरूच असतात. साहजिकच त्यानुसार त्या-त्या भागात निवडणूक आचारसंहितेचा अंमल असतो. शिवाय, सरकारी यंत्रणा सातत्याने निवडणूक मोडमध्ये राहते, ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळेच एक देश-एक निवडणूक हा मुद्दा सातत्याने आग्रहाने मांडला जातो.

**निवडणुका एकाचवेळी का हव्यात**

एक देश-एक निवडणूक या प्रक्रियेचा आग्रह धरत असताना देशाच्या व्यापक हिताचा मुद्दा पुढे केला जातो. त्यातील काही बाबी निश्चित रास्त आहेत, नाकारता येत नाहीत. महत्त्वाचे म्हणजे, सतत निवडणुका घेत राहिल्याने प्रत्येक वेळी खर्च करावा लागतो. स्वाभाविकच खर्चात वाढ होणे म्हणजे सरकारच्या तिजोरीवर ताण वाढवणे आहे. जर एकाच वेळी लोकसभा, विधानसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी मतदान झाले तर खर्च कमीत कमी होईल. वरचेवर निवडणुकीमुळे आचारसंहितेचा अंमल सातत्याने राहिल्यामुळे प्रशासनाच्या कार्यक्षमतेला कुंपण घातले जाते. ती पूर्ण क्षमतेने आणि मोकळेपणाने लोकहिताची कामे करू शकत नाही. शिवाय, ही सरकारी यंत्रणा वरचेवर निवडणुकीच्या कामाला जुंपली गेल्याने तिला विकास कामांकडे, लोकहिताच्या बाबींकडे लक्ष द्यायला मर्यादा येतात, साहजिकच प्रशासन पूर्ण क्षमतेने कामकाज करू शकत नाही. एकाच वेळी निवडणुका झाल्यास त्याची प्रशासकीय कामकाजात परिणामकारकता आणायला मदतच होईल. हीच स्थिती राजकीय पक्ष आणि त्यांच्या नेतेमंडळीची होती. निवडणूक प्रचारसभा, रॅली, रोड शो, इतर स्वरुपाची तयारी यामध्ये ही मंडळी सतत व्यग्र राहिल्याने त्यांनाही दमछाक होते. लोकोपयोगी कामांकडे लक्ष देताना त्यांची तारांबळ होते. आजकाल राष्ट्रीय नेते लोकसभा, विधानसभाच नव्हे तर महापालिका, पालिका निवडणुकांसाठीही मोर्चेबांधणी करत असल्याने त्यांची दमछाक होणे स्वाभाविकच म्हणावे लागेल. कायदा व सुव्यवस्था हा पोलिस आणि तत्सम यंत्रणेच्या कामाचा भाग. जेव्हा वरचेवर होणाऱ्या निवडणुकीत ही यंत्रणा गुंतून जाते तेव्हा गुन्हे प्रकटीकरणापासून ते इतर दैनंदिन कामकाजावर त्यांना पुरेसे लक्ष देता येत नाही. गुन्ह्यांच्या तपासापासून अनेक बाबी प्रलंबित राहतात. शिवाय, वरचेवर प्रशासकीय, पोलिस यंत्रणा हलवाव्या लागल्याने खर्चात मोठी वाढ होते. आपल्याकडे असे चित्र दिसते, की स्थानिक स्वराज्य संस्था ते लोकसभा या चढत्या क्रमाने गेल्यास मतदानाची टक्केवारी घटताना दिसते. निवडणुका एकाचवेळी झाल्या, तर मतदानाची टक्केवारी वाढायला मदत होईल. लोकशाहीच्या बळकटीसाठी ते आवश्यक आहे. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीतील प्रचारातील मुद्दे राष्ट्रीय ते राज्य पातळीपर्यंत येतात. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ते शहरे-गावापुरते मर्यादित राहतात. त्यामुळे मतदारांना आकर्षित करण्यासाठी राजकीय पक्षांना विविध क्लृप्त्या लढवाव्या लागतात. त्याचा ताण राजकीय पक्षांवर येतो. अशा सगळ्या समस्यांवर उतारा म्हणजे, एक देश-एक निवडणूक असे सांगितले जाते. त्याचे पुरस्कर्ते या मुद्यांवर भर देतात. राष्ट्रहिताच्या वेष्टनाखाली त्याचे उदात्तीकरणही करतात. त्यात देशाचे किती भले सामावले आहे, याची भलामणही करतात. मात्र त्याचे विरोधक अशा स्वरुपाच्या एक देश-एक निवडणूक प्रक्रियेने विपरित परिणाम कसे होऊ शकतात, तेही पटवून देतात.

**चर्चा सोपी, प्रक्रिया अवघड**

माजी राष्ट्रपती कोविंद यांच्या नेतृत्वाखाली सरकारने समिती नेमलेली आहे. ती एक देश-एक निवडणूक राबवण्यासाठीचा निर्णय घेण्याच्या प्रक्रियेतील कायदेशीर आणि संवैधानिक अडचणींवर तोडगा सुचवणार आहे. १९९९ मध्ये न्यायमूर्ती बी.पी. जीवनरेड्डी

यांच्या नेतृत्वाखालील विधी आयोगाने एक देश-एक निवडणुकीची सूचना केली होती. ऑगस्ट २०१८ मध्ये न्या. बी.एस. चौहान यांच्या नेतृत्वाखालील विधी आयोगाने याबाबतच्या आपल्या अभिप्रायात विद्यमान संवैधानिक चौकटीत एक देश-एक निवडणूक ही प्रक्रिया राबवणे अशक्य आहे, असे नमूद केले होते. ही प्रक्रिया राबवायची असेल तर सध्याची राज्यघटना, १९५१ चा लोकप्रतिनिधी कायदा, लोकसभा आणि विधानसभांच्या कामकाज पद्धतीचे नियम (रूल ऑफ प्रोसिजर) या सगळ्यांमध्ये पूरक बदल करावे लागतील. एवढेच नव्हे, तर यासाठी देशातील किमान पन्नास टक्के राज्यांकडून सहमतीदर्शक ठराव पारित व्हावे लागतील. तसे झाले तरच ही प्रक्रिया राबवण्याच्या मार्गातील अडथळे दूर होऊ शकतात. मात्र वाटते तितकी ही प्रक्रिया सोपी, सरळ नाही. राज्यघटनेतीलच उदाहरणे पाहू याः कलम ८३ लोकसभेचा कार्यकाल पाच वर्षांचा सांगते, तर कलम १७२ राज्य विधानसभेचा पाच वर्षांचा कार्यकाल सांगते, कलम ८५ अन्वये राष्ट्रपती लोकसभा विसर्जित करू शकतात, तर कलम १७४ अन्वये राज्यपाल विधानसभा विसर्जित करू शकतात, कलम ३५६ अन्वये राष्ट्रपती राजवट राज्यात लागू करता येते. नव्या रचनेत या कलमांचे काय, हा प्रश्न असेल. त्यात सुधारणा, दुरूस्त्या कराव्या लागतील. १९५१ पासून ११५ वेळा राज्याराज्यात राष्ट्रपती राजवट लागू केलेली आहे. हे सर्व पाहता, एक देश-एक निवडणूक ही प्रक्रिया राबवणे किती कठीण आहे, हे लक्षात येते.



**...तर मग काय करणार?**

समजा देशाने एक देश-एक निवडणूक ही पद्धती स्वीकारली तर काय, हाही मोठा प्रश्न आहे. गेली अनेक दशके देशाने आघाड्यांची सरकारे पाहिली आहेत. यातील काही कडबोळ्यांची सरकारे औटघटकेची ठरली, तर काही सरकारे चालवताना प्रमुख पक्षांच्या नेतृत्वाची दमछाक झाली. ती टिकवण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा करावी लागली. सगळ्या निवडणुका एकाच वेळी घ्यायच्या तर समजा आघाडीत बिघाडी झाली, त्रिशंकू स्थिती निर्माण झाली तर काय करायचे. मध्यावधी निवडणुका जर घ्यायच्या नाहीत तर मग राज्य असो नाही तर केंद्रात कोणते लोकप्रतिनिधी कारभार पाहणार? राष्ट्रपती राजवट लावणार, की बहुपक्षीय सरकारकडे कारभाराची सूत्रे देणार, पक्षांतरबंदी कायदा आहे तसाच ठेवणार की त्यात काही बदल करणार, अशा स्थितीत त्या-त्या सभागृहाचा कार्यकाल कमी करणार, की आणखी काही पर्यायी व्यवस्था करणार अशा कितीतरी प्रश्नांचा गुंता यामुळे निर्माण होऊ शकतो. लोकसभा, विधानसभेचा कार्यकाल आहे तसाच ठेवणार की तो कमी करणार, अविश्वास किंवा बहुमत गमावल्याने सरकार पडणे, त्याच्या जागी दुसरे सरकार येणे, राजकीय आघाड्यांची फेरमांडणी होणे, जसे आपण गेल्या चार वर्षांत महाराष्ट्रात पाहिले, तसे झाल्यास काय, अशा कितीतरी प्रश्नांची मालिका यानिमित्ताने उभी राहणार आहे. असे पेच सोडवायचे असतील तर त्यासाठी सखोल चर्चा, जनतेसह राजकीय पक्ष, विचारवंत, विधिज्ञ, घटनातज्ज्ञ अशा सगळ्या घटकांना विश्वासात घेऊन चर्चा करावी लागेल. सध्याच्या व्यवस्थेत असलेले दोष दूर करून, त्यात हव्या तितक्या निवडणूक सुधारणा करून आहे तीच व्यवस्था पुढे चालवता येईल की, एक देश-एक निवडणूक पद्धती स्वीकारायची यावर सखोल चिंतन, चर्चेच्या फेऱ्या झडाव्या लागतील तेव्हा कुठे अमृतकालाला साजेसे अमृत बाहेर पडू शकेल.

**खर्चात फारसा फरक नाही**

एक देश-एक निवडणूक प्रक्रियेमुळे खर्चात मोठी कपात होईल, असे गणित मांडले जाते. मात्र याबाबत निवडणूक आयोग, निती आयोग आणि इतर यंत्रणांच्या अंदाजानुसार, संसदीय निवडणुकीच्या पाच वर्षांच्या चक्रानुसार, प्रतिवर्षी प्रतिमतदार निवडणूक कामाकरता फक्त दहा रुपये खर्च येतो. तर याच निवडणुका एकाचवेळी घेतल्या तर निती आयोगाच्या म्हणण्यानुसार प्रतिवर्षी प्रतिमतदार पाच रुपये खर्च येऊ शकतो. विशाल देशाच्या तुलनेत निवडणूक आयोगासाठीची तरतूद तुलनेने कमी आहे. तर राजकीय पक्षांनी गेल्या दोन लोकसभा निवडणुकांवर, २०१४ मध्ये तीस हजार कोटी, तर २०१९ मध्ये साठ हजार कोटी रुपये खर्च केल्याचा एडीआरचा दावा आहे. म्हणजेच निवडणुकांच्या प्रक्रियेसाठी सरकारपेक्षा राजकीय पक्षांकडून वारेमाप खर्च केला जात असतो. आदर्श आचारसंहिता लागू करूनही या खर्चाला आळा बसत नाही, हे उघड सत्य आहे. सरकारी खर्चाचा बागुलबुवा उभा करून 'एक देश-एक निवडणूक'चा मुद्दा पुढे रेटण्याऐवजी, त्यासाठी अनुकूल वातावरण आणि राजकीय पक्षांची तयारी करण्याचा आटापिटा करण्याऐवजी निवडणूक प्रक्रियेत सुधारणा कशा करता येतील, आचारसंहितेच्या पालनात कशी कठोरता आणता येईल, याचा विचार केला पाहिजे. शिवाय, निवडणूक सुधारणा करण्यासाठी काय काय उपाययोजना कराव्यात, कोणते नियम, कायदे आणखी कडक करावेत, यावर काम करणे रास्त ठरू शकते.

**राज्यस्तरीय पक्षांची कोंडी**

एका अंदाजानुसार, २०२२ मध्ये राजकीय पक्षांकडे एकूण

९५०० कोटी रुपये होते. यातील ५४०० कोटी रुपये (५७ टक्के) एकट्या भारतीय जनता पक्षाकडे होते. एडीआरने नमूद केल्यानुसार, २०१६-१७ ते २०२१-२२ दरम्यान भाजपला सर्वाधिक ५२७१ कोटी रुपयांच्या देणग्या मिळाल्या होत्या, तर अन्य विरोधी पक्षांना मिळून १७८३ कोटी रुपये देणगीरुपाने मिळाले होते. ही राजकीय पक्षांमधील आर्थिक असमानता आहे. अशी म्हण आहे, की जिंकणाऱ्या घोड्यावरच पैसे लावले जातात. जेव्हा काँग्रेसची सत्तेत चलती होती तेव्हा काँग्रेसची गंगाजळी इतरांपेक्षा जास्त होती. आजच्या घडीला ती जागा भाजपने घेतलेली आहे, ही वस्तुस्थिती आहे. एक देश-एक निवडणूक याची कार्यवाही करायची झाली तर देशभर पसरलेले भाजप, काँग्रेससारखे पक्ष आणि इतर राज्यस्तरीय पक्षांना आर्थिक क्षमतेसह मनुष्यबळाच्या आघाडीवर लोकसभा, विधानसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका एकत्र झाल्यास सर्व आघाड्यांवर एकाचवेळी धावपळ करताना दमछाक होऊ शकते. साहजिकच मर्यादांमुळे हे पक्ष मर्यादित निवडणुका लढतील किंवा निवडणुकीच्या धुराळ्यात कालांतराने अस्तंगत होऊ शकतात. परिणामी, एक देश आणि निवडक पक्ष असे चित्र उभे राहू शकते. राज्यस्तरीय पक्षांची मोट बांधून एनडीएच्या माध्यमातून भाजपने केंद्रात सत्ता आणली. तो अटलबिहारी वाजपेयी-लालकृष्ण अडवानी यांचा काळ होता. मोदी यांच्या काळात भाजपने स्वबळावर लोकसभेत मांड पक्की केल्यावर एनडीए नावाची फारशी चर्चाही होत नव्हती. नव्यानेच झालेल्या अभ्यासानुसार, १९८९ ते २०१४ पर्यंत राज्यस्तरीय पक्षांचा देशाच्या राजकारणात दबदबा होता. २०१४ नंतर त्याला ओहोटी लागली. यातील काही पक्ष अस्तित्वासाठी झगडत आहेत. तामिळनाडू, आंध्र प्रदेशातील सत्ताधारी अनुक्रमे द्रमुक आणि वायएसआर काँग्रेस लोकसभा, विधानसभेत आपले प्रतिनिधी चांगल्या संख्येत पाठवू शकले, त्या तुलनेत बंगालमधील तृणमूल आणि ओडिशातील बिजू जनता दल राज्याच्या तुलनेत लोकसभेत कमी प्रतिनिधी पाठवू शकले. एक देश-एक निवडणूकची कार्यवाही केली तर एकुणात देशातील पक्षीय राजकारणाचे स्वरुपच बदलून जाऊ शकते. ते लोकशाहीच्या हिताचे कितपत राहू शकते, हाही मुद्दा वेगळाच.



**लाखमोलाची लोकशाही**

सरकारच्या तिजोरीवर पडणारा खर्चाचा ताण महत्त्वाचा, की लोकशाहीची पाळेमुळे तळागाळापर्यंत पोहोचणे, तिचा लाभ खऱ्या अर्थाने लोकांना मिळणे महत्त्वाचा हा सगळ्यात महत्त्वाचा, लाखमोलाचा प्रश्न आहे. निवडणुकीत देश, राज्य आणि स्थानिक स्तरावरील प्रश्नांवर चर्चा होते, ते धसास लागतात. त्यांच्या सोडवणुकीचा मुद्दा सातत्याने चर्चेत येतो तेव्हा या प्रक्रियेत उतरणाऱ्या लोकप्रतिनिधींसह जनतेच्या सेवेसाठी असलेली प्रशासकीय यंत्रणा सातत्याने उत्तरदायित्वाच्या भूमिकेत येत असते. ती जशी निवडणूक प्रक्रियेच्या चक्रात अडकते, त्याहीपेक्षा तिला जाब विचारणारे सातत्याने कोणीतरी समोर ठाकत असल्याने तिला परिणामकारक काम करावेच लागते. तशीच स्थिती राजकीय पक्ष आणि लोकप्रतिनिधींची असते. हा दायित्वभावच प्रशासकीय यंत्रणेला प्रभावीपणे काम दाखवायला भाग पाडत असतो, हेही तितकेच खरे आहे.

मुळात लोकशाहीची बळकटी हीच तिच्या चिरंतन अस्तित्वाची गरज आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. आपण जाणीवपूर्वक संघराज्यीय पद्धती स्वीकारलेली आहे, अध्यक्षीय पद्धतीला नाकारलेले आहे. जर लोकसभा, विधानसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या निवडणुका एकत्र घेतल्या तर राष्ट्रीय पक्षांचा वरचष्मा राहील. आज पाहिले तर देशातील अनेक राज्यांत भाजपेतर पक्षांची सरकारे कार्यरत आहेत. एवढेच नव्हे तर ज्या डबल इंजिनचा बोलबाला केला जातो, त्याबाबत असे निदर्शनाला आले आहे, की डबल इंजिनपेक्षा, दोन वेगवेगळ्या पक्षांची सरकारे अधिक चांगल्या प्रकारे कामे करत आहेत. अर्थात, याला उत्तर प्रदेशसारखा अपवाद निश्चित आहे. यातील काही राज्यांतून लोकसभेवर मात्र भाजप किंवा काँग्रेससारख्या राष्ट्रीय पक्षाला अधिक पसंती दिलेली आहे. आंध्र प्रदेश आणि ओडिशा या राज्यांच्या निवडणुका लोकसभेबरोबर झाल्या. या दोनही राज्यांत अनुक्रमे वायएसआर काँग्रेस आणि बिजू जनता दल यांची सरकारे आहेत, पण त्या तुलनेत लोकसभेसाठी भाजपला अधिक जागा मिळालेल्या आहेत. लोकशाहीची मूल्ये जपणे, ती वृद्धिंगत करणे, त्यासाठी आग्रही राहणे म्हणजेच ती समाजातील प्रत्येक घटकांपर्यंत पोहोचणे आहे. त्यामुळेच एक देश-एक निवडणूक हा विचार असो, नाही तर सध्याची निवडणूक पद्धती, या सगळ्यांवर साकल्याने विचारविनिमय, मंथन होण्याची गरज आहे. या विचारप्रक्रियेचा लोकशाहीची मजबुती, तिचे विकेंद्रीकरण, ती अधिकाधिक समाजघटकांपर्यंत पोहोचवणे हाच मूलाधार राहिला पाहिजे. ●●●


**(लेखक समकालीन विषयाचे अभ्यासक आहेत.)**

# एक देश - एक निवडणूक : लोकशाही मोडीत काढण्याचे षड्यंत्र!



चेतन शिंदे

**प्रादेशिक अस्मिता, स्थानिक प्रश्नांवर निवडणुका लढविणे ही खरी लोकशाही आहे. पण विविधता मोडून काढणारी–लोकशाहीला नख लावणारी हुकूमशाही देशात स्थापित करता यावी म्हणूनच 'एक देश–एक निवडणुकी'चा घाट घातला जात आहे. पंतप्रधानांनी अलीकडेच तीन सदस्यांच्या निवडणूक आयोगाच्या रचनेतून सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशांच्या जागी पंतप्रधान नेमतील त्या कॅबिनेट दर्जाच्या मंत्र्याला सदस्य करण्यात येईल. म्हणजेच निवडणूक आयोगावर पंतप्रधानांचे पूर्ण वर्चस्व राहणार. पंतप्रधानांची ही वाटचाल लोकशाही मोडून केंद्रीकरणाकडे वाटचाल करणारी आहे, हे का वेगळे सांगितले पाहिजे?**



काँग्रेससहीत २८ विरोधी पक्षांची आघाडी स्थापन झाल्याचा धसका पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घेतला आहे, याविषयी शंका नाही. मग पंतप्रधान भलेही 'इंडिया' आघाडीचा घमेंडी आघाडी म्हणून उपहास करोत. इंडिया आघाडीची देशभर चर्चा होत असताना व दुसरीकडे, नरेंद्र मोदींच्या केंद्र सरकारच्या कारभारावर देशातील जनता नाराज असताना लोकांचे लक्ष विचलीत करण्यासाठी म्हणूनच पंतप्रधान निरनिराळ्या धक्कातंत्राच्या घोषणा करीत आहेत. त्यातील एक म्हणजे कोणतेही ठोस कारण नसताना आणि लोकसभेची निवडणूक अवघ्या एक वर्षावर आली असताना संसदेचे अधिवेशन त्यांनी बोलाविले आहे. दुसरे देशाचे नाव इंडिया बदलून भारत करण्याचे सूतोवाच केले आहे आणि तिसरे म्हणजे, 'एक देश–एक निवडणूक' घेण्याचा मनोदय जाहीर केला. पंतप्रधानांच्या या साऱ्या खेळी म्हणजे धक्कातंत्राच्या राजकारणाच्या निदर्शक आहेत. आता हेच पाहा ना, देशात कोणतीही अभूतपूर्व परिस्थिती निर्माण झालेली नसताना त्यांनी एक देश–एक निवडणुकीचा जाहीर केलेला मनोदय होय. 'एक देश–एक निवडणूक' हे सूत्र जर उद्या अवलंबिले गेले, तर देशातील लोकशाहीचा संकोच होऊन देशाची वाटचाल अध्यक्षीय लोकशाहीकडे म्हणजेच एकतंत्री कारभाराकडे होईल हे उघड आहे. 'एक देश–एक निवडणूक' म्हणजे मोदी सरकारला व त्यांच्या भाजपला देशातील विविधता मान्य नसून सत्तेचे विकेंद्रीकरण करावयाचे आहे, हे अगदी सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट आहे. मोदी सरकारचा गेल्या ९ वर्षातील कारभार पाहता, त्यांनी जी काही आश्वासने जनतेला दिली होती ती पूर्ण करता आली नाहीत, हे तर दिसतेच आहे. पंतप्रधानांच्या केंद्र सरकारला ना रोजगार निर्माण करता आले, बेकारी, महागाई दूर करता आली, ना दलित–अल्पसंख्याकांवरील अत्याचार दूर करता आले. मणिपूरसारखे राज्य वांशिक दंगलीत होरपळून निघत असताना तिकडे लक्ष द्यायलासुद्धा पंतप्रधानांना वेळ नाही. आपल्या सरकारचे एकूणच अपयश लपविण्यासाठी म्हणूनच पंतप्रधान नरेंद्र मोदी सवंग घोषणाबाजी करीत आहेत, हे अगदी उघड आहे.

**ही सारीच कारणे तकलादू आणि बेगडी**

बरे, 'एक देश–एक निवडणुकी'चा मनोदय जाहीर करताना कोणती कारणे देण्यात येत आहेत? तर सतत निवडणुका घेतल्यामुळे प्रशासकीय अडचणी निर्माण होतात. निवडणुकांवर जो प्रचंड खर्च होतो तो 'एक देश–एक निवडणूक' घेतल्यामुळे कमी करता येईल. आचारसंहितेमुळे विकासकामे ठप्प होतात, ती होणार नाहीत. पण ही सारीच कारणे तकलादू आणि बेगडी आहेत.




देशात संसदेबरोबर राज्य विधानसभांची अखेरची निवडणूक १९६७ साली झाली. यानंतर गेल्या ५६ वर्षात संसदेच्या व विधानसभांच्या निवडणुका स्वतंत्रपणे होत आल्या. परिणामी भारताच्या वेगवेगळ्या राज्यांतून प्रादेशिक पक्षांना सत्तारूढ होऊन आपला राजकीय अजेंडा राबविता आला. प्रादेशिक अस्मिता, स्थानिक प्रश्नांवर निवडणुका लढविणे ही खरी लोकशाही आहे. पण विविधता मोडून काढणारी– लोकशाहीला नख लावणारी हुकूमशाही देशात स्थापित करता यावी म्हणूनच 'एक देश–एक निवडणुकी'चा घाट घातला जात आहे. पंतप्रधानांनी अलीकडेच तीन सदस्यांच्या निवडणूक आयोगाच्या रचनेतून सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशांच्या जागी पंतप्रधान नेमतील त्या कॅबिनेट दर्जाच्या मंत्र्याला सदस्य करण्यात येईल. म्हणजेच निवडणूक आयोगावर पंतप्रधानांचे पूर्ण वर्चस्व राहणार. पंतप्रधानांची ही वाटचाल लोकशाही मोडून केंद्रीकरणाकडे वाटचाल करणारी आहे, हे का वेगळे सांगितले पाहिजे?

'एक देश–एक निवडणूक' घेतल्यामुळे प्रशासनावरील ताण कमी होईल, असे सांगणे हेही दिशाभूल करणारे आहे. विचार करा, देशात १९६७ साली १५ मोठी राज्ये होती, आता २८ मोठी राज्ये व आठ केंद्रशासित प्रदेश आहेत. १९६७ साली लोकसभेच्या निवडणुकीत १५ कोटी २७ लाख मतदारांनी, तर २०१९ मध्ये ६० कोटी ३७ लाख मतदारांनी मतदान केले. आता २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत अजून काही कोटींची भर पडणार. तेव्हा 'एक देश–एक निवडणूक' सुलभ कशी ठरणार?

**...तर छोट्या प्रादेशिक पक्षांची अडचण होणार**

'एक देश–एक निवडणूक' घेतली तर अजून काही पेच होणार ते वेगळेच. एकच निवडणूक घेतली तर छोट्या प्रादेशिक पक्षांची अडचण होणार. कारण लोकांसमोर न्यावयाच्या स्थानिक मुद्यांना गौण स्थान प्राप्त होऊन राष्ट्रीय प्रश्नांचीच एकत्रित निवडणुकीत चर्चा होणार. पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत ५३ पक्ष होते. २०१९ मध्ये ही संख्या ६०० वर पोहोचली. संघराज्याच्या चौकटीत विविधता आणि प्रादेशिकता सामावून घेण्याला पर्याय नाही. संघराज्य पद्धतीचे हेच तर एकमेव वैशिष्ट्य आहे. सत्तेच्या केंद्रीकरणाकडे निघालेल्या मोदी सरकारला हेच नको आहे. 'एक देश–एक निवडणूक' घेतली तर निवडणुकांवर होणारा भरमसाठ खर्च वाचविता येईल, हासुद्धा एक पोकळ मुद्दा आहे. कारण राजकीय पक्षांकडून होणारा खर्च कमी होईल, याची काहीही खात्री नाही. कारण खर्चावरचे निर्बंध व्यवहारात फोल ठरतात, असाच अनुभव आहे. एकत्रित निवडणुका घेतल्या, तर निवडणूक आयोगावरचा ताण कमी होईल असे म्हणणेही व्यर्थ आहे. निवडणूक आयोगाचे कामच निवडणुका घेणे आहे. शिवाय एकत्रित निवडणूक घ्यायची म्हणजे काही विधानसभांची मुदत लवकर संपवावी लागेल, तर काहींची मुदत वाढवावी लागेल. कायद्यात बदल करून घटनात्मक तरतुदी कराव्या लागतील त्या वेगळ्याच. माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली 'एक देश–एक निवडणुकी'च्या संदर्भात समिती स्थापन झालीच आहे. समितीची शिफारस पंतप्रधानांना अनुकूल असेल हे वेगळे सांगण्याची गरज नाही. एकूणच देशातील लोकशाही, विविधता मोडीत काढून पंतप्रधान आणि त्यांचा भाजप सत्तेच्या केंद्रीकरणाकडे वाटचाल करण्याचे जे षड्यंत्र आखीत आहे, ते षड्यंत्र विरोधी पक्षांनी व जनतेने लोकशाहीच्या संरक्षणासाठी उधळून लावण्याची गरज आहे, हे वेगळे सांगणे नको.

# एक देश -एक निवडणूक : बहुविधतेला मारक



बी.जी. वाघ

**भारताने संसदीय लोकशाही स्वीकारली. त्यामागचा हेतू देशातील बहुविधतेला सामावून घेण्याची निकड. हा देश बहुसंख्याक, बहुधार्मिक आहे हे तर खरेच; परंतु त्याची राजकीय, प्रादेशिक संस्कृतीदेखील विभिन्न आहे. दक्षिणेकडील राज्ये वेगळी, उत्तरेकडील वेगळी आणि ईशान्येकडील विविधता पश्चिमेकडील राज्यांच्या अगदी विरुद्ध. तथाकथित हिंदुत्ववाद्यांना ही विविधता समजणे अशक्यच.**

भारतीय राज्यघटनेत केंद्र व राज्य सरकारे यांचे संबंध कसे असावेत याविषयी सखोल चिंतन केल्याचे आपल्याला दिसते. केंद्राला काही विशेष अधिकार दिले असले, तरी केंद्राने राज्यांच्या अधिकार क्षेत्रावर अतिक्रमण करू नये याचीदेखील काळजी घेतली आहे. राज्यकर्ता वर्ग जर सुज्ञ असेल, तर संघर्ष होण्याचे काही कारणच नसते. 'एक देश-एक निवडणूक' हा पंतप्रधान मोदींनी घेतलेला आणखी एककल्ली निर्णय आहे असे म्हणावे लागेल. त्याची चिकित्साही करावी लागेल. भारताने संसदीय लोकशाही स्वीकारली. त्यामागचा हेतू देशातील बहुविधतेला



सामावून घेण्याची निकड. हा देश बहुसंख्याक, बहुधार्मिक आहे हे तर खरेच; परंतु त्याची राजकीय, प्रादेशिक संस्कृतीदेखील विभिन्न आहे. दक्षिणेकडील राज्ये वेगळी, उत्तरेकडील वेगळी आणि ईशान्येकडील विविधता पश्चिमेकडील राज्यांच्या अगदी विरुद्ध. तथाकथित हिंदुत्ववाद्यांना ही विविधता समजणे अशक्यच. मुख्य म्हणजे ही बहुतेक राज्ये हिंदुत्वाच्या विरोधीच आहेत. त्यांचा धर्म, पंथ, परंपरा कुठल्याही अर्थाने हिंदू नाहीत. जिथे राष्ट्रवाद पोसला गेला आहे, ती बौद्धिक व नैतिक तसेच आर्थिक व सामाजिकदृष्ट्याही बिमारू राज्ये आहेत; परंतु पंतप्रधान येतात ते याच पट्ट्यातून. कारण खासदारांची संख्या जास्त. उत्तर प्रदेशातील, मध्यप्रदेशातील खासदारांची, नेत्यांची वंशवादी, धर्मवादी, जातीयवादी मुक्ताफळे आपण नेहमीच वृत्तपत्रातून वाचतो. त्यांच्यातून त्यांचा नैतिक व बौद्धिक दर्जा दिसतो. त्यांच्या हातात धर्म एक शस्त्र आहे, ज्यामुळे समाज शतखंडित होत आहे; परंतु त्यामुळे काही तात्कालिक राजकीय यश मिळते; परंतु देश एकसंधपणे उभा राहील असे नाही. नागालँड, मणिपूर, अरुणाचल आदी प्रदेशांचा हिंदुत्वाशी दुरान्वयानेही संबंध नाही. तरीदेखील मणिपूर पेटवण्यात आले ते या ध्रुवीकरणाच्या व वांशिक विद्वेषाच्या बळावर. हा सरकारपुरस्कृत हिंदुत्ववाद देशाच्या मुळावर आला आहे; परंतु त्याची जाणीव सत्ताधाऱ्यांना नाही. आपण सत्तेच्या बळावर इतर राज्यांच्या संस्कृतीवर आक्रमण करीत आहोत, एवढेच नव्हे तर ती नष्ट करीत आहोत. हे पातक वंशविच्छेदापेक्षा (Genocide) कमी नाही. या देशाला जर महान करायचे असेल, तर या विविधतेचा मनापासून आदर करावा लागेल व त्यांना त्यांचे स्वातंत्र्यही द्यावे लागेल, जे घटनेने त्यांना आधीच दिलेले आहे. हिंदुत्वाच्या नावाने त्याचा अपहार करू नये इतकेच.

**आदिम समाजाला स्वयंनिर्णयाचे अधिकार**

घटनेने आदिम समाजाला स्वयंनिर्णयाचे अधिकार दिलेले

आहेत. आर्टिकल ३७० हे मूलतः राजकीय करारातून आल्यामुळे तेदेखील आवश्यकच होते. त्यामुळे भारतीय स्वातंत्र्याला, सार्वभौमत्वाला कुठलाही धोका नव्हता. आर्टिकल ३७१ मात्र खास आदिम समाजाच्या संरक्षणाकरिता व विकासाकरिता आहे. घटनेतील इतरही तरतुदी त्याला पूरकच आहेत. आदिवासी राज्यांना घटना अंतर्गत दिलेली स्वायत्तता ही घटनाकारांच्या दूरदृष्टीची व न्यायबुद्धीची सूक्ष्मता त्यातून आपल्याला दिसते. हिंदुत्ववाद एक विचारधारा मानली, तर ती एक देशविघातक आहे. कारण ती घटनात्मक स्वातंत्र्याला, समतेला, बंधुत्वाला विरोध करते. मूलतः ती लोकशाहीविरोधी विचारधारा आहे. ती इतर धर्मांना, विचारधारांना, घटनात्मक मूल्यांना आपली मांडलिक करू इच्छिते. भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील जे जे मंगल, उदात्त आहे त्यांचा ती निषेध करीत जाते. त्यात घटना आणि घटनात्मक व्यवस्थाही आली. त्यांचा एक चालक, एक मालक, एक झेंडा, एक तत्त्वप्रणाली आणि एक विचारधारा हाच एक अजेंडा आहे. तो राबवण्यासाठी ते विविध प्रकारचे बौद्धिक षड्यंत्र उभे करतात. त्याचा अंदाज सामान्य जनतेला येत नाही. विरोधी पक्षही कट्टर तत्त्वनिष्ठ नसल्याने तेही फसतात. सत्तेच्या राजकारणात तडजोडी करतात आणि त्यांच्यामागेच वाहत जातात. २०१४ लाच भारताला स्वातंत्र्य मिळाले असे मानणारा एक वर्ग सत्ताधाऱ्यांमध्ये आहे. प्रचलित सरकारचे महत्त्वाचे निर्णय याच मानसिकतेतून येतात. आर्टिकल ३७०, रामजन्मभूमीचा शिलान्यास, नव्या पार्लमेंटचे उद्‌घाटन किंवा आता 'इंडिया' नावालाच विरोध यामागेदेखील हीच मानसिकता आहे.

**हिंदू राष्ट्रवाद मुळात एक राजकीय विचारधारा**

मणिपूर जळत असताना पंतप्रधानांचे वर्तन आणि त्यानंतर त्यांनी केलेले पार्लमेंटमधील भाषण याच मानसिकतेचे उत्तम उदाहरण आहे. काँग्रेस आणि नेहरूंवर त्यांनी कडाडून टीका केली. ते पंतप्रधानांचे भाषण नव्हते. संघ प्रचारकाचे होते. विरोधी पक्षांना, त्यांच्या मतांना काडीचीही किंमत न देणे, पार्लमेंटमध्ये हजर न राहणे, पार्लमेंटमधील परंपरा, शिस्त, संकेत यांना ठोकरून लावणे ही कार्यपद्धती एका विचारधारेचे मंडण करणारी आहे. त्यामुळेच 'एक राष्ट्र-एक निवडणूक' ही घोषणा कुठल्याही राष्ट्रहितातून आलेली नाही, हे स्पष्ट होते. त्यामागे केंद्रीय सत्तेचे सामर्थ्य वाढवणे व राज्यांना राजकीयदृष्ट्या दुर्बल करणे हाच हेतू असण्याची शक्यता आहे. विरोधी पक्ष संघटित होत असल्यामुळे धक्कातंत्राचाही तो भाग आहे. २०२४ ची निवडणूक एक विचारधारेचे युद्ध आहे. हा हिंदू राष्ट्रवाद जिंकणार की हरणार ते या युद्धात ठरणार आहे. हिंदू राष्ट्रवाद मुळात एक राजकीय विचारधारा आहे. तिची प्रेरणा हिटलरच्या तत्त्वज्ञानातून, कार्यपद्धतीतून येते. लोकांना सतत 'खोटे' सांगणे आणि खऱ्या खोट्यांमध्ये लोकांच्या मनात संभ्रम निर्माण करून आणखी एका मोठ्या असत्याची उभारणी करणे आणि ती लोकांनी स्वीकारावी म्हणून प्रभावी प्रचारयंत्रणेच्या साहाय्याने लोकांना मानसिकदृष्ट्या अधू करणे म्हणजेच भक्त बनवणे ही त्यांची कार्यपद्धती असते. जितके असत्य मोठे असेल तितका लोकांचा अधिक विश्वास बसतो. एकचालकानुवर्ती व्यवस्था उभी करण्यासाठी लोकांच्या जाणिवा बधिर करण्याची आवश्यकता असते. त्यामुळे ते प्रतिकारच करत




नाहीत. भारतात ते चित्र थोड्याफार प्रमाणात दिसू लागले आहे. त्याचा फायदा सत्ताधाऱ्यांना मिळत आहे. सुप्रिम कोर्टाचा निर्णय डावलून दिल्ली सेवा अधिनियम मंजूर करण्यात आले. निवडणूक आयोगाच्या नियुक्तीत सुप्रिम कोर्टाच्या न्यायाधीशांचाही समावेश करावा या निर्णयावरदेखील पंतप्रधानांनी नियुक्ती करणाऱ्या सदस्यात सुप्रिम कोर्टाच्या न्यायाधीशांचा समावेश केला नाही. वरील दोन्ही प्रकरणांतील पंतप्रधानांचे वर्तन संघीय रचनेला धक्का देणारे आहे. निव्वळ घटनात्मक संस्थाच नव्हे, तर सुप्रिम कोर्टदेखील आपल्या अधिकारकक्षेत असावे, अशीच व्यूहरचना आखण्यात येत आहे. न्यायमूर्ती गोगोईंचे पार्लमेंटमधील भाषण याच गोष्टींकडे अंगुलीनिर्देश करते. भारतीय लोकशाहीला येणाऱ्या काळात गंभीर धोके जाणवतात. भारतीय राज्यघटनेप्रमाणे केंद्र व राज्य सरकारे यांच्या संबंधात एक मुक्त अवकाश ठेवलेला आहे. आणीबाणी व राष्ट्रपती राजवटीसारख्या काही तरतुदी वगळता केंद्राने राज्यांचा सन्मान करावा, अशीच व्यवस्था आहे. राज्ये कमकुवत असावीत असा घटनाकारांचा उद्देश नव्हता. भारत पूर्वी कधीही एकसंध राष्ट्र न राहिल्यामुळे ते पुन्हा विस्कळीत होऊ नये याची दक्षता त्यांनी घेतली आहे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर हा देश सहा महिन्यांच्या वर टिकणार नाही, असे बऱ्याच पाश्चात्य विचारवंतांचे मत होते; परंतु तो टिकला, वृद्धींगत झाला. त्याचे कारण घटनेची समन्यायी रचनाच होय. केंद्राने तिच्यात अनावश्यक हस्तक्षेप करणे चुकीचे आहे. केंद्र व राज्य निवडणुका एकत्र घ्यावयाच्या असल्यास प्रत्येक राज्याशी केंद्राने चर्चा करायला हवी. निदान कमिटीत सर्व राज्यांचे प्रतिनिधी असावेत. हा एकटा निर्णय पंतप्रधान घेत असतील, तर त्यांच्या हेतूविषयी राज्यांच्या मनात शंका असणे वाजवी आहे. आर्टिकल ३७० रद्द करताना केंद्र सरकारने घटनात्मक प्रक्रिया पार पाडली नाही. त्यामागील राजकारण काहीही असले, तरी जम्मू-काश्मीरच्या नागरिकांवर तो अन्यायच होता. कुठलाही देशहिताचा निर्णय घेताना घटनात्मक मूल्ये, घटनेचा गाभा (Basic Structure) आणि संविधानिक नितीमत्ता यांचे उल्लंघन करून घेतलेला निर्णय राष्ट्रहिताचा ठरत नाही. प्रचलित सरकारने संविधानिक नितीमत्तेचे वारंवार उल्लंघन केलेले दिसून येते. 'वन नेशन-वन इलेक्शन' हा घाईघाईने घेतलेला निर्णय त्याच प्रकारचा आहे. अर्थात, त्याची अंमलबजावणी करता येईल की नाही याची शंकाच आहे. कारण घटनेत आणि पीपल्स रिप्रझेंटेटीव्ह ॲक्टमध्येही

दुरुस्ती करावी लागेल. विरोधी पक्षांनी आणि राज्यांनी कणखरपणा दाखवला तर ते शक्य होणार नाही. सुप्रिम कोर्ट अशा प्रकरणात लक्ष घालत नाही, असे दिसून येते. त्यासाठी घटनेतील चेक ॲण्ड बॅलन्सचा म्हणजे परस्परांच्या निर्णयांचा आदर करण्याचा प्रयत्न केला जातो; परंतु सत्ताधारी पक्षाने आणि पार्लमेंटनेही आपल्या मर्यादा पाळल्या पाहिजेत. सध्याच्या राजकीय संस्कृतीला अनुसरून पार्लमेंट आणि सुप्रिम कोर्ट परस्परांच्या विरोधी उभे करण्याचा प्रयत्न केला जातो. सुप्रिम कोर्टावर राजकीय पक्षांच्या काही धुरिणांनी वारंवार हल्ले करताना दिसून येतात. याचे कारण विचारधारेतील संघर्ष हेच आहे. सरकारने नेमलेल्या समितीचे अध्यक्ष माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद आहेत. हेदेखील घटनात्मक औचित्याला धरून नाही. राष्ट्रपती हे घटनेचे सर्वोच्च पद आहे. त्यांनी पंतप्रधानांच्या आदेशाने स्थापित झालेल्या कमिटीत काम करणे त्या पदाच्या प्रतिष्ठेचे अवमूल्यन आहे.

**एकत्रित निवडणुका घेणे हे एक युद्ध लढण्यासारखेच**

लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुका एकत्र झाल्याची उदाहरणे आहेत. वास्तविक, १९५२, १९५७ व १९६७ साली अशा प्रकारे एकत्रित निवडणुका झाल्या होत्या. त्यावेळी कुठले घटनात्मक पेच निर्माण झाले नाहीत. सध्याही २०१५ मध्ये पार्लमेंटमधील स्टँडिंग कमिटीने या विषयावर काही सूचना केल्या होत्या. सुदर्शन नच्चिपन त्याचे अध्यक्ष होते. त्यावेळी इलेक्शन कमिशनचा अभिप्राय त्यांनी मागितला होता. इलेक्शन कमिशनने त्यावेळी अनेक प्रशासकीय अडचणी नमूद केल्या होत्या. विशेषतः ईव्हीएम मशिनची उपलब्धता व वाढलेल्या मतदारांची संख्या यांचा मेळ बसत नव्हता. याचा अर्थ पुरेसे ईव्हीएम मशिन उपलब्ध नव्हते. एकत्रित निवडणुका घेणे हे एक युद्ध लढण्यासारखेच असते. त्याचे काही फायदे सांगण्यात येतात, ते असे–

१) खर्च वाचतोः मागील संसदेच्या (खासदारांच्या) निवडणुकीत ३८०० कोटी रुपये खर्च झालेला होता. प्रत्यक्षात तो खर्च कितीतरी पटीने अधिक असतो. एकत्रित निवडणुका घेतल्यामुळे खर्च वाचतो.
२) दोनदा निवडणुका घेतल्यामुळे प्रशासन यंत्रणेवरचा खर्च व ताण दोन्ही वाढतात.
३) आचारसंहिता दोनदा लावाव्या लागतात. त्यामुळे विकासाची कामे अडकून पडतात.

**एकत्रित निवडणुकीमुळे होणारे तोटेदेखील तितकेच महत्त्वाचे आहेत. उदाहरणार्थ –**

१) प्रत्येक राज्याचे स्थानिक प्रश्न वेगळे असतात. विधानसभेच्या स्वतंत्र निवडणुकीत या प्रश्नांवर सखोल मंथन होते व त्याप्रमाणे मतदार मतदान करतात.
२) एकत्रित निवडणुकीमुळे केंद्रीय मुद्दे महत्त्वाचे ठरतात व राज्यांवर अन्याय होतो. तसेच केंद्र सरकार त्याचा राजकीय फायदा घेण्याचा प्रयत्न करते. कर्नाटकची निवडणूक केंद्र सरकारने प्रतिष्ठेची केली; परंतु ते जिंकू शकले नाहीत. कारण निवडणूक स्थानिक मुद्यांवर लढली गेली.
३) केंद्र सरकार विरोधी पक्षांची सरकारे अस्थिर करण्याचा प्रयत्न करते. आमदार, खासदारांची खरेदी कोणत्याही किमतीवर अटी, निकषांवर केली जाते.
४) आपल्या संघीय व्यवस्थेला कमकुवत करण्याचा प्रयत्न केंद्रीय सरकारे करतात. त्यांचा मुख्य हेतू डबल इंजिनचे सरकार आणणे हा असतो. त्याचे दुष्परिणाम आपण उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश आणि महाराष्ट्रातही पाहिले.

केंद्र व राज्य संबंधात परस्पर विश्वास, लवचिकता व पारदर्शकता असली पाहिजे. निव्वळ खर्च वाचतो हे म्हणणे पटणारे नाही. केंद्र सरकारने बड्या कर्जदारांना लक्षावधी कोटींची माफी दिली आहे. सरकारचा प्रसिद्धी खर्चच एक इलेक्शन घेण्याइतका होतो.

**विरोधी पक्षांचे आक्षेपही विचार करण्यासारखे आहेत.**

१) संघराज्यीय व्यवस्था मोडीत काढण्याचा सरकारचा प्रयत्न आहे.
२) सत्तेचे केंद्रीकरण होण्याचा धोका.
३) सरकारचा मूळ अजेंडा एक चालकानुवर्ती व्यवस्था उभी करण्याचा आहे. तो घटना आणि लोकशाहीविरोधी आहे.
४) घटनेच्या गाभ्याला हात घालण्याची सरकारची तयारी. पार्लमेंटमधील माजी सरन्यायाधीशांची ‘घटनेचे बेसिक स्ट्रक्चर बदलता येईल’, अशा प्रकारची विधाने.
५) राज्यांवर अन्याय तसेच सामान्य माणसांचा कुठलाही फायदा नाही. एकदा त्याने मतदान केल्यावर पाच वर्षे कुठलेही सरकार त्याच्याकडे पाहणार नाही. दोनदा निवडणुका झाल्या, तर दोनदा त्याला विचार करण्याची संधी मिळते.
६) कमिटीत विरोधी पक्षांचा एकही सदस्य नाही. त्यामुळे होणारे निर्णय म्हणजे केंद्र सरकारची मनमानी ठरेल.
७) मल्लिकार्जुन खरगेंना वगळून गुलाम नबी आझादांना घेतले. यावरूनही सरकारचा हेतू संशयास्पद.
८) विरोधी पक्षांना (INDIA) संपवण्याचा डाव.

हे अधिवेशन शेवटचे ठरणार असल्यामुळे अनेक वादग्रस्त विषय विधेयक चर्चेला आणून पाशवी बळाच्या मतावर सरकार मंजूर करून घेईल, अशी भीती विरोधी पक्षांना आहे. पंतप्रधान मोदींची कार्यशैली पाहता त्यांची भीती वाजवी म्हणता येईल.

पंतप्रधानांची लोकप्रियता घसरते आहे. त्यामुळे घाईघाईने निवडणुका घेऊन लोकांचे लक्ष आंतरराष्ट्रीय प्रश्नांकडे वळवून पुन्हा एकदा जिंकून येण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. त्यासाठी ते कोणतीही किंमत मोजू शकतात. ज्या राज्यात त्यांना यश मिळण्याची शक्यता कमी आहे, तेथील निवडणुका पुढे ढकलणे व जिथे फायदा असेल तेथील सरकारे बरखास्त करून निवडणुका घेण्याचा एक महत्त्वाकांक्षी डाव ते टाकू शकतात. अर्थात, निवडणुकीतील यश अपयशाविषयी कुणालाही खात्रीने सांगता येत नाही. राज्यघटनेचे कलम ८३(२) आणि १७१(१) नुसार पाच वर्षांचा कार्यकाळ निश्चित केला आहे. लोकप्रतिनिधी कायदा १९५१ च्या कलम १४, १५ अन्वये निवडणूक आयोगाला नवीन निवडणुकीची घोषणा करावी लागते. यातही बदल करावे लागतील व त्यासाठी एक तृतीयांश राज्यांच्या विधानसभांची मान्यता लागेल. हा अर्थातच मोठा जुगार आहे. मोदींच्या एकूण कार्यपद्धतीत ते शक्य आहे. ●●●

**(लेखक निवृत्त सनदी अधिकारी आहेत.)**

# 'एक देश-एक निवडणुकीचा' हेतू एकपक्ष एकनेता हुकूमशाही!



प्रा. एच.एम. देसरडा

**एकत्र निवडणूक अगर 'एक देश-एक निवडणूक' ही संकल्पना संघराज्य राजकीय व्यवस्थेला, प्रशासन व कारभार यंत्रणेच्या स्वातंत्र्य व स्वायत्ततेला बाधा आणणारी आहे याबाबत तिळमात्र शंका नाही. २०२३ वर्षातील विधानसभेच्या व २०२४ लोकसभा निवडणूक त्या त्या मुदतीच्या कक्षेत वेगवेगळ्या होणे, ही आज भारतीय लोकशाहीची तातडीची गरज आहे.**

आपल्या संविधानकर्त्यांनी प्रदीर्घ विचारविमर्श करून या खंडप्राय बहुधार्मिक, बहुवांशिक व बहुभाषिक देशाला 'राज्यांचा संघ' (युनियन ऑफ स्टेट्स) मानले तशी संघराज्य राजकीय व्यवस्था मुक्रर केली. सोबतच संसदीय लोकशाही प्रणाली अखत्यार केली. त्यातहत राज्यकारभारार्थ केंद्र व राज्य सरकारे अशी संस्थात्मक रचना योजिली. एवढेच नव्हे, तर केंद्र व राज्य यांच्या जोडीला स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजे पंचायत राज व पालिका-महापालिकांची स्वतंत्र संस्थात्मक रचना असल्याचे नमूद केले. सुरुवातीला राज्यघटनेतील ४० व्या कलमाद्वारे त्यांना संघटित करण्याची जबाबदारी राज्यव्यवस्थेला दिली. कालौघात ७३ व्या व ७४ व्या घटनादुरुस्तीद्वारे त्यांचे सशक्तीकरण केले. थोडक्यात, केंद्र सरकार, राज्य सरकार व स्थानिक स्वराज्य संस्था असे विवक्षित कार्यक्षेत्र व अधिकार असलेली स्वतंत्र संरचना कार्यान्वित केली. या संविधानात्मक रचनेद्वारे अधिकाराचे विभाजन, विकेंद्रीकरण व लोकप्रतिनिधी व कारभार यंत्रणेचे मंत्रिमंडळ, अधिकारी व कर्मचारी यांचे जनतेप्रती दायित्व अधोरेखित केले.




**'प्रमाणशीर प्रतिनिधित्व' पद्धत आवश्यक :**

राष्ट्र-राज्य व्यवस्थित कार्यरत राहण्यासाठी संविधानात कायदेमंडळ (संसद, विधानसभा), कार्यपालिका व न्यायालये अशी संस्थात्मक रचना आहे. राज्यशकटाचा भाग असलेल्या या प्रमुख अंगाचे कार्यक्षेत्र व अधिकार काळजीपूर्वक परिभाषित करण्यात आले आहेत. त्यांचे स्वातंत्र्य, कार्यात्मक स्वायत्तता व सीमारेषा घालून दिल्या आहेत. प्रचलित संसदीय लोकशाही व्यवस्था ही प्रातिनिधीक असून निवडून आलेल्या व्यक्ती व त्यांच्या पक्षांद्वारे चालवली जाते. लोकप्रतिनिधित्व कायद्यानुसार निवडणूक आयोग निवडणूक घेऊन प्रतिस्पर्ध्यापेक्षा ज्याला एकमत अधिक (फर्स्ट पास्ट द पोस्ट) तो त्या त्या सभागृहाचा लोकप्रतिनिधी म्हणून निवडला जातो. ही पद्धत सदोष असून पक्षाला मिळणारी मते व सभागृहातील प्रतिनिधी जागा यात खूप तफावत आहे. त्यासाठी जर्मनी व अन्य काही देशांप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधित्व (प्रपोरशनल रिप्रझेंटेशन) असावे अशी सुधारणा आवश्यक आहे; परंतु राजकीय पक्ष याबाबत आग्रही नाहीत. मात्र, निवडणूक सुधारणेतील हा एक अत्यंत

महत्त्वपूर्ण मुद्दा आहे, हे नक्की. राज्यांची वेळोवेळी झालेली पुनर्रचना, मतदारसंघाची फेरआखणी यामुळे मतदारसंख्या प्रमाणात लोकसभा व विधासभेच्या जागा सर्वत्र एकसमान नाहीत. प्रत्येक राज्य व केंद्रशासित प्रदेशाची भौगोलिक, ऐतिहासिक व सामाजिक स्थिती लक्षात घेऊन मतदारसंघाचे क्षेत्र ठरविले जाते. अनुसूचित जाती व काही वेळा अनुसूचित जमातीसाठी (एससी/एसटी) राखीव मतदारसंघाच्या स्थितीत बदल केला जातो. याला अधिक सुसंगत करण्यासाठी 'प्रमाणशीर प्रतिनिधित्व' ही निवडणूक सुधारणा अत्यावश्यक आहे. मात्र, प्रत्येक पक्ष कुठे ना कुठे, केव्हा ना केव्हा प्रचलित सदोष पद्धतीचा लाभधारक असल्यामुळे ते यात सुधारणा करू इच्छित नाहीत! उदाहरणार्थ, भाजपला २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत एकूण वैध मतांच्या ३७% मते मिळाली. मात्र त्यांची लोकसभेतील खासदारसंख्या ५७% आहे. तात्पर्य, 'दणदणीत विजय', 'भारी बहुमत' यांसारख्या बातम्या व बतावण्या दिशाभूल करणाऱ्या आहेत. अर्थात, हे सध्याचे ढळढळीत राजकीय वास्तव आहे!



**एकत्र निवडणुकीचा मोदी पवित्रा :**

'हिंदू राष्ट्र' हा राष्ट्रीय स्वंयसेवक संघ व त्यांचे निवडणूक अंग जनसंघ व भारतीय जनता पक्ष यांची मूळ व मुख्य भूमिका आहे. मुसलमान व ख्रिश्चन त्यांना कायम शत्रू वाटतात. एवढेच नव्हे, तर मनुवादी भूमिकेला अनुसरून दलित व स्त्रिया यांच्याबाबत हिंदुत्ववाद्यांचा उपहास व तुच्छतेचा व्यवहार सर्वश्रुत आहे. वर्णवर्चस्ववादी भूमिकेला मिथ्या व संकुचित राष्ट्रवादाशी जोडून ते कायम ध्रुवीकरणाचे मुद्दे शोधत राजकीय पोळी भाजत आले आहेत. किंबहुना, हेच त्यांचे हुकमी निवडणूक तंत्र असून त्याला पाजळण्यासाठीच त्यांनी 'एक देश-एक निवडणूक' हे ब्रम्हास्त्र वापरले आहे.

नेमका काय युक्तीवाद आहे भाजप व मोदींचा? सर्वात सोपा, सकृत्दर्शनी 'ठीक' वाटणारा मुद्दा सांगतात तो 'निवडणूक खर्चाचा'! निती आयोगाच्या अभ्यासानुसार, लोकसभा व विधानसभेच्या निवडणुका एकत्र घेतल्यास साडेपाच हजार कोटी रुपयांची बचत होईल. याबाबत एक महत्त्वाचा राजकीय मुद्दा म्हणजे संघराज्य पद्धतीत 'एकत्र निडणूक'अनाठायी आहे. बचतच करायची असेल तर आपण जे १२ लाख कोटी रुपयांचे पेट्रोलियम पदार्थ दरवर्षी आयात करतो, त्यात करता येईल. किमानपक्षी निवडणुकीत कुणीच पेट्रोल-डिझेलचा वापर करू नये! अदानी-अंबानी व अन्य सर्व खासगी कंपन्यांची तसेच वायूदलाची व शासकीय विमाने कुणीच वापरू नये! हे एक मासलेवाईक उदाहरण आहे. मात्र, अशी अगणित उदाहरणे आहेत जेथे बचत करणे सहज शक्य आहे. निवडणुकीत नव्हे तर सदासर्वकाळ...

तात्पर्य, खर्च व वेळ बचतीचा मुद्दा तसा फार जुजबी आहे. १०० रुपये एकूण खर्चातून केवळ २ पैसे (होय, फक्त दोनच) वाचवण्यासाठी केल्या जाणाऱ्या या खटाटोपाची एकंदर सामाजिक-आर्थिक-राजकीय लोकशाही किंमत फार जबर आहे! एकंदरीत विचार करता, एकत्र निवडणूक घेण्याची तांत्रिक शक्यता या शाळकरी मुद्याआड दडलेले आजचे राजकीय षड्यंत्र फार भयंकर असून संघराज्यीय व विकेंद्रीकरणाला ते मोडीत काढणारे आहे. हिमाचल व कर्नाटक विधासभांच्या निवडणुकीनंतर भाजपची सर्व मदार मोदी करिष्म्यावर आहे. अर्थात मोदींचे गारूडदेखील कमी होत असले तरी त्यांच्याकडे सांगण्यासारखे अन्य काय आहे? होय, राममंदिर, ३७० कलमानंतर 'समान नागरी कायदा' हे एक भावनिक साद घालण्याचे, ध्रुवीकरणाचे आयुध आहे. मात्र, तेवढे पुरेसे नाही याची जाणीव त्यांना 'इंडिया'च्या पाटणा, बंगळुरू, मुंबई बैठकांतील 'एक एक पाऊल पडे पुढे' नंतर प्रकर्षाने होत आहे. (यासाठी तर तडकाफडकी) 'इंडिया व्हॉट इज भारत' ऐवजी फक्त 'भारत' अशा देशाच्या नामोल्लेखातील बदल जारी केला! सोबतच संसद अधिवेशनाची व रामनाथ कोविद समितीची घोषणा.

**गांधीहत्या करणारे 'राष्ट्रवादी':**

कहर म्हणजे हे सर्व धूर्त राजकीय आडाखे अवलंब करायचे व शहाजोगपणे म्हणायचे, की यात राजकारण नाही. सरळ शेण न म्हणता पंचगव्य म्हणण्याची संघ शिकवण कसे विसरणार? मग हे सर्व आहे काय? तर म्हणे राष्ट्रहित! शेवटी, अफलातून बातम्यांचे मोदी विश्वगुरू... भाजप व त्यांच्या कट्टर हिंदुत्ववादी राजकारणाचा साकल्याने विचार केल्यास हे स्पष्ट जाणवते, की त्यांचे देशप्रेम व राष्ट्रवाद फार भोंदू व निखालस खोटे आहे. एक तर त्यांचा स्वातंत्र्य

चळवळीत सहभाग नव्हताच. उलटपक्षी ते सत्ताधार्जिणे होते. दुसरे, महात्मा गांधींच्या हत्येस ते मुख्यत: कारणीभूत आहेत. ते गोडसे कृत्याला 'वध' म्हणतात! भले मोदीजींनी राजघाट येथील गांधी समाधीवर नुकतेच जागतिक नेत्यांच्या साक्षीने नमन केलेले फोटो झळकत असो. त्यांच्या लालकिल्यावरील भाषणात एकदाही गांधी हत्येचा, गोडेसे कृत्याचा निषेध, धिक्कार केला नाही. हे सर्व स्पष्ट दर्शविते त्यांचे महात्मा गांधीप्रेम किती बेगडी आहे! वाराणसीला गांधीसंस्था बुलडोझर फिरवायला साबरमती आश्रमाला पंचतारांकित पर्यटन केंद्र करायला मोदी-योगी-शहा हिरिरीने पुढाकार घेतात!!

एकत्र निवडणुकांद्वारे खर्च वाचवण्याची आवई उठवताना मोदीजी विसरतात, की जुने संसद भवन सुस्थितीत, शाबुत असताना ते हजारो कोटी खर्चून नवे संसद भवन बांधतात, बुलेट ट्रेनच्या व अन्य अनाठायी प्रकल्पांच्या उभारणीवर लाखो कोटी खर्च करण्यास सदैव उत्सुक असतात! या सर्वांमध्ये पर्यावरणाचा राजरोज विध्वंस करून भारतमातेला विद्रूप करतात व 'वसुधैव कुंटूंबकमचा' ऊठबस जयघोष करतात! अगडबंब पुजाऱ्यांना साक्षी ठेऊन संसद भवनाचे सोहळे (?) नसून उद्घाटन करतात. मात्र, राष्ट्रपती असलेल्या आदिवासी महिलेला त्या संमारंभापासून दूर ठेवतात! ही संविधानाची सरळसरळ पायमल्ली व प्रतारणा नाही तर अन्य काय? अर्थात, याचा अचंबा वाटू नये कारण की ते राजकारणाला जुमला मानतात. रामाला पोलिंग एजंट बनविणे हाच मुख्य मामला!!



**निवडणूक रोखे, विमाने, वाहिन्या सर्व काही मोदीमय:**

उपर्निर्दिष्ट देशकालस्थिती व राजकीय वास्तव नीट ध्यानी घेऊन निवडणुकांचे प्रयोजन मुळी कशासाठी, कुणासाठी आहे, याचा प्रत्येकाने गांभीर्याने विचार करणे हे देशासमोरील मुख्य आव्हान आहे. एक बाब तर सूर्यप्रकाशाइतकी सत्य आहे, की निवडणुका व जनमताचा कौल याला लोकशाही व्यवस्थेत अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्या निकोप, निर्भय, मुक्त वातावरणात व्हाव्यात याची नितांत गरज आहे. त्यासाठीच तर स्वतंत्र 'निवडणूक आयोगाची' संविधानात्मक तरतूद आहे. मात्र, निवडणूकांवर सत्ताधारी वर्ग व धनशक्तीच्या प्रभावामुळे लोकशाही ही थैलीशाहीची बटिक होते. उद्योगपती, बडे व्यापार उदिमवाले, कंत्राटदार, भूमाफिया, शिक्षणमाफिया, दारुमाफिया सत्तेतील पक्षाला सत्तेत येऊ घातलेल्याला पक्ष व पुढाऱ्याला रसद पुरवितात हे वेगळे सांगण्याची गरज नाही, की हा प्रामुख्याने काळा पैसा असतो! जेटली यांनी याला निवडणूक रोख्याद्वारे 'सभ्य मुखवटा' दिला! अर्थात, उद्योगपतींच्या 'वैध रोखे' व अवैध रोखीबरोबरच विमाने व अन्य संरजाम नरेंद्रभाई व अन्य बड्या पुढाऱ्यांच्या दिमतीला काल होती, आज राहतील! खेरीज सरकारी सेवासुविधा आहेतच!! थोडक्यात, काळ्या पैशाचा ओघ ज्याला आपल्याकडे खेचता येतो तो मैदान गाजवतो. साहजिकच 'जो जीता वो सिंकदर बनतो'! तर असे आहे निवडणुकीचे मोदीकृत व्यवहारइंगित!!

**मूलभूत निडणुक सुधारणा केव्हा?:**

दिनेश गोस्वामी तसेच इतर काही समित्या व अभ्यासकांनी निवडणुका पक्षांच्या लोकहित, लोककल्याण, राष्ट्रीय व स्थानीय विकास या मुद्यांवर केंद्रित असाव्यात यासाठी काही ठोस उपाय सुचविले आहेत. आज जनसंपर्क माध्यमांचा सर्वदूर एवढा विस्तार झाला आहे, की नेत्यांना विमाने व मोटारगाड्यांच्या ताफ्यात प्रचारदौरे करण्याची अजिबात जरूरी नाही. प्रत्येक पक्षाने आपला जाहीरनामा लिखित स्वरूपात जारी करावा. स्थानिक कार्यकर्ते व नागरिकांनी ते मोहल्ला, वस्ती, गाव, पाडे पातळीवर लोकांना समजून सांगावे. निवडणूक आचारसंहितेचे काटेकोर पालन केले नाही, तर त्याची सत्त्वर दखल घेऊन कारवाही करण्याची जबाबदारी प्रशासन व न्यायालये यांची असेल. विशेष म्हणजे, दरएक लोकसभा व विधानसभा मतदारसंघात आयकर व अन्य स्थानिक कर अधिकाऱ्यांनी बारकाईने लक्ष ठेवावे. तशी विवाक्षित जबाबदारी दरएक अधिकाऱ्यास दिली जावी. सारांश, एकत्र निवडणूक अगर 'एक देश-एक निवडणूक' ही संकल्पना संघराज्य राजकीय व्यवस्थेला, प्रशासन व कारभार यंत्रणेच्या स्वातंत्र्य व स्वायत्ततेला बाधा आणणारी आहे, याबाबत तिळमात्र शंका नाही. २०२३ या वर्षातील विधानसभेच्या व २०२४ मधील लोकसभा निवडणूक त्या त्या मुदतीच्या कक्षेत वेगवेगळ्या होणे, ही आज भारतीय लोकशाहीची तातडीची गरज आहे. ●●●

**(लेखक विख्यात अर्थतज्ज्ञ असून महाराष्ट्र राज्य नियोजन मंडळाचे माजी सदस्य आहेत.)**

# ‘एक देश - एक निवडणूक’ संघाचा देशहितविरोधी कार्यक्रम



डॉ. भालचंद्र कांगो

**भारत हा विविधतेने नटलेला देश आहे. विविध धर्म, भाषा, जाती, समूह यांच्या एकत्रित येण्याच्या प्रक्रियेत भारत देशाची, संस्कृतीची व एकजुटीची निर्मिती झाली आहे. भारतीय घटना त्यामुळेच या विविधतेची दखल घेऊन संघ राज्य संकल्पना मांडून एकच लोकशाही देश ही संकल्पना मांडते. निवडणूक हा लोकशाहीचा आवश्यक भाग आहे.**

१९५२ साली घटनानिर्मिती झाल्यावर पहिल्यांदाच विधानसभा व लोकसभेच्या निवडणुका एकत्र झाल्या. त्यानंतर १९५७ सालीही झाल्या; परंतु केरळचे कम्युनिस्ट सरकार तत्कालीन केंद्र सरकारने ३५६ कलमाचा दुरुपयोग करून बरखास्त केल्यामुळे व नंतर अनेक राज्यांत दलबदलू पक्षांच्या व प्रतिनिधींच्या भूमिकांमुळे विधानसभेच्या निवडणुका स्वतंत्रपणे होऊ लागल्या. घटनेप्रमाणे ५ वर्षांचा कालावधी हा निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना दिला जातो; परंतु काही कारणास्तव सरकार व निवडून आलेली आघाडी बरखास्त झाली तर परत निवडणुका घ्याव्या लागतात. त्यामुळेच आज देशभरात अनेक विधानसभेच्या निवडणुका कधी लोकसभेच्या आधी वा नंतर होतात.

लोकसभेबरोबरच राज्य विधानसभेच्या निवडणुकांचा आग्रह कशामुळे, हा प्रश्न विचारला जात आहे! खर्च कमी करण्यासाठी हा खटाटोप आहे, असे सांगितले जाते; परंतु जगातील तीन नंबरची अर्थव्यवस्था होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या देशाला, मोठ्या भांडवलदारांना, १५ लाख कोटी रुपयांची कर सवलत देणाऱ्या देशाला निवडणुकीचा खर्च पेलत नाही, हे म्हणजे धाडसाचे व न पटणारे आहे. खरे कारण वेगळेच आहे.

भाजपने सन २०१४ पासून राज्यपालपदांचा दुरुपयोग करून विरोधी पक्षांच्या राज्य सरकारांना त्रास देणे कायम ठेवले आहे. दुसरीकडे, अनेक राज्यांत भाजपचा पराभव होऊन विरोधी पक्षांची सरकारे येत आहेत. नुकतेच कर्नाटक व हिमाचल प्रदेशमध्ये काँग्रेसचे शासन आले, तर आता होणाऱ्या निवडणुकांमध्ये छत्तीसगड, राजस्थान, मध्यप्रदेश या राज्यांत भाजपच्या विजयाच्या आशा मावळत चालल्या आहेत. या पार्श्वभूमीवर या राज्य सरकारची मुदत संपल्यावर राष्ट्रपती राजवट लादून तिथे किमान ३-४ महिने केंद्रामार्फत राज्य कारभार करावा हा उद्देश आहे. कारण या राज्यांच्या निवडणुका लोकसभेबरोबर घेणे म्हणजे लोकसभेच्या निवडणुका आधी घेणे, हा प्रयोग वाजपेयी यांच्या काळात झाला होता व त्यात भाजपचा पराभव झाला होता. हे सर्वांना ज्ञात आहे व त्यामुळे हा प्रयोग करण्याचे प्रयत्न होणार नाहीत, जरी याची चर्चा जोरात चालू आहे. विरोधी पक्षांच्या ‘इंडिया’ आघाडीला तयारीला वेळ मिळू नये म्हणून हा प्रयोग होण्याच्या शक्यता वर्तवल्या जात आहेत.

खरे कारण वेगळे व स्पष्ट आहे. लोकांच्या अपेक्षा वाढत आहेत व सध्याच्या अर्थव्यवस्थेत त्या पूर्ण होण्याच्या शक्यता कमी होत आहेत. अशा वेळेस देशभर राज्य शासनाच्या दमनकारी यंत्रणेला कामाला लावून जनअसंतोषावर मात करण्यासाठी मजबूत केंद्र शासन ही संकल्पना आहे.

या आधी २०१८ मध्ये न्यायमूर्ती बी.एम. चौहान यांच्या नेतृत्वाखालील लॉ कमिशनने या संदर्भात एक अहवाल सादर केला होता. त्यात त्यांनी स्पष्टपणे सध्याच्या घटनेच्या आधारे हे शक्य नाही, असे नमूद केले होते. १९५१ च्या पीपल्स रिप्रेझेंटेटिव्ह ॲक्ट व लोकसभेच्या व राज्य विधानसभेच्या नियमांत सुधारणा कराव्या लागतील व हे सर्व करण्यासाठी किमान ५० टक्के राज्यांची संमती लागेल. या आधी न्यायमूर्ती जीवन रेड्डी यांच्या कमिशनने १९९९ साली एकाच वेळी लोकसभा-विधानसभा निवडणुका घ्याव्यात, ही सूचना केली होती; परंतु हे करण्यासाठी घटनेच्या कलम ८३(२) व १७२ मध्ये बदल करावा लागेल.

त्याचबरोबर सध्या दरमाणशी होणारा खर्च २७ रु. प्रतिनागरिक प्रतीवर्ष खर्च न परवडणारा आहे, हे कसे म्हणता येईल (जी-२० चा होणारा खर्च या पार्श्वभूमीवर तपासून पाहावा.)

तसेच माजी राष्ट्रपती आदरणीय रामनाथ कोविंद यांना शासनाने या संदर्भात नेमलेल्या समितीचे प्रमुखपद दिले होते. ते योग्य आहे काय? माजी राष्ट्रपतींनी या वादात पडावे काय, असेही प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

विरोधी पक्षांच्या ‘इंडिया’ आघाडीमुळे व कर्नाटक, हिमाचल प्रदेशच्या पराभवानंतर केंद्रातील भाजप शासन गांगरून गेले आहे व म्हणूनच एन.डी.ए.ची त्यांना आठवण झाली आहे व आता खर्चाचा मुद्दा उभा करून खऱ्या जनप्रश्नांना बगल देण्यासाठी हा नवीन मुद्दा भाजपमार्फत उपस्थित केला आहे, असाही आरोप करण्यात येत आहे.

**(लेखक मार्क्सवादी विचारवंत, भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राष्ट्रीय सचिव, शेतकरी, कामगार चळवळीचे सक्रिय मार्गदर्शक आहेत.)**

# भाजपसाठी हिंदुत्व हाच खरा खेळ!

**केंद्र सरकार योजना राबवते, त्या यशस्वीही होतात. पण लोकसभेच्या निवडणुकीत भाजपला फक्त हिंदुत्व जिंकून देते. भाजपने हिंदुत्व सोडले, तर भाजपला केंद्रात कधीही सत्ता मिळणार नाही!... हे भाजप नेत्याचे म्हणणे ऐकले की खात्री पटते, की भाजपचा सत्तेचा खेळ हिंदुत्वाभोवती फिरतो. या खेळाला मदत करणाऱ्या, उपयुक्त ठरणाऱ्या नेत्यांना भाजपमधून पाठिंबा मिळतो.**

**विचक्षण बोधे**

जे मनात असते ते कधी ना कधी जिभेवर येतेच. भाजपचे लोकसभेतील खासदार रमेश बिधुरींच्या मनातील मुस्लिमद्वेष आपोआप बाहेर आला. त्यांनी बहुजन समाज पक्षाचे खासदार दानिश अली यांना मुस्लिम धर्मावरून शिवीगाळ केली. आता कोणाला वाटेल, की भर लोकसभेत बिधुरींनी द्वेषमूलक विधाने केली असतील, तर त्यांच्याविरोधात भाजप कडक कारवाई करेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी तर नेहमी 'सबका साथ, सबका विकास' असा नारा देतात. देशातील प्रत्येक नागरिकाला विकासाची समान संधी मिळाली पाहिजे, असे सांगतात. मग मोदींनी स्वपक्षाच्या खासदाराविरोधात बोलले पाहिजे, असेही कोणाला वाटू शकेल. असा निष्पक्ष विचार करणारे लोक देशात तुलनेत कमी झालेले आहेत. ज्यांनी २०१४ व २०१९ मध्ये भाजपला मते दिली, त्यांचे भाजपला मते देण्यामागील मुख्य कारण मुस्लिमविरोध हेच होते. त्यामुळे बिधुरींनी संसदेच्या विशेष अधिवेशनाच्या काळात लोकसभेत केलेले आक्षेपार्ह विधान तमाम मुस्लिमविरोधी हिंदुत्ववाद्यांच्या मनातील वाक्य होते. भाजपच्या मतदारांना जे हवे तेच बिधुरी करणार असतील, तर भाजप वा मोदी आपल्या खासदाराविरोधात कशासाठी कारवाई करतील? भाजप बिधुरींविरोधात कधीही कारवाई करणार नाही. केलीच तर ती इतकी थातूरमातूर असेल, की त्याची दखलही कोणी घेणार नाही. उलट बिधुरी यांच्या कृत्याची त्यांना बक्षिसी दिली जाईल. हा भाजपचा दुटप्पी चेहरा असून तो सातत्याने उघडा होत आहे.



**...असा त्याचा स्पष्ट अर्थ होतो**

भाजपचे दक्षिण दिल्लीतील खासदार रमेश बिधुरींना निवडून देणारे मतदार उच्च मध्यमवर्गीय, उच्चशिक्षित आहेत. या मतदारांना सारासार विचार करता येतो. तरीही समाजाच्या वरच्या स्तरात वावरणाऱ्या मतदारांनी बिधुरींसारख्या उठवळ उमेदवाराला निवडून दिले आहे. जिथे जिथे उच्च मध्यमवर्गीय, उच्चशिक्षित मतदारांचे प्रमाण अधिक आहे, तिथे भाजपचे कडवे हिंदुत्ववादी उमेदवार निवडून आले आहेत. दक्षिण दिल्लीप्रमाणे बंगळुरूमधून भाजपचे तेजस्वी सूर्या लोकसभेचे खासदार बनले आहेत. हे तेजस्वी सूर्याही कडवे हिंदुत्ववादी आहेत, स्त्रियांसंदर्भातील त्यांची मते जगजाहीर आहेत. देशातील हा वर्ग गेल्या नऊ वर्षांमध्ये अधिकाधिक आक्रमक हिंदुत्ववादी होत गेला असून बिधुरी वा सूर्या यांच्यासारखे भाजपचे नेते या मतदारांचे हिरो बनलेले आहेत. या नेत्यांना भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष पाठिंबा आहे. अन्यथा बिधुरींच्या विधानांवर पंतप्रधान नरेंद्र मोदी वा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, भाजपचे कोणतेही अधिकार नसलेले राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी आक्षेप घेतला असता, बिधुरींवर उघडपणे टीका केली असती, त्यांना जाहीरपणे समज दिली गेली असती, त्यांना सार्वजनिक माफी मागायला लावली गेली असती; पण यापैकी काहीही घडलेले नाही. उलट, बिधुरी यांच्याकडे राजस्थानातील विधानसभा निवडणुकीत टोंक मतदारसंघाची जबाबदारी देण्यात आली आहे. बिधुरी यांनी बहुजन समाज पक्षाचे खासदार दानिश अली यांच्यावर केलेली शिवीगाळ उचित होती, असे मोदी व शहा मानतात असा त्याचा स्पष्ट अर्थ होतो.

**दानिश अली यांची चहूबाजूने कोंडी करण्याचा प्रयत्न**

बहुजन समाज पक्षाच्या सर्वेसर्वा मायावती यांनी भाजपच्या भीतीने राजकारणातून जणू निवृत्ती घेतली आहे. त्या भाजपविरोधात बोलत

नाहीत, २०२२ च्या उत्तर प्रदेशातील विधानसभा निवडणुकीतही त्या सक्रिय नव्हत्या. त्याचा मोठा लाभ भाजपला मिळाला होता. पण त्यांचे लोकसभेतील खासदार दानिश अली सभागृहात भाजपविरोधात सातत्याने आक्रमक भूमिका घेताना दिसतात. विद्यमान लोकसभेत असणाऱ्या मुस्लिम खासदारांमध्ये दानिश अली सर्वात आक्रमकपणे भाजपविरोधातील बाजू लढवत असतात. त्यांनी अनेकदा मोदींसह भाजपच्या मंत्री-नेत्यांच्या भाषणांमध्ये हस्तक्षेप करून त्यांच्यावर आक्षेप घेतले आहेत. संसदेच्या पावसाळी अधिवेशनामध्ये मोदी सरकारविरोधात अविश्वास ठरावावर चर्चा सुरू असताना संसद टीव्हीवर केंद्र सरकारच्या योजनांची माहिती देणारा स्क्रोल चालवला जात होता. एखाद्या सरकारविरोधात सभागृहात चर्चा होत असेल, तर संसदेच्या टीव्हीवरून सरकारची जाहिरात कशी केली जाऊ शकते, असा अत्यंत योग्य आक्षेप दानिश अली यांनी घेतला होता. त्यांच्या या आक्षेपावरून लोकसभेत गदारोळ झाला होता. केंद्रीय संसदीयमंत्री प्रल्हाद जोशी यांनी संबंधित स्क्रोलचे समर्थन केले होते. पण अखेर लोकसभाध्यक्ष ओम बिर्ला यांनी चुकीची दुरुस्ती करण्याचा आदेश दिला. त्यानंतर सरकारची जाहिरातबाजी थांबली. 'बसप'च्या दानिश अलींनी हा आक्षेप घेतला नसता, तर बिनदिक्कत ही जाहिरातबाजी सुरू राहिली असती. दानिश अलींचा हा आक्रमकपणा भाजपला खटकत होता, त्यांच्याविरोधातील राग मनात साठून राहिला होता. भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाला आव्हान देणारे नेते पसंत नाहीत, त्यांना कुठल्या ना कुठल्या पद्धतीने समज दिली जाते. अनेकांच्या विरोधात ईडी-सीबीआयच्या चौकशीचा ससेमिरा लावला जातो. दानिश अली यांच्यासारख्या मुस्लिम नेत्यांवर राष्ट्रद्रोही असल्याचा आरोप करून नामोहरम केले जाते. त्यांचे मानसिक खच्चीकरण केले जाते, त्यांचा आत्मविश्वास मोडून काढला जातो. त्यांची लढण्याची उर्मी नष्ट केली जाते. भाजपने बिधुरींसारख्या खासदाराच्या माध्यमातून दानिश अली यांची चहूबाजूने कोंडी करण्याचा प्रयत्न केला आहे.



**हे केवळ बिनबुडाचे आरोप**

देशातील मुस्लिमविरोधी हिंदू बहुसंख्याक मुस्लिमांबद्दल ज्या निष्कृष्ट स्तरावर टिप्पणी करतात, ते शब्द सार्वजनिक व्यासपीठावर उच्चारले जात नाहीत. पण त्या शब्दांमागील अत्यंत वाईट भावना काय असते, हे या बहुसंख्याकांना माहिती आहे. बिधुरींनी त्यांच्या वाईट भावना थेट लोकसभेत बोलून दाखवल्या आणि त्याबद्दल त्यांना कसलीही लाज वाटली नाही. बिधुरी यांनी दानिश अली यांना मुस्लिम धर्मावरून दूषणे दिली, त्यांना अतिरेकी, दहशतवादी म्हणाले. बिधुरींच्या विधानांमधील एक-एक शब्द इतका द्वेषमूलक आहे, की त्यांना लोकसभाध्यक्ष ओम बिर्ला यांनी तातडीने निलंबित करायला हवे होते. संसदेच्या सभागृहात एक सदस्य जाहीरपणे दुसऱ्या सदस्याला दहशतवादी म्हणत असेल, तर त्याचे पुरावे द्यायला हवेत. एखाद्याला दहशतवादी म्हणणे गंभीर बाब ठरते. दानिश अली खरोखरच दहशतवादी असतील, तर त्यांच्या विरोधात गुन्हा नोंदवला गेला पाहिजे. त्यांना राष्ट्रीय तपास यंत्रणेने (एनआए) ताब्यात घेतले पाहिजे. त्यांची चौकशी व्हायला हवी. बिधुरी यांच्या विधानामागील सत्यता तपासली पाहिजे, त्यासाठी 'एनआयए'ने बिधुरींनाही साक्ष नोंदवण्यासाठी बोलावले पाहिजे. दानिश अली खरोखरच दहशतवादी असतील, तर भाजपने त्यांच्या चौकशीची मागणी केली पाहिजे. पण यापैकी काहीही घडलेले नाही. म्हणजे बिधुरी यांनी दानिश अलींना दिलेली दूषणे हे केवळ बिनबुडाचे आरोप आहेत. संसदेला मोदी लोकशाहीचे मंदिर म्हणत असतील, तर त्यांनी लोकशाही टिकवण्यासाठी दानिश अलींना पाठिंबा द्यायला हवा होता. त्यांनी बिधुरींची भाजपमधून गच्छंती करून त्यांची चौकशी सुरू करायला हवी होती. पण मोदी असे काहीही करणार नाहीत. भाजपच्या दृष्टीने बिधुरींचे वर्तन योग्य असून त्याचा राजकीय लाभ आगामी विधानसभा तसेच लोकसभा निवडणुकीत मिळवण्याचा प्रयत्न केला जाईल असे दिसते.

**भाजपचा सत्तेचा खेळ हिंदुत्वाभोवती फिरतो**

भाजपच्या नेत्याने एका माजी मुख्यमंत्र्यावर टीका करताना हिंदुत्वाचे महत्त्व समजावून सांगितले होते. भाजपचे दिल्लीतील हे नेते म्हणाले, की माजी मुख्यमंत्री राष्ट्रीय स्तरावरील नेते होऊ शकत नाहीत. उत्तर प्रदेशमध्ये मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी आक्रमक हिंदुत्वाच्या जोरावर राज्य ताब्यात ठेवले, तसे संबंधित माजी मुख्यमंत्र्यांना करता आले नाही. उत्तर प्रदेशमध्ये अल्पसंख्याकांवर बुलडोझर चालवण्याची हिंमत योगींनी केली हेच धोरण अवलंबले, तर माजी मुख्यमंत्र्याला राजकीय भवितव्य आहे, अन्यथा त्यांच्यासारखे अनेक नेते भाजपमध्ये आहेत. ते कदाचित वरची पायरी चढू शकणार नाहीत. केंद्र सरकार योजना राबवते, त्या यशस्वीही होतात. पण लोकसभेच्या निवडणुकीत भाजपला फक्त हिंदुत्व जिंकून देते. भाजपने हिंदुत्व सोडले, तर भाजपला केंद्रात कधीही सत्ता मिळणार नाही!... हे भाजप नेत्याचे म्हणणे ऐकले की खात्री पटते, की भाजपचा सत्तेचा खेळ हिंदुत्वाभोवती फिरतो. या खेळाला मदत करणाऱ्या, उपयुक्त ठरणाऱ्या नेत्यांना भाजपमधून पाठिंबा मिळतो. रमेश बिधुरींना भाजप पाठीशी का घालत आहे,

याचा उलगडा भाजप नेत्याच्या मतांमधून होऊ शकतो.

**राहुल गांधींच्या सहहृदयी भावना लोकांपर्यंत पोहोचल्या**

संसदेच्या विशेष अधिवेशनातून रमेश बिधुरींनी भाजपच्या लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराची सुरुवात केली आहे. बिधुरींनी केलेला विखारी प्रचार इतरही भाजपचे नेते करू लागतील. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राजस्थानमधील जाहीर सभेत काँग्रेसला शहरी नक्षलींचा गरडा पडल्याचा आरोप करून लोकसभा निवडणुकीतील भाजपच्या प्रचाराची दिशा कशी असेल, याचे संकेत दिले आहेत. २०१४ व २०१९ च्या लोकसभा निवडणुकीतील मोदींची लोकप्रियता कायम राखणे भाजपसाठी मोठे आव्हान ठरू लागले आहे. आत्तापर्यंत भाजपच्या आयटी विभागाने समाजमाध्यमांचा वापर करून मोदींची लोकप्रियता टिकवली होती. पण समाजमाध्यमांच्या खेळात काँग्रेसही आता तरबेज झालेला आहे. त्यांच्या आयटी विभागाकडून भाजपला सडेतोड उत्तर दिले जाते. भाजपच्या दाव्यांतील फोलपणा काँग्रेसकडून उघड केला जात आहे. काँग्रेसच नव्हे, तर सामान्य लोकही मोदींवर मिम्स बनवू लागले आहेत. मोदींवर झालेली टीका भाजपचे कार्यकर्ते सहन करणार नाहीत. पण समाजमाध्यमांवर ते कोणाकोणाला रोखू शकतील? निवडणुकीच्या राजकारणासाठी समाजमाध्यमांचा अचूक वापर भाजपने पहिल्यांदा केला हे खरे. पण याच माध्यमाचा इतरही उपयोग करू लागले आहेत. या माध्यमावर भाजपची मक्तेदारी राहिलेली नाही. त्यामुळे मोदींच्या मक्तेदारीलाही काँग्रेसकडून धक्का दिला जात आहे. काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधींच्या सार्वजनिक कार्यक्रमांचा प्रचार समाजमाध्यमांवरून केला जाऊ लागला आहे, त्याला प्रतिसादही मिळू लागला आहे. बिधुरींच्या आक्षेपार्ह वर्तनानंतर दानिश अलींना भेटायला राहुल गांधी त्यांच्या घरी गेले होते. या दोन्ही नेत्यांच्या गळाभेटीवरून भाजपने कितीही आरोप-प्रत्यारोप केले असले, तरी राहुल गांधींच्या सहहृदयी भावना लोकांपर्यंत पोहोचल्या आहेत. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेससह 'इंडिया'ची महाआघाडी भाजपला तगडे आव्हान देऊ शकेल, याची जाणीव भाजपच्या नेत्यांना झालेली आहे. केंद्रातील सत्ता टिकवायची असेल, तर पुन्हा एकदा आक्रमक हिंदुत्वाचा आधार घेतला पाहिजे, असे भाजपला कळले असल्यामुळेच बिधुरींसारख्या नेत्यांच्या ध्रुवीकरणाला हातभार लावणाऱ्या विधानांकडे दुर्लक्ष केले जात आहे.

२०२४ ची लोकसभा निवडणूक जिंकण्यासाठी धर्माच्या आधारावर बहुसंख्याकांची मते मिळवणे हा एकमेव पर्याय उरला असावा, असे दिसते. त्यामुळे आगामी काही महिन्यांमध्ये भाजपचे नेते उघडपणे मुस्लिमविरोधी बोलू लागले, तर नवल वाटणार नाही. उत्तर प्रदेशमधील शाळेतील शिक्षिकेने मुस्लिम विद्यार्थ्याला दिलेल्या वागणुकीवरून कितीही गदारोळ झाला असला, तरी भाजपने चकार शब्द काढलेला नाही. बिल्किस बानो सामूहिक बलात्कार व हत्येच्या प्रकरणात सर्व दोषींना जन्मठेपेची शिक्षा झाली असतानाही त्यांची चांगल्या वर्तवणुकीच्या नावाखाली तुरुंगातून सुटका करण्यात आली. या दोषींचे मिठाई वाटून स्वागत केले. त्यावर भाजपच्या केंद्रीय नेत्यांनी प्रतिक्रिया दिली नाही. मुस्लिमविरोधी घटनांवर मौन बाळगणे हे अप्रत्यक्षपणे भाजपकडून दिलेला पाठिंबा असतो, असे म्हणता



येऊ शकेल. निवडणूक नजिक आली, की भाजपकडून शहरी नक्षल, तुकडे तुकडे गँग, मुस्लिमविरोध हे मुद्दे ऐरणीवर आणले जातात. जेएनयूमध्ये भारतविरोधी घोषणा दिल्याचा खोटा प्रचार भाजपने केल्यानंतर तुकडे तुकडे गँग हा शब्दप्रयोग वापर जाऊ लागला. वास्तविक, लोकसभेतील लेखी उत्तरामध्ये अशी कोणतीही गँग नसल्याचे स्पष्टीकरण मोदी सरकारकडून देण्यात आले आहे. तरीही केंद्रीय गृहमंत्री अमित शहांपासून भाजपचे तमाम नेते तुकडे तुकडे गँगचा उल्लेख करून ध्रुवीकरणाला प्रोत्साहन देत असतात. भाजपचे केंद्रीय नेतृत्व या अपप्रचारात सहभागी असेल, तर कोण-कोणावर नियंत्रण ठेवणार? मग, बिधुरींनी अश्लाघ्य भाषा वापरली तर त्यांना कोण रोखणार? पूर्वीही भाजप नेत्यांच्या प्रक्षोभक भाषणांची केंद्रीय निवडणूक आयोगानेही दखल घेतली नव्हती. दिल्लीच्या विधानसभा निवडणुकीत 'गोली मारो...' असे जाहीर प्रचारात म्हणणारे नेते अनुराग ठाकूर हे मोदींच्या सरकारमध्ये केंद्रीय महिती व प्रसारण मंत्री आहेत. त्यांचे 'गोली मारो...' हे विधान कोणाविरोधात होते हे शाहीन बागेतील आंदोलन जवळून पाहणाऱ्यांना माहिती असेल. भाजपमधील बिधुरींचे खासदार सहकारी परवेश वर्मा यांचे दिल्ली विधानसभा निवडणुकीतील प्रचासभेतील भाषण ऐकले असेल, तर त्यांची खासदारकी रद्द का झाली नाही, असे कोणालाही वाटू शकेल. शाहीन बागेत जमलेले (मुस्लिम) लाखो लोक तुमच्या (हिंदूंच्या) घरात घुसतील, तुमच्या बहिणींवर-मुलींवर बलात्कार करतील, त्यांना ठार मारतील. आता तुम्हाला मोदी-शहा वाचवतील; पण भविष्यात ते तुम्हाला वाचवायला येणार नाहीत, असे भाषण वर्मा यांनी केले होते. पण मोदी-शहांनी त्याची दखलही घेतली नाही. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत मोदी-शहांच्या भाषणाविरोधात केंद्रीय निवडणूक आयोगाकडे तक्रार करण्यात आली होती. मोदींविरोधात कारवाई केली पाहिजे, अशी भूमिका घेतलेले तत्कालीन केंद्रीय निवडणूक आयुक्त अशोक लव्हासा यांना आयोग सोडून जावे लागले. मोदी सरकारमधील मंत्री, भाजपचे खासदार, त्यांचे नेते-कार्यकर्ते यांच्या बहुसंख्याकांच्या ध्रुवीकरणाच्या, मुस्लिमांच्या द्वेषाच्या अनेक घटना मांडता येतील. मोदी सरकारने किती योजना राबवल्या आणि विकासाच्या गप्पा मारल्या तरी भाजपच्या राजकारणाचे मूळ हिंदुत्वात असून त्याआधारेच ते केंद्रात टिकून राहण्याची धडपड करत राहतील. ●●●

**(लेखक राजकीय अभ्यासक आहेत.)**

# लोकशाहीच्या मुखवट्याआडून बेबंदशाही!




संजय पवार

**बदलाची मंद झुळूकही सहन करू न शकणारे सत्ताधारी खुनशी होत चाललेत. विषकुपींचे वितरण वेगाने होतेय. ट्रेनमधला रक्षकच वेचून माणसे मारतो आणि सत्ताधीशांचे गुण गातो. यालाच समांतर शिक्षिकेच्या वेषातल्या धर्मांध स्त्रीने सुकुमार बालकांना धार्मिक खेळात जबरदस्तीने ओढले व स्त्री, सुकुमार बालके व शिक्षण या तीनही संज्ञा मातीमोल केल्या. पाणी कुठवर आलंय, असं आपण म्हणतो तसं विष कुठवर झिरपवलंय ते लक्षात येतंय ना?**

लालूप्रसाद यादवांनी काही दशके आधीच भाजप म्हणजे 'भारत जलाओ पार्टी' असं वर्णन केलं होतं. तेव्हा भाजप ना केंद्रीय सत्तेत होती ना मोदी, शहा शीर्ष नेतृत्वस्थानी होती. लालूंच्या या तर्कामागे मंदिर आंदोलन, बाबरी पतन व त्यानंतरच्या दंगली व ध्रुवीकरणाने देशभर पसरवला गेलेला मुस्लिमविद्वेष यांचा संदर्भ होता.

आता एकविसाव्या शतकाच्या तिसऱ्या दशकातील चौथ्या वर्षात शिरताना मंदिर निर्माणाची ध्येयपूर्ती होत असतानी मोदी-शहांच्या भाजपच्या केंद्रीय सत्तेतील एक दशकही पूर्ण होणार आहे. या दशकाअखेरीस केंद्रीय निवडणुका होणार आहेत.



भाजपला या निवडणुका काहीही करून जिंकायच्यात. विजयांची हॅट्ट्रिक हा त्यातला एक भाग. शिवाय एका बिगरकाँग्रेसी पक्षाचा सत्तेत राहण्याचा विक्रम करतानाच नेहरूंच्या पंतप्रधान म्हणून सलग कारकिर्दीचा विक्रमही पुसून टाकायचाय आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे लोकशाही पद्धतीनेच लोकशाहीचा गळा घोटून हिंदूराष्ट्राची मुहूर्तमेढ रचायचीय. या दृष्टीने त्यांनी २०१४ पासूनच तयारी सुरू केलीय. सर्वप्रथम माध्यमं ताब्यात घेतली. नव्या समाजमाध्यमातून जल्पक टोळ्या निर्माण करून शाब्दिक हिंसेची सुरुवात व त्यातूनच पुढे ध्रुवीकरण व प्रत्यक्ष हिंसा पेरायला घेतली. पहिल्या पर्वात मंदिर निर्माण, गोवंशहत्या प्रतिबंधक कायदा यातून मुस्लिम द्वेष व कायद्याच्या नावाने गरीब मुस्लिमांच्या हत्या करून, त्याचे चित्रीकरण करून ते विजयी उन्मादात समाजमाध्यमातून प्रसारित करत विकत आनंद घेत इतर हिंदूंना घराघरात आता हिंदू सहिष्णू हे विसरा व आक्रमक व्हा, हा संदेश पेरला गेला. हे घराघरातले हिंदू गावखेड्यातले गरीब त्याचप्रमाणे शहरी मध्यम, उच्चमध्यम ते शिक्षित, श्रीमंत अनिवासी भारतीय अशा मोठ्या वर्तुळाचे भाग होते.

म्लेंछ, मुसंडे, पाकडे, हिरवे साप, हिरवी अवलाद अशा शब्दांनी मुस्लिमांना आजवर मनातल्या मनात, आपसात वा कुजबूज आघाडीतून हिणवणारे आता छाती फुगवून छद्म हसत समाजात वावरू मिरवू लागले. दोन हजार साली गुजरातेत मोदींनी केलं तेव्हा शांतपणे त्यांना शाबासकी देणारे हे वर्तुळ आता खुलेआम मोदी मोदीचा पुकारा करू लागले. यात भरीस भर म्हणजे नोटाबंदी व अर्धवट जीएसटी अंमलबजावणीही क्रांतिकारी म्हणून उच्चशिक्षित (आणि अर्थातच उच्चवर्णियांकडून) नवहिंदूंनी मुकाट स्वीकारली. धोरणशून्यतेची विकृती कणाकणाने भरली जाऊ लागली.

दुसऱ्या पर्वात तोंडी तलाकबंदी व काश्मीरमधील कलम ३७० (अ) रद्द करून जम्मू काश्मीर राज्याचा राज्यदर्जा काढून ते केंद्रशासित केले. लडाखचा तुकडा वेगळा करून तिथे वेगळाच खेळ खेळला गेला. यातून पुन्हा या ना त्या निमित्ताने या देशातले मुस्लिम केंद्रस्थानी ठेऊन हिंदूंना चेतवत ठेवायचा खेळ सुरू ठेवला गेला. याला नंतर हिजाब, हिंदू सणांनिमित्त सवाद्य मिरवणुका व त्याही मशिदीवरून(च) नेण्याचा हट्ट. यात सरकारपुरस्कृत पोलिसांची अतिसक्रिय वा निष्क्रिय भूमिका. भाजपशासित राज्यांत तर प्रशासनासह पोलिसांच्यातही ध्रुवीकरणाची बीजे पेरण्यात आली. अंकित माध्यमांमुळे यातून घडलेली हिंसा कधीच पृष्ठभागावर आली नाही. भाजपशासित राज्यातील मुस्लिम हा हिंदू जहाल संघटनांसाठी प्रयोगासाठीचा हक्काचा उंदीर झाला! शेपटी पिरगळा, उलटा टांगा नाही तर ज्वलनशील पदार्थ टाकून

पेटवून देऊन टाळ्या पिटा!

काँग्रेससह देशातले विरोधी पक्ष सेक्युलर हा शब्दच विसरले, तिथे ते मूल्य म्हणून जपण्यासाठी ते काय पुढाकार घेणार होते? १९ च्या पराभवानंतर राजीनामा देऊन पक्षाला वाऱ्यावर सोडून स्वत:च्याही राजकीय प्रवासाची वाट नागमोडी करत अमेठीचा पराजय पचवून वायनाड गंभीरपणे घेत 'भारत जोडो' पदयात्रेचे शहाणपण अंगी बाणवायला २०२२ उजाडायला लागले! तोवर नेता म्हणजे मोदी आणि फक्त मोदीच हे समीकरण भक्त, माध्यमे व स्वत: मोदी यांनी इतके मोठे करत नेले, की कोरोनासारख्या जागतिक महामारीत अवघ्या चार तासांच्या पूर्वसूचनेवरून संपूर्ण देशात जाहीर केलेला लॉकडाऊन असो, तो पंधरा-पंधरा दिवसांनी वाढवत तीन महिन्यांपर्यंत नेणे असो. नंतर थाळीवादन, अंधार करून दिवे लावणे असो, की रुग्णालयांवर पुष्पवृष्टी असो की लसीकरण प्रमाणपत्रावर आपला फोटो झळकवणे असो, हे सर्व ठासून बिंबवले वा लादले गेले.

कोरोनाने कंबरडे मोडलेली अर्थव्यवस्था विलगीकरण, सामाजिक अंतर व मृत्यूच्या भयाने भयग्रस्त जनता याचा वापर सरकारी व बिनसरकारी प्रचारयंत्रणा वापरून भाजपाने आपला प्रचार प्रसार विविध योजनांच्या नावाखाली चालूच ठेवला. या दोन वर्षात आधीच्या पाच वर्षात खचलेले विरोधी पक्ष अधिकच खचले. लोकांपर्यंत पोहचण्यात ते अपयशी ठरले.

दरम्यान, भाजपच्या रणनीतिनुसार २०२४ च्या निवडणुकांची सुरुवात २०२१ पासूनच सुरू झाली. कोरोनाकहर संपताच ईडी, सीबीआय या केंद्रीय यंत्रणा सक्रिय करून नेम धरून विरोधी पक्षातील सक्षम नेत्यांना कारागृह, संपत्तीवर टाच व प्रतिमाभंजन याची भीती दाखवत शरण या असे अलिखित फर्मानच धाडण्यात आले. हे फर्मान निव्वळ कागदी नाही हे दाखविण्यासाठी विविध राज्यांत काही महत्त्वाचे विरोधी नेते तुरूंगात व कोर्टाच्या पायऱ्या झिजवताना दिसू लागले. संपत्ती व संस्थानं खालसा होऊ लागली. याउलट ज्यांनी रात्रीत भूमिका बदलली वा समन्स येताच शरणागती पत्करली, त्यांना संपूर्ण अभय व सत्तेत वाटाही देण्यात आला. राजकीय गांडुळांची देशभरची वाढती पैदास बघून जनता हैराण झाली. भलेभले पर्वत जमीनदोस्त झाले. भाषा बदलली, गमछे व टोप्या बदलल्या. देव व आरत्याही बदलल्या.

राजकीय पतन वेगाने होत असताना अन्याय्य कृषी कायद्यांविरोधात वर्षभर अत्यंत शिस्तबद्ध चालवले गेलेले शेतकरी आंदोलन, सी.ए,एन.आर.सी. कायद्याविरोधातील आंदोलने, त्यातला स्त्रियांचा सहभाग व सरतेशेवटी निघालेली 'भारत जोडो' यात्रा यांनी वातावरण बदलायला मदत केली. कृषी कायदे माफी मागत मागे घेण्याची वेळ विश्वगुरूंवर आली. सीएएनआरसी कायदाही बाजूला सारावा लागला, तर हास्यास्पद ठरेल या ठाम विश्वासाने दुर्लक्षित ठेवलेली 'भारत जोडो' यात्रा अंकित माध्यमांच्या अलिखित बहिष्कारानंतरही समाजमाध्यमे व नव्याने बहरत असलेल्या युट्यूब वाहिन्यांनी मुख्य माध्यमांच्या थोबाडीत मारत भारतात चर्चेच्या मध्यवर्ती केंद्रात आणली.

या सर्वांतून आधी खचलेले विरोधी पक्ष पुन्हा उभे राहू लागले. लोकात जाऊ लागले. भाजपच्या महाकाय जल्पक टोळ्यांना प्रतिकार करू लागले. तानाशाहीविरोधात जनतेतूनच विरोधी क्षीण का होईना विरोधी सूर उमटू लागले. याला चूड मिळाली ती वाढती महागाई व बेरोजगारीने. त्यातच विदेशी माध्यमांनी सत्ताधारी व त्यांचा लाडका उद्योगपती यांचे साटेलोटे व गैरव्यवहार जाहीर केले व सरकार अल्पकाळ बॅकफूटवर गेले; पण अल्पकाळच. तरीही साटेलोटे उघड झाले व रस्त्यावरचा माणूसही त्यावर बोलू लागला. कारण शेअर बाजार त्याचा विषय नसला तरी रोजची मंडई त्याला जगावं कसं, असा प्रश्न पाडत होती. आता विश्वगुरू फोल ठरू लागला. भक्तीसंप्रदायातही नाराजीचे सूर दबकत येऊन लगेच झिरपूही लागले. पण भेगा पडायला सुरुवात झाली होती.

अनपेक्षित घडू लागल्याचे संकेत मिळताच सत्ताधीश सावध होऊन आक्रमक झाले. सहिष्णुता आधीच खुंटीवर होती आता विद्वेषाच्या नंग्या तलवारी बाहेर काढण्यात आल्या. प्रशासन व पोलीस यांना 'अधिक कठोर' व्हा चे आदेश गेले. गदारोळी संसदीय कामकाजात सोयीचे कायदे बहुमताच्या जोरावर खुबीने मंजूर करण्यात आले. सेशन कोर्ट ते सुप्रीम कोर्ट सर्वत्र नवे पायंडे पाडायचे ठरवून सुरू झाले. संसद सार्वभौम या संसदीय लोकशाहीच्या तत्त्वाचा दुरुपयोग सुरू झाला आणि संसद सार्वभौम म्हणता म्हणता सत्ताधीश अनिर्बंध होत गेले. परिणामस्वरूप नवी बुलडोजर निती आणली गेली. सकल मोर्चे सुरू झाले. सणवार, यात्रा, जत्रा, मिरवणुका उग्र, उच्चरवात व हिंसक होऊ लागल्या. लक्षपूर्वक लक्ष्य निश्चित करून प्रशासन व पोलिस यांना गुजरात मॉडेल शिकविण्यात आले. अंकित माध्यमांप्रमाणेच न्यायव्यवस्थेतही गरजवंत हेरून त्यांच्या गरजा पूर्ण करून हवा तसा न्याय मिळवता येऊ लागला. ही भयाची नांदी होती आणि खेळ सुरू झाला. विविध राज्यात, शहरात, गल्ल्यात काडी टाकून वणवे पेटवत जायचे विध्वंसक खेळ सुरू झाले. मणिपूर त्यात खाक झाले तर हरियाणा, नोएडात नवे प्रारूप विकसित करण्यात आले.

विरोधी पक्षांना सरकारी यंत्रणांद्वारे व जनतेला प्रशासन व पोलिसांद्वारे धर्मांधतेचे नवे धडे दिले जाताहेत. राजकीय मृत्यू आणि जनतेचे प्रत्यक्ष मृत्यू यांचे तांडव खेळले जातेय. कारण एनडीए व नवनिर्मित इं.डि.या. याबद्दलचे जनमत वेगाने बदलते आहे. बदल होईल इतके बदलत नाहीए; पण कूस बदलतेय व कणाकणाने अंतर कापले जातेय. सर्व साधनसंपत्ती यंत्रणा अनुकूल सत्ताधारी व वरील सर्व घटक प्रतिकुल अशा विषम लढाईची सुरूवात झालीय. पण बदलाची मंद झुळूकही सहन करू न शकणारे सत्ताधारी खुनशी होत चाललेत. विषकुपींचे वितरण वेगाने होतेय. ट्रेनमधला रक्षकच वेचून माणसे मारतो आणि सत्ताधीशांचे गुण गातो. यालाच समांतर शिक्षिकेच्या वेषातल्या धर्मांध स्त्रीने सुकुमार बालकांना धार्मिक खेळात जबरदस्तीने ओढले व स्त्री, सुकुमार बालके व शिक्षण या तीनही संज्ञा मातीमोल केल्या.

पाणी कुठवर आलंय? असं आपण म्हणतो तसं विष कुठवर झिरपवलंय, ते लक्षात येतंय ना? ●●●

**(लेखक ज्येष्ठ नाटककार व विचारवंत आहेत.)**

# नि:पक्ष पत्रकारितेवरील कलंक



अनंत बागाईतकर

**लोकमान्य टिळकांना पत्रकारांनी राजसत्तेची चमचेगिरी करणे अभिप्रेत नव्हते, तर राजसत्तेकडून होणाऱ्या चुका, त्या चुकांच्या परिणामांची जाणीव जनतेला करून देण्याचे काम व कर्तव्य त्यांनी पत्रकारांकडून अपेक्षिले होते. एकदा ही व्याख्या मनात ठेवल्यानंतर सकारात्मक (पॉझिटिव्ह) पत्रकारितेच्या नावाखाली राजसत्तेची चमचेगिरी करण्याची जी सार्वत्रिक व लज्जास्पद प्रवृत्ती व मनोवृत्ती वर्तमान तथाकथित पत्रकारितेत बोकाळलेली दिसते, तिच्यातील पोकळपणा व भंपकपणा लक्षात येईल.**

**पत्रकाराचे काम जागल्याचे असते - लोकमान्य टिळक**

लोकमान्य टिळकांचे हे वचन मुद्दाम येथे उद्धृत करण्याचे कारण त्याला हरकत घेणारा माईचा लाल पुढे येणार नाही. जागल्या हा एक पक्षी आहे आणि तो आगामी संकटाची कल्पना देत असतो. लोकमान्यांनी त्या पक्ष्याचे उदाहरण देऊन पत्रकारांच्या मूलभूत कर्तव्याचे वर्णन केले. इंग्रजीत ज्याला व्हिसल ब्लोअर म्हणतात, त्याच अर्थाने जागल्या शब्द वापरला जातो. म्हणजेच लोकमान्य टिळकांना पत्रकारांनी राजसत्तेची चमचेगिरी करणे अभिप्रेत नव्हते, तर राजसत्तेकडून होणाऱ्या चुका, त्या चुकांच्या परिणामांची जाणीव जनतेला करून देण्याचे काम व कर्तव्य त्यांनी पत्रकारांकडून अपेक्षिले होते. एकदा ही व्याख्या मनात ठेवल्यानंतर सकारात्मक (पॉझिटिव्ह) पत्रकारितेच्या नावाखाली राजसत्तेची चमचेगिरी करण्याची जी सार्वत्रिक व लज्जास्पद प्रवृत्ती व मनोवृत्ती वर्तमान तथाकथित पत्रकारितेत बोकाळलेली दिसते, तिच्यातील पोकळपणा व भंपकपणा लक्षात येईल.

**इंडिया आघाडीची स्पष्ट व स्वच्छ भूमिका स्वागतार्ह**

संयुक्त विरोधी पक्षांच्या आघाडीने वृत्तवाहिन्यांवरील चौदा निवेदक किंवा अँकरच्या कार्यक्रमांत सहभागी न होण्याचा निर्णय जाहीर केला आहे. हा बहिष्कार नाही. या विशिष्ट अँकरच्या कार्यक्रमात ते सहभागी होणार नाहीत, असे त्यांनी जाहीर केले आहे. म्हणजेच बहिष्कार बहिष्कार म्हणून या विरोधी पक्षांना बदनाम करण्यासाठी जी भक्तमंडळी सरसावली आहेत, त्यांचा डाव प्रथम लक्षात घ्यायला हवा. प्रथम हे चौदा महान अँकर कोण आहेत, त्यांची नावे पाहू. अमन चोप्रा, अमिश देवगण आणि आनंद नरसिंहन (न्यूज १८), सुधीर चौधरी (आज तक), गौरव सावंत आणि शिव अरुर(इंडिया टुडे), प्राची पराशर (इंडिया टीव्ही), अर्णव गोस्वामी (रिपब्लिक भारत टीव्ही), रुबिका लियाकत (भारत २४), नाविका कुमार आणि सुशांत सिन्हा(टाइम्स नाऊ-नवभारत), आदिति त्यागी (भारत एक्सप्रेस) आणि अशोक श्रीवास्तव (डीडी न्यूज). आणखीही काही जणांच्या नावांची यादी जाहीर करण्यात येईल, असे इंडिया आघाडीतर्फे सांगण्यात आले आहे. ही सर्व नावे वृत्तवाहिन्यांवरील म्हणजेच दृक्‌श्राव्य माध्यमाच्या वृत्तवाहिन्यांमध्ये काम करणाऱ्या अँकर्स किंवा निवेदकांची आहेत. या मंडळींना उत्सवमूर्तीत्व (सेलिब्रिटी) प्राप्त झालेले आहे. याचे कारण बातम्यांचा सिनेमा





कसा करायचा याचे तंत्र त्यांनी आत्मसात केले आहे. घसे ताणणे, विनाकारण आरडाओरडा करणे, सत्तापक्षाच्या चापलुशीबरोबरच विरोधी पक्षांची टिंगल, हेटाळणी करणे, त्यांच्या लहानसहान चुका उकरून त्यावरून त्यांना धारेवर धरताना सत्तापक्षाच्या भयानक अशा चुकांकडे सोयीस्कर दुर्लक्ष करणे हा त्यांच्या कार्यक्रमाचा एक साचा त्यांनी तयार केला आहे. सत्तापक्ष, सत्ताधीश, पंतप्रधान आणि त्यांचे मंत्री हे कसे देशाचे हिरो-नायक-महानायक आहेत आणि विरोधी पक्ष कसे खलनायक आहेत या एकमेव मध्यवर्ती कल्पनेवर यांच्या सायंकाळच्या चर्चा आधारित असतात. म्हणजेच सिनेमात जसा एक नायक आणि खलनायक असतो तोच प्रकार या चाटुकार अँकर्सनी अमलात आणून पत्रकारितेची पूर्ण वाट लावलेली आहे. आता अशी स्थिती आहे, की कोणती वृत्तवाहिनी कोणत्या पक्षाला धार्जिणी आहे हे सर्वसामान्य लोकांनाही कळायला लागले आहे आणि त्यामुळेच कोणत्याही वृत्तवाहिनीला गांभीर्याने घेण्याचे लोकांनी सोडून दिले आहे. कोंबडी झुंजविण्याचा खेळ असतो तसेच आपापल्या वाहिनीवर सत्तापक्ष आणि विरोधी पक्षांच्या प्रतिनिधींना झुंजविण्याचा हा विकृत खेळ गेली अनेक वर्षे भारतात चालू आहे. इंडिया आघाडीने त्याबाबत एक स्पष्ट व स्वच्छ भूमिका घेतली, ही स्वागतार्ह बाब आहे.

यातले किती अँकर्स हे खऱ्या अर्थाने पत्रकार आहेत, याचाही शोध घेण्याची गरज आहे. पत्रकार त्याला म्हणतात, ज्याने कधीतरी वार्तांकनाचे काम केलेले आहे, शोध पत्रकारिता करून विश्लेषणात्मक बातम्या दिल्या आहेत. त्यामुळे पत्रकार म्हणजे कोण या कसोटीवरदेखील या अँकर्सची पात्रता कधीतरी तपासून पहायला हवी. त्याचबरोबर त्यांना पदरी ठेवणारे म्हणजेच त्यांना नोकरीवर घेऊन ही जबाबदारी देणाऱ्या वृत्तवाहिनी मालकांच्या आकलन व बौद्धिक

क्षमतेबद्दलही प्रश्नचिन्ह उपस्थित करावे लागेल. एकच उदाहरण पुरेसे आहे. वरच्या यादीतील एक नाव आहे सुधीर चौधरी. त्यांच्याबद्दलची काही माहिती जी सार्वजनिक आहे, ती पाहू. हे झी न्यूजमध्ये होते. २०१२ मधील ही घटना आहे. त्यावेळी तत्कालीन सीएजी विनोद राय यांनी कोळसा खाण परवान्यांच्या घोटाळ्यात जो काल्पनिक अहवाल देऊन काही लाख कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचा (प्रत्यक्षात तसे काही नव्हते, तर नुकसानीची शक्यता असताना ती प्रत्यक्ष झाल्याचा आभास निर्माण करणारा) अहवाल देऊन खळबळ उडविली होती. भाजप, संघ परिवार, त्यांचे हस्तक अण्णा हजारे यांनी त्यावरून रान उठविले. त्या परवानाधारकांमध्ये त्यावेळचे काँग्रेसचे खासदार आणि उद्योगपती नवीन जिंदल यांच्या उद्योग समूहाचेही नाव होते. सुधीर चौधरी यांनी सातत्याने नवीन जिंदल यांच्या उद्योगांना या माहितीद्वारे लक्ष्य करण्यास सुरुवात केली. जिंदल यांनी या विनाकारण होत असलेल्या छळाबद्दल चौधरी यांना सांगूनही काही उपयोग झाला नाही. एक दिवस हे चौधरी आणि त्यांचे सहकारी समीर अहलुवालिया हे नवीन जिंदल यांच्याकडे पोहोचले आणि त्यांनी १०० कोटी रुपयांच्या बदल्यात बदनामीची मोहीम थांबविण्याची तयारी दाखवली. म्हणजे त्यांनी झी न्यूजला १०० कोटी रुपयांच्या जाहिराती द्याव्यात, असा प्रस्ताव दिला. जिंदल यांनी हा सर्व प्रकार रेकॉर्ड केला आणि चौधरी यांनी त्यांच्याकडे खंडणी मागण्याचा प्रकार केल्याची तक्रार केली. पोलिसांनी चौधरी व अहलुवालिया यांना अटक केली होती. तिहारमध्ये त्यांना ठेवण्यात आले होते. टीव्ही चॅनेल्सची संघटना बीइए(ब्रॉडकास्ट एडिटर्स असोसिएशन) च्या खजिनदारपदावरून त्यांना निलंबित करण्यात आले. २०१८ मध्ये जिंदल यांच्याबरोबर काहीतरी समेट करून हे प्रकरण मिटविण्यात आले.

याच चौधरी यांनी तृणमूल काँग्रेसच्या खासदार मोहुआ मोईत्रा यांनी त्यांच्या भाषणात ट्रुमन लॉंगमन यांच्या भाषणाची कॉपी केली म्हणजेच हा एकप्रकारे माहितीचौर्याचा प्रकार असल्याचा दावा करुन मोईत्रा यांच्याविरोधात बातम्या दिल्या. मोईत्रा यांनीच नव्हे, तर खुद्द लॉंगमन यांनीही असे काही घडले नसल्याचा खुलासा केल्यावरही चौधरी थांबले नाहीत व अखेर मोईत्रा यांनीही त्यांच्याविरोधात खटला ठोकल्यानंतर त्यांनी खेद व्यक्त केला.

**प्रगतीशील हिंदू त्यांचाच धर्म बदनाम करीत आहेत**

मुस्लिमांच्या विरोधात वाटेल तो प्रचार करण्याचे काम तर हे महाशय सर्रासपणे करीत असतात. कोरोनाची साथ पसरण्यास मुस्लिम समाज जबाबदार असल्याचा प्रचार सुधीर चौधरी यांनी सातत्याने केला होता. उत्तर प्रदेशातील बुलंद शहर येथे एका मंदिराची नासधूस करण्याचा प्रकार जून २०२३ मध्ये घडला. त्याबद्दल त्यांनी मुस्लिमांना जबाबदार धरले. प्रत्यक्षात त्या प्रकरणात अटक केलेले चौघेही हिंदू होते. त्यावर बेशरमपणे मखलाशी करताना ते त्यांच्या कार्यक्रमात म्हणाले, की प्रगतिशील हिंदू त्यांचाच धर्म बदनाम करीत आहेत आणि त्यांना सेक्युलर हिंदू म्हटले जाते.

सुधीर चौधरी यांची ही माहिती आहे. असे असूनही त्यांना झी न्यूज वियॉन यासारख्या वाहिन्यांनी कामावर ठेवले. त्यांनी इतरही वाहिन्यांवर मुशाफिरी केली. निर्भया बलात्कार प्रकरणात त्यांनी तिच्या मित्राची सर्वप्रथम मुलाखत मिळवली होती व त्याबद्दल त्यांना रामनाथ गोएंका पुरस्कार देण्यात आला होता. आता ते झी न्यूज (मालक सुभाष चंद्रा) सोडून आज तक या वृत्तवाहिनी (मालक अरूण पुरी) मध्ये काम करीत आहेत. अशा कलंकित व्यक्तीला नोकरीला ठेवणाऱ्या मालकांबाबतही प्रश्नचिन्ह उपस्थित झाल्याखेरीज रहात नाही.

अर्णव गोस्वामी यांनी त्यांची पत्रकारिता एनडीटीव्हीपासून सुरू केली. सुरुवातीला त्यांच्याकडे विशेष अपेक्षेने पाहिले गेले; परंतु जसे त्यांनी टाइम्स टीव्ही किंवा टाइम्स नाऊमध्ये पाऊल ठेवले, एका नव्या अर्णव गोस्वामीचा अवतार सर्वांसमोर सादर होऊ लागला. त्यांनी एकांगी व एकतर्फी पत्रकारितेचा वस्तुपाठच देशासमोर सादर केला. वरील सर्वच्या सर्व म्हणजे चौदा अँकरस्ची कामगिरी जनतेसमोर आहे. त्याबद्दल वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. जनतेलाही त्यांचा खरा चेहरा लक्षात आला आहे.

याची दुसरी बाजूही लक्षात घ्यावी लागेल. इंडिया आघाडीने या अँकर्सच्या कार्यक्रमात सहभागी होणार नसल्याचे जाहीर केल्याबद्दल भाजपच्या मीडिया विभागाने अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाने गळा काढायला सुरुवात केली. या भाजप व संघ परिवाराचा बुरखाही उघड करण्याची ही वेळ आहे. आपणा सर्वांना आठवत असेलच, की सध्याचे पंतप्रधान साहेब गुजरातचे मुख्यमंत्री होते. त्यांच्या कारकिर्दीत गुजरातचे कुप्रसिध्द दंगे झाले होते. करण थापर या प्रसिध्द मुलाखतकाराने त्यांची मुलाखत घेण्याचे ठरविले. करण थापर हे एक आक्रमक शैलीतले आणि कुणाचाही मुलाहिजा न ठेवणारे मुलाखतकार म्हणून ओळखले जातात. त्यांनी मोदी यांना गुजरात दंग्यांबद्दल प्रश्न विचारण्यास सुरुवात केल्यानंतर मोदी यांनी प्रथम पाणी प्यायला मागितले आणि नंतर माईक काढून ते निघून गेले. हा करण थापर नावाच्या पत्रकारांवरील बहिष्कार होता. रविशकुमार हे एनडीटीव्हीवर त्यांचा कार्यक्रम करीत. त्यामध्ये सरकारच्या चुकांवर ते बोट ठेवीत. २०१४ नंतर भाजप व संघ परिवाराने त्यांच्या या कार्यक्रमावर अघोषित बहिष्कार टाकला. भाजपचे कोणतेही नेते, प्रवक्ते रविशकुमार यांच्या कार्यक्रमात सहभागी होत नसत. रविशकुमार यांनी त्यांच्या विषयावर भाजपची बाजूही लोकांसमोर येण्यासाठी त्यांच्या प्रवक्त्यांना बोलाविण्याची पराकाष्ठा केली; परंतु त्यात यश आले नाही. खुद्द एनडीटीव्हीवरदेखील काही काळ भाजपने बहिष्कार टाकला होता; परंतु भाजप व संघ परिवाराचे काम गुप्त असते. कारण उजळमाथ्याने त्यांना गोष्टी करता येत नाहीत. लपवाछपवी हा त्यांचा स्थायीभाव असावा. त्यामुळे एखाद्या पत्रकाराने काहीसा अडचणीचा प्रश्न करताच भाजपच्या मंडळींना ते नकोसे होतातच; परंतु ते त्यांच्यावर डूख धरतात आणि त्यांच्या पाठीमागे लागतात. कोलकाता येथील आनंद बझार गटाच्या टेलिग्राफ वृत्तपत्रात भाजपच्या संदर्भात टीकात्मक माहिती येत असते. भाजपचे म्हणणेदेखील ते छापतात; परंतु पत्रकार परिषदेत त्या वृत्तपत्राच्या प्रतिनिधीवर बारीक लक्ष ठेवले जाते, त्यांना प्रश्न विचारू दिले जात नाहीत किंवा त्यांनी विचारलाच तर तुमच्या पेपरमध्ये आमचे म्हणणे छापणार आहात काय, असा अपमानास्पद प्रतिप्रश्न त्या प्रतिनिधीला चारचौघात करून हेटाळणी करण्याचे प्रकारही भाजप प्रवक्त्यांकडून केले जातात.

**अन्यथा पत्रकारांच्या नोकऱ्या हिरावून घेण्याचे प्रकार ते करीतच राहणार**

अगदी ताजे उदाहरण आहे. माहिती व प्रसारणमंत्री अनुराग ठाकूर हे उदयपूर (राजस्थान)च्या दौऱ्यावर (१५ सप्टेंबर) होते. तेथे त्यांची पत्रकार परिषद झाली. त्यामध्ये त्यांनी राजस्थानातील गेहलोत सरकार कसे इतिहासातले सर्वाधिक भ्रष्ट व गुन्हेगारी सरकार आहे वगैरे, वगैरे सांगितले. राजेश वर्मा नावाचे नवज्योती या दैनिकाचे उदयपूरमधील प्रतिनिधी आहेत. त्यांनी ठाकूर यांना एक प्रश्न केला, की गेहलोत सरकारने ५०० रुपयांत सिलिंडर देण्याची सुरू केलेली योजना किंवा सामान्यजनांसाठी स्वस्त आरोग्य सुविधा सुरू केली आहे, त्याला भाजप प्रत्युत्तर कसे देणार? त्यावर ठाकूर यांनी, कुणी काँग्रेसचे प्रवक्ते होत असेल तर काही होणार नाही असे उद्दाम उत्तर दिले. वर्मा यांनी मणिपूरबद्दल एक प्रश्न केला. त्याबद्दलही मंत्र्यांनी उत्तर दिले नाही. पत्रकार परिषदेनंतर वर्मा यांनी त्यांना काँग्रेस प्रवक्ते म्हटल्याबद्दल निषेध प्रकट केला आणि उदयपूरमधील भाजप आमदाराविरुध्द अनेक अपराधी प्रकरणांच्या तक्रारी दाखल असल्याकडे लक्ष वेधले. त्यावर मंत्री प्रचंड खवळले. त्यांनी उत्तरे तर दिली नाहीतच, पण यानंतर जे काय घडले ते गंभीर आहे. राजेश वर्मा तासाभरानंतर त्यांच्या कार्यालयात गेले असता, त्यांना त्यांच्या मालकांकडून तत्काळ राजीनामा देण्याचा निरोप आला होता. त्यांना बचावाची कोणतीही संधी न देता त्यांच्याकडून राजीनामा लिहून घेण्यात आला. राजेश वर्मा गेली पस्तीस वर्षे पत्रकारितेत आहेत आणि त्यांच्याबद्दल कोणतेही आरोप नाहीत; परंतु त्यांच्या काही अडचणीत आणणाऱ्या प्रश्नांपायी केंद्रीय माहिती व प्रसारणमंत्र्यांनी त्यांची नोकरी हिरावून घेतली. म्हणजेच वृत्तवाहिन्यांनी, वृत्तपत्रांनी फक्त आणि फक्त भाजप व संघ परिवाराची चमचेगिरी करायची आणि विरोधी पक्षांना बदनाम करायचे तरच हे भाजप सत्ताधारी खूष, अन्यथा पत्रकारांच्या नोकऱ्या हिरावून घेण्याचे प्रकार ते करीतच राहणार.

आणखीन एक प्रकार नुकताच प्रसिध्द झाला. एनडीटीव्हीची मालकी गौतम अदानी यांच्याकडे गेल्यानंतरचा हा प्रसंग आहे. मुंबई ब्युरोतील प्रतिनिधी सोहित मिश्रा असे त्यांचे नाव आहे. राहुल गांधी यांच्या पत्रकार परिषदेत वाटेल ते आडवेतिडवे प्रश्न विचारून ती उधळून टाकण्याबाबत त्यांना निर्देश देण्यात आले होते. त्याला त्यांनी नकार दिला. त्यांची नोकरी गेली.

**...हा खाक्या पत्रकारांनी पाळला होता**

हे प्रसंग हेच दर्शवितात, की भाजप व संघ परिवाराला या देशात एक साचेबद्ध माध्यमे हवी आहेत. वृत्तपत्रांनी फक्त भाजप व संघ परिवाराचे गुणगान केले पाहिजे. वृत्तवाहिन्यांनी भाजप व संघ परिवाराचे पोवाडे गायले पाहिजेत. चुकूनमाकून कुणी पत्रकाराने अवघड प्रश्न विचारण्याचे धाडस केलेच, तर त्याला नेस्तनाबूत करण्यापर्यंत या निष्ठूर विचारसरणीची मजल गेलेली आहे; परंतु याविरुद्धही आवाज उठू लागले आहेत. या ज्या अँकर्सच्या कार्यक्रमांत सहभागी न होण्याच्या निर्णयावर भाजप व संघ परिवारवाले मगरीचे अश्रू ढळत आहेत, त्यांना प्रतिप्रश्न केले जाऊ लागले आहेत. इंडिया आघाडीच्या निर्णयावर टीका करताना ही मंडळी म्हणतात, की ते आघाडीच्या नेत्यांना न आवडणारे व अडचणीत आणणारे निरुत्तर करणारे प्रश्न विचारतात म्हणून त्यांनी बहिष्काराचे अस्त्र उपसले आहे; परंतु या चापलूस अँकर्सना प्रतिप्रश्न हा आहे, की असे अवघड, अडचणीत आणणारे व निरुत्तर करणारे प्रश्न नरेंद्र मोदी, अमित शहा यांना विचारण्याचे धाडस तुम्ही का दाखवत नाही? ज्या करण थापर यांनी नरेंद्र मोदी यांना न आवडणारे प्रश्न विचारताच ते मुलाखत सोडून निघून जातात, हे कोणत्या राजकीय सभ्यता व संस्कृतीचे चिन्ह आहे हे त्यांनी सांगावे. ज्या राजेश वर्मा नावाच्या पत्रकाराने अनुराग ठाकूर यांना अडचणीचे प्रश्न विचारताच त्याला नोकरी गमवावी लागते. ही अभद्र व अधम कृत्ये करणाऱ्यांच्या तोंडात माध्यम स्वातंत्र्याच्या गोष्टी शोभत नाहीत. पंतप्रधानांना लाडेलाडे व तेही त्यांना आवडतील असे व त्यांची किळसवाणी चमचेगिरी करणारे प्रश्न विचारणे म्हणजे पत्रकारिता अशी भाजप व संघ परिवाराची व्याख्या आहे. पंतप्रधानांना तुम्ही इतके तास कसे काय काम करता, तुम्ही दमत कसे नाही, तुम्हाला आंबा खायला आवडतो मग तो तुम्ही कापून खाता की चोखून असले भंपक व भंकस प्रश्न विचारणे ही भाजप व संघ परिवाराची पत्रकारितेची व्याख्या आहे. असली भोंदूगिरी न करता, थेट प्रश्न करणारे पत्रकार त्यांना नको आहेत. म्हणूनच आता या मंडळींनी नवा प्रकार अमलात आणला आहे. तो म्हणजे थेट मालकांनाच कह्यात घ्यायचे. एकदा मालकांना अंकित करून घेतले, की मग त्यांच्या हाताखालचे तथाकथित पत्रकार सुतासारखे सरळ राहतात. या परिस्थितीत सर्वसाधारण मानवी प्रवृत्ती हीच असते, की मालकाची चमचेगिरी करणे आणि त्या चमचेगिरीला पूरक व साहाय्यक म्हणून मालक ज्यांची चमचेगिरी करतो म्हणजेच सत्ताधाऱ्यांची आपण सुपर चमचेगिरी करणे हे या पत्रकारांचे काम झालेले आहे. त्यांना पत्रकार न म्हणता सत्ताधाऱ्यांचे झिलकरी, दलाल, भाट असेच म्हणणे योग्य ठरेल. कारण अजूनही जगात पत्रकार व पत्रकारितेबद्दल थोडाबहुत आदर शिल्लक असावा. म्हणूनच या मंडळींना पत्रकार म्हणून त्या शब्दाचा व व्यवसायाचा अपमान करणे योग्य ठरणार नाही. अमेरिकेत डोनाल्ड ट्रम्प नावाचे असेच एक लहरी व विक्षिप्त अध्यक्ष सत्तेत आले होते. त्यांच्याच प्रचारासाठी भारताचे वर्तमान पंतप्रधानही गेले होते. त्या ट्रम्प यांचा अमेरिकन पत्रकारांवर विलक्षण राग होता. त्यांनीदेखील त्यांच्या कारकिर्दीत पत्रकारांना जवळ केले नाही. तेव्हा अमेरिकेतल्या पत्रकारांच्या प्रमुख संघटनेने पत्रक काढून त्यांना इशारा दिला होता, की अमेरिकेच्या अध्यक्षाबरोबर संबंध कसे राखायचे हे पत्रकार ठरवतील, अध्यक्ष नव्हे. हा खाक्या पत्रकारांनी पाळला होता.

वर्तमान पंतप्रधानांनी त्यांच्या साडेनऊ वर्षांच्या कारकिर्दीत एकदाही जाहीर पत्रकार परिषद घेतली नाही. यामध्ये आत्मविश्वासाचा अभाव जाणवतो. पंतप्रधानांबरोबर परदेश दौऱ्यावर माध्यम प्रतिनिधींना घेऊन जाण्याची पद्धतही या पंतप्रधानांनी बंद केली. कारण एकच, की जर कुणी अडचणीत आणणारा प्रश्न केला तर होणारी फटफजिती टाळावी. ५६ इंची छातीच्या ऊरबडवू घोषणा करण्याने शूरत्व व पुरुषार्थ किंवा पौरुषत्व प्राप्त होत नाही. तशी कृती करावी लागते, अन्यथा ही केवळ वल्गना राहते. याला भ्याडपणा म्हणतात.

इंडिया आघाडीने या अँकर्सबरोबर सहकार्य नाकारणे हे स्वाभाविक आहे. कारण एकांगी, एकतर्फी, एकसुरी आणि द्वेष, तिरस्कार, घृणा पसरविणारी ही असुरी प्रवृत्ती आहे. तिला नाकारणे हाच त्यावर उपाय आहे.

**(लेखक ज्येष्ठ पत्रकार व विश्लेषक आहेत.)**

# अंधश्रद्धा निर्मूलन, धर्मचिकित्सा आणि धर्मनिरपेक्षता : आव्हान आणि अपेक्षा

अविनाश पाटील

**आपल्याला कालसुसंगत व शोषणमुक्त जीवनशैली अंगिकारता येऊ शकते याचा विचार सर्वसामान्य माणसांना शक्य होत नाही. या दृष्टीने मानवी मन गतानुगतिक रूढी, प्रथा, परंपरा, उपासना पद्धती आणि कर्मकांड याच्यातून बाहेर काढण्याची प्रक्रिया क्रमशः विकसित करावी लागणे आवश्यक आहे. म्हणजेच आदिम काळापासून मानवी जीवनाला व्यापून टाकणारी आणि जगण्याचा अविभाज्य भाग बनलेल्या या धर्मातील संकल्पनांच्या धारणेतून बाहेर पडणे गरजेचे आहे. आजच्या बदलत्या आव्हानांना सामोरे जायचे असेल तर या रुढ धर्मश्रद्धांतून माणसाने मुक्त होण्यासाठी सजगपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे.**

(पूर्वार्ध)

मानवी जीवनात धर्माला एक वैशिष्ट्यपूर्ण स्थान आहे. जगाच्या सर्व भागांतील सर्व प्रकारच्या जनसमूह मानवाच्या आदिम अवस्थेपासून या ना त्या स्वरूपात धर्माने माणसाची सोबत केली आहे. वैज्ञानिक दृष्टिकोनाचा उदय आणि विकास ही गेल्या चारशे वर्षातील घडामोड आहे. पण संघटित धर्माचा उदय त्याआधी कित्येक शतके झाला होता. विज्ञानाचा उदय होण्याआधी संघटित धर्माला विशाल स्वरूप आणि विलक्षण सामर्थ्य प्राप्त झाले होते. जीवनाचे सर्व आयाम धर्म कल्पनेच्या प्रभुत्वाने व्यापले होते आणि सर्व बाजूंनी त्यांची मानवी जीवनावर निरंकुश सत्ता फार दीर्घकाळ चालत आलेली आहे.



निसर्गतः मानवी मन श्रद्धेच्या आहारी जाणारे आणि त्यामध्ये गुंतून राहणारे आहे. माणूस प्राणी म्हणून त्याच्या व्यक्तिमत्त्वाची घडण भावना आणि विचारांनी झालेली आहे. त्यामध्ये मनुष्य प्राण्याच्या व्यक्तिमत्वातील भावनांचा विचारांवरील प्रभाव अधिक असतो. त्यामुळे भावना आणि विचार यांच्या मिश्रणाचे व्यक्तिमत्व असलेल्या माणसाला केवळ विचारांच्या आवाहनाने बदलायला अंगभूत मर्यादा लक्षात आल्या आहेत. त्यामुळेच माणसाकडून वेळोवेळी श्रद्धांची तपासणी करणे, चिकित्सा करणे, श्रद्धांमुळे होणाऱ्या शोषण, दिशाभूल आणि फसवणुकीला परावृत्त करण्याचा प्रयत्न करणे आणि काही श्रद्धा कालबाह्य झालेल्या आहेत हे मान्य करणे सहजासहजी शक्य होत नाही. आपल्याला कालसुसंगत व शोषणमुक्त जीवनशैली अंगिकारता येऊ शकते याचा विचार सर्वसामान्य माणसांना शक्य होत नाही. या दृष्टीने मानवी मन गतानुगतिक रूढी, प्रथा, परंपरा, उपासना पद्धती आणि कर्मकांड याच्यातून बाहेर काढण्याची प्रक्रिया क्रमशः विकसित करावी लागणे आवश्यक आहे. म्हणजेच आदिम काळापासून मानवी जीवनाला व्यापून टाकणारी आणि जगण्याचा अविभाज्य भाग बनलेल्या या धर्मातील संकल्पनांच्या धारणेतून बाहेर पडणे गरजेचे आहे. आजच्या बदलत्या आव्हानांना सामोरे जायचे असेल तर या रुढ धर्मश्रद्धांतून माणसाने मुक्त होण्यासाठी सजगपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे.

यातु निर्भर अशा समजुती व आचार यांना काही संशोधक धार्मिक गणतीत मोडतात, तर काही जण त्यांना यातु प्रधानकल्पना (मॅजिकल बिलिफ) किंवा फारतर यातु धर्मीय कल्पना (मॅजिको रिलीजस बिलिफ) म्हणतात. धर्म ही संज्ञा साक्षर, प्रगल्भ संस्कृतीमधील समजुतींना लावावी असा काहींचा आग्रह असतो. काहीजण तर एकेश्वरी धर्म कल्पनेलाच 'धर्म' ही संज्ञा लावावी असे मानतात. इतर सर्व पूर्वकल्पना 'यातु' म्हणावे असे आग्रही प्रतिपादनदेखील काही करीत असतात. प्रत्यक्षात यातु व धर्म या संज्ञांनी निर्देशित केल्या जाणाऱ्या या समजुती व आचार यांच्यामध्ये एकरूपता आढळते.

### देव नवसाला पावेल अशा अपेक्षा भक्तांच्या मनात असतात

नागर श्रद्धा संप्रदाय, संतांचे प्रयत्न असे काही अपवाद वगळता ग्रामीण लोकसमूहांचे जीवन यातु प्रधान श्रद्धेच्या परंपरेतच अखंडपणे चालू होते. जन्मसिद्ध जातीसंस्था ही यातु निर्भर पावित्र्य भावनेवर उभी राहिलेली आहे. कुलधर्म, कुलाचार, कुलदेवता याबाबत त्यामध्ये अखंडता आहे. ब्राह्मणांपासून ते अतिशूद्र समजल्या जाणाऱ्या सर्व

जाती- जमातींमध्ये या परंपरांचे काटेकोरपणे पालन करण्याची वृत्ती आढळते. श्रद्धांच्या दृष्टीने आजही असे वर्णन करता येईल येईल, की सामान्य लोकसमुदाय आजही यातून निर्भर श्रद्धेला धरून आहे. जात-पात, देवोपासना, बळी देण्याची पद्धत, लग्नानंतरचा गोंधळ कार्यक्रम, वाघ्या मुरळी यांची प्रथा, मंत्र तंत्र, शकुन अपशकुन, फलज्योतिष, तोडगे, ताईत, गंडेदोरे या साऱ्या गोष्टींचा पगडा ब्राह्मणांपासून ते अतिशूद्र मानल्या जाणाऱ्यापर्यंत आणि रावापासून रंकापर्यंत सर्वांवरच दिसतो. या प्रभावाव्यतिरिक्त यातु निर्भर श्रद्धेला विरोधी अशा नागर समाजातील श्रद्धा काही व्यक्तींच्या मनात नांदत आहेत; परंतु या दोन्हींमध्ये मोठा संघर्ष झाल्याचे दिसून येत नाही. बहुसंख्याकांमध्ये इष्ट दैवत, तिलाच मुख्य स्थान आहे. या श्रद्धेचे मुख्य स्वरूप यातु शक्तीला आवाहन असे राहिले आहे. त्यासाठी बळी देणे, मंत्र तंत्र, अभिषेक, यज्ञयाग, विशिष्ट क्षेत्री दैवताला नवस या प्रकारच्या विधीमध्ये या भक्तांना मोठी श्रद्धा वाटते. या विधीमुळे पुण्य मिळेल, देव नवसाला पावेल अशा अपेक्षा भक्तांच्या मनात असतात.

**आधुनिक काळात समाज व्यवस्था हा राजकारणाचा विषय**

रूढी, प्रथा, परंपरा, उपासना यांना मानवी जीवनात मोठे स्थान आहे. यासाठी धर्म आविष्काराचा आणि त्यामागील जाणिवांच्या इष्ट-अनिष्टतेचा शोध घ्यावा लागतो. तो धर्मविरोध नसतो, पण माणसाला कालसापेक्ष करणारा विचार असतो; परंतु त्याहीपेक्षा महत्त्वाचं म्हणजे ''धर्म हा शब्द नित्य व्यवहारात कित्येकदा निव्वळ पारलौकिक अर्थी वापरतात. आपण एखाद्याला 'तुझा धर्म कोणता', असा प्रश्न करतो तेव्हा पारलौकिक कल्याणार्थ तू कोणत्या मार्गाने जातोस, वैदिक, बौद्ध, जैन, ख्रिस्ती की मोहम्मदी असे विचारण्याचा आपला हेतू असतो आणि तोही त्याप्रमाणे उत्तर देतो. 'अथ तो धर्मजिज्ञासा' या सूत्रालाही धर्माचा हाच अर्थ अभिप्रेत आहे. पण एवढाच अर्थ धर्म या शब्दाचा नाही. उदाहरणार्थ चतुर्विध पुरुषार्थाची गणना करताना 'धर्म, अर्थ, काम, मोक्ष' असे म्हणतात. यातील धर्म या शब्दातच मोक्ष (पारलौकिक धर्म) येत असेल तर शेवटी निराळा पुरुषार्थ सांगण्याची गरज आज नव्हती. धर्म या शब्दात तत्कालीन समाजव्यवस्था शास्त्र हात अर्थ विवक्षित असतो.'' असे लोकमान्य टिळकांनी गीतारहस्य या ग्रंथात म्हटले आहे.

तेव्हा धर्म म्हणजे केवळ रूढी, परंपरा, उपासना पद्धती, सत्यार्थ अन् पारलौकिक कल्याण एवढाच अर्थ नाही. 'आम्हाला धर्माचे राज्य स्थापन करायचे आहे' अशी हाकाटी या देशात अनेक जण उच्चरवाने देत असतात. त्यांचे खायचे आणि दाखवायचे दात वेग-वेगळे असतात. धर्म याचा अर्थ लोकांना सांगण्यासाठी नैतिक व सांस्कृतिक मूल्यांना असलेली निष्ठा असा असला, तरी व्यवहारात धर्माच्या आधारे समाज नियंत्रणाची आणि सत्ताकेंद्री अभिलाषा असते. गुलामगिरी व सरंजामशाहीच्या काळात 'समाज व्यवस्था' हा धर्माचा विषय होता. आता आधुनिक काळात समाज व्यवस्था हा राजकारणाचा विषय झाला आहे.

महाराष्ट्राच्या अर्वाचीन काळात धर्म या विषयावर मनन, चिंतन व कृती करणारी काही माणसे मागच्या शतकात होऊन गेली. महात्मा फुले, न्यायाधीश रानडे, लोकमान्य टिळक, राजर्षी शाहू महाराज, सयाजीराव गायकवाड, पंडिता रमाबाई, समाजसंत गाडगेबाबा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, प्रबोधनकार ठाकरे यांसह अनेक समाजधुरिणांचे आपापल्या क्षेत्रात मोठे कार्य आहे. त्यांनी आपल्या समाजसुधारणेच्या कामाबरोबरच साकल्याने धर्माचा विचार केला असे दिसून येईल. यातील प्रत्येकाचे समाजसुधारणेचे विचार व कार्य पद्धती आणि निष्कर्ष व कृती कार्यक्रम वेगवेगळे होते. त्यांचे सर्वच आपल्याला मान्य होईल असे नाही, पण त्यांनी धर्माचा विचार अत्यंत आस्थेने व नाविन्याचा शोध घेण्याच्या प्रामाणिक बुद्धीने केला, हे मान्य करावे लागेल.

**...यंत्रणा संघटितपणे कार्यरत झालेली आहे**

धर्माचा अभिमान, अस्मिता, अहंकार अधिकाधिक फुलवून संघटितपणे बलवान करण्याचे प्रयत्न सध्या सर्वच धर्मांत चालू आहेत. आपापल्या धर्मांच्या देवस्थानांना-पूजास्थानांना नियमितपणे जाणे, यात्रा-जत्रा करणे, तीर्थस्थळांची-धर्मस्थळांची वारी करणे, धार्मिक व्याख्याने-प्रवचने- कीर्तने-सप्ताह आयोजित करणे, देवदेवतांचे व धर्मांचे उत्सव घडवून आणणे यासाठी सुनियोजित पद्धतीने प्रोत्साहन देणारी आणि व्यवस्था उभारणारी यंत्रणा संघटितपणे कार्यरत झालेली आहे. त्यामुळे त्यांच्या धर्मातील उच्चभ्रूंसह समाजातील सर्वसामान्य महिला, पुरुष व युवा पिढीतील तरुणाईदेखील याकडे आकर्षित झा-लेली दिसते. खरं तर, धर्माभिमान व धर्मविचार या वेगवेगळ्या बाबी आहेत. धर्माभिमानी माणूस धर्मविचार करू शकेल, पण करेलच असे नाही. ही धर्माभिमानाला जास्त तीव्रता मिळेल अशी परिस्थिती आणि धर्मविचाराला फाटा असे आजच्या तथाकथित पुरोगामी महाराष्ट्राचे स्वरूप आहे. अंधश्रद्धा निर्मूलनाचे संघटित कार्य प्रत्यक्ष कृतीच्या क्षेत्रात कार्यरत ठेवण्याचा आमचा प्रयत्न असल्याने सदर विचारांचा संबंध धर्माशी, धर्मविषयक व्यवहारांशी, धर्माच्या नावाने चालणाऱ्या समाजकारण, राजकारण आणि अर्थकारणाशी सततचा येत असल्याने त्याची विधायक व कृतिशील धर्मचिकित्सा अपरिहार्य असल्याचे आम्हाला जाणवते.

**हे पूर्णतः संविधानविरोधी वर्तन**

अंधश्रद्धा निर्मूलनाच्या संघटित कार्याची धर्माबाबतची भूमिका ही भारतीय संविधानातील मूल्यआशयाशी सुसंगत आहे, असे आम्ही मानतो. म्हणजे धर्मपालन, धर्मउपासना आणि धर्माचा प्रचार-प्रस-ार करण्याचे स्वातंत्र्य भारतीय नागरिक म्हणून आपल्याला आहे. भारतीय संविधानाच्या २५ व २६ कलमान्वये त्याबाबतची भूमिका सुस्पष्ट केलेली आहे. त्याला अनुसरून आपण भारतीय नागरिक म्हणून राष्ट्रधर्माचे पालन जबाबदारीने व बांधिलकीने करणे आवश्यक आहे. त्यामध्ये धर्म नाकारण्याचे आणि धर्मचिकित्सा करण्याचे स्वातंत्र्यही अंतर्भूत आहे. त्यामुळे धर्माधिष्ठित राष्ट्र उभारणीचा संकल्प घेऊन देशाच्या राष्ट्रीय एकात्मतेला, संविधानिक लोकशाही कार्यपद्धतीला आणि प्रजासत्ताक व्यवस्थेला आव्हान देणाऱ्या व धोका पोहोचविणाऱ्या शक्तींचा पर्दाफाश करणे आणि प्रतिवाद करणे आवश्यक होते. उलट अशा देशविरोधी कारस्थानातील व्यापक धोके आणि तोटे लोकांना समजावून सांगणे हे अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीच्या व्यापक वैचारिक आशयाशी सुसंगत असे वर्तन आहे. देशातील समाजकारण, राजकारण, अर्थकारण यांचा आधार

तथाकथित संत-महंतांची धर्मसंसद नक्की करेल, अशा वल्गना केल्या जात आहेत. अशा सांस्कृतिक आणीबाणीच्या परिस्थितीत राष्ट्रहित जोपासण्यासाठी प्रत्येक भारतीय नागरिकाने कर्तव्य म्हणून भारतातील धर्मनिरपेक्ष लोकशाही संवर्धित करण्याची जबाबदारी घेतली पाहीजे. धर्मनिरपेक्षतेचे तत्त्व मोडीत काढणे हे पूर्णतः संविधानविरोधी वर्तन आहे, असा निर्वाळा भारताच्या सर्वोच्च न्यायालयाच्या संपूर्ण पीठाने दिला आहे. धर्माच्या आधारे मते मागितली आणि निवडून आले तरी निवडणूक रद्द होऊ शकते. कारण भारतीय संविधानानुसार एक व्यक्ती, एक मत, एक मूल्य या मूलभूत संकल्पनेला सुरुंग लागू नये, ही भूमिका आहे. खरं तर, धर्माचा प्रभाव राजकारण, समाजकारण यांसोबत मानवी जीवनाच्या सर्व अंगांवर ठळकपणे टाकण्याचा ब्राह्मणी धर्माचा शेकडो वर्षांचा अनुभव असताना त्याची विधायक व कृतिशील चिकित्सा करण्याची जशी गरज आहे, तशीच आवश्यकता भारतीय संविधानातील मूल्यआशयाच्या गाभ्याला छेद देणाऱ्या शक्तींना रोखण्याची आज अधिक जाणवते आहे.

धर्मभावनेचा विचार करताना महत्त्वाच्या तीन बाबी लक्षात येतात. धर्माच्या नैतिक मूल्यआशय आचरणाची, संविधानातील धर्मनिरपेक्ष मूल्याच्या काटेकोर अंमलबजावणीची आणि धर्माला विवेकवादी दृष्टीने समग्र कालसुसंगत पर्याय देण्याची!

धर्म आणि धार्मिकतेच्या रूढ कल्पनांना तपासण्याचा प्रयत्न संतांनी आणि समाजसुधारकांनी आपापल्या परीने केलेला आहे. धार्मिकतेच्या भक्तीप्रवाहात संतांनी ईश्वरकेंद्री धर्म मानवकेंद्री करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. धार्मिकतेच्या या मानवधर्मी रूपाने महाराष्ट्रातील समाजसुधारक ही प्रभावित झालेले होते, यात शंका नाही. धर्मभावनेच्या भ्रष्ट व्यावहारिक स्वरूपामध्ये आणि भक्ती संप्रदायातील जातीच्या उतरंडीतील लोकवंचनेमुळे 'धर्म ही अफूची गोळी आहे' हे मार्क्सचे वचन अनेकदा अर्धवटपणे सांगितले गेले. मार्क्सनेच म्हटल्यानुसार, 'मानवाने आपल्या मुक्तीसाठी व्यक्त केला तो एक हुंकार आहे' याचाही अर्थ समजून घेण्याची गरज आहे. त्यामुळे वस्तुनिष्ठ कसोटीवर धर्म कोठे टिकतो, असा प्रश्न बुद्धिजीवी विचारतात, त्यावेळेस धर्माच्या मर्यादादेखील मान्य कराव्या लागतील. तसेच व्यक्ती, व्यक्तीपासून कुटुंब, समूह आणि समाजापर्यंत विवेकवादाची निर्मिती कशी करता येईल; त्यावर विवेकी समाज कसा उभारता येईल याचे आव्हान आहे. त्यासाठीचे विविधांगी प्रयोगाचे प्रयत्न करीत रहावेत. सोबतच मानवाच्या मूलभूत आणि शाश्वत अशा धर्मभावनांकडे अधिक आस्थापूर्वक पाहावे, त्यांना अधिकाधिक कालसुसंगत आणि शोषणमुक्त करण्याच्या दिशेने होणाऱ्या प्रयत्नांचे स्वागत करावे, शक्यतेनुसार सहकार्य करावे. अशा परिस्थितीत या सर्वांकडे अधिक आस्था-आपुलकीने, आदरपूर्वक व्यवहार करण्याची भूमिका अंधश्रद्धा निर्मूलनाच्या संघटित कार्याची आहे.

**धर्मनिरपेक्षता, धर्मातीतता, राजसत्ता व धर्मसत्ता यांचे विलगीकरण**

प्रत्यक्षात भारतात पुरोगामींचा राजसत्ताचे धर्मसत्तेपासून विलगीकरण करण्यापेक्षा सर्वसामान्यांच्या व्यक्तिगत व सार्वजनिक जीवनातून धर्म हद्दपार करण्यावर जोर राहिला. मानवी उत्क्रांतीनंतर मानव विकास प्रक्रियेच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर यातु धर्मापासून सुरू झालेला प्रवास नंतर संघटित धर्माच्या वाटचालीत रूपांतरित झाला. त्याचा प्रभाव, परिणाम आणि व्यवस्थेचे हितसंबंध फारच घनिष्ठ आणि जटिल होत गेले आहेत. सर्वसामान्यांचे आणि हितसंबंधी गटांचे धर्मव्यवस्थेवरील अवलंबित्व तयार झालेले आहे आणि समाजाचे सहचर प्रस्थापित झाले आहे.

मनुष्यावर प्राणीत्वाच्या मेंदूमधील निसर्गप्रेरणांचा प्रभाव अजूनही 'हावी' आहे. आदिमानव ते आधुनिक मानव हा उत्क्रांतीसह नंतरचा मनुष्यप्राण्याचा प्रवास त्याला आमुलाग्र बदलविणरा ठरला असला, तरी भावभावनांना परावर्तित करणारा होऊ शकला नाही ही शास्त्रशुद्ध वास्तविकता आहे. त्यामुळे भावनांना आवाहन करणाऱ्या आणि आभासी का होईना सुरक्षिततेच्या आम्ही देणाऱ्या प्रक्रियांच्या आवाहनाकडे माणसं आजही आकर्षित होत राहतात. या वस्तुनिष्ठतेकडे बघण्याचा दृष्टिकोन आपल्याला बदलावा लागेल, बदलवावा लागेल; तो अधिक कालसुसंगत आणि आधुनिक शास्त्रसंमत करावा लागेल.

जसे मानव विकास प्रक्रियेतील वाटचालीत मागे ठेवलेल्या, पडलेल्या किंवा राहिलेल्या मानवसमूहांना म्हणजे महिला, आदिवासी, दलित, भटके-विमुक्त, वंचित घटकांना जगाच्या विकासप्रवाहात आणण्यासाठी विशेष तरतूद करणे अत्यावश्यक आहे, ही मानवाधिकारवादी, सामाजिक न्यायाची भूमिका आज जगन्मान्य झाली आहे. तसेच देव-धर्मविषयक श्रद्धा, उपासना, रूढी, प्रथा, परंपरा, कर्मकांडे, सण, उत्सव, यात्रा, जत्रा आदींमध्ये पारंपारिक संस्काराने, गतानुगतिक व्यवस्थेच्या प्रभावाने गुरफटून राहिलेल्या समाजसमूहांना त्यांच्या 'आभासी अवलंबित्वा' (आधुनिक मानसशास्त्रीय परिभाषेत डिपेंडेबल मेंटॅलिटी) पासून परावृत्त करण्यासाठी काही विशेष प्रयत्न टप्प्याटप्प्याने राबविण्याची आवश्यकता आहे, असे वाटते.

**धर्मनिरपेक्षतेच्या जागतिक घोळात भारताचा भोग**

आजचे जागतिक राजकारण मुळातच अविश्वास आणि द्वेषभावननेवर आधारित असल्याच्या परिणामी आजच्या जगात आपण एका तणावयुक्त शांततेत जगतो आहोत. आजच्या जागतिक राजकारणाला धर्माचे अधिष्ठान दिले गेल्यामुळे अनेक नवे अंतर्विरोध निर्माण झाले आहेत. सारे इस्लामी दहशतवादी असण्याच्या कांगाव्यानेदेखील जनमताचा ठाव घेतला आहे. सर्वसामान्य नागरिकदेखील जवळपासच्या मुस्लिमांविषयी संशयास्पद भाषेत बोलत आहेत. या साऱ्या घटनाक्रमामुळे इस्लामी संस्कृती आणि पाश्चिमात्य सभ्यता यांच्यामध्ये संघर्ष उभा राहिला आहे. भारतातदेखील इस्लाम म्हणजे दहशतवाद, हिंसाचाराला प्रोत्साहन देणारा धर्म असल्याचा प्रचार झाला. मुस्लिम जमात ही अशीच मागास अविकसित असल्याची समजूत बनवली गेली आहे. या साऱ्या प्रक्रियेत दोन सभ्यतांमधील संघर्षसिद्धांत पुढे आला आणि धर्मांधर्मातील तेढ वाढल्याचा अनुभव आपल्या सगळ्यांना मिळतो आहे. सभ्यतांमधील संघर्ष ही संकल्पना सर्वप्रथम बर्नार्ड लेविस यांनी विकसित केली.

(उत्तरार्ध पुढील अंकात...)

# अखंडांमधून समजलेले म. फुले



प्रा. सुभाष वारे

**म. फुले यांनी स्थापन केलेल्या सार्वजनिक सत्यधर्माच्या प्रसारासाठी त्यांनी 'अखंड' या काव्यप्रकाराची रचना केलेली दिसते. ज्यातला मूल्यआशय कधीही खंडित होऊ शकत नाही, कालबाह्य होऊ शकत नाही अशी शब्दरचना म्हणजे अखंड. या 'अखंडा'मधून म. फुले यांचे विचार नेमकेपणाने आपल्याला समजतात.**

महात्मा फुले यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाचे दीडशेवे वर्ष आज २४ सप्टेंबर २०२३ रोजी संपत आहे. म. फुले हे एक द्रष्टे समाजसुधारक होते. आपल्याला पटलेले विचार समाजात रुजविण्यासाठी एका बाजूला समाजातील उच्चवर्णीय प्रवृत्तींबरोबर त्यांनी संघर्षाची भूमिका घेतली आणि दुसऱ्या बाजूला अनेक पर्यायी सांस्कृतिक कार्यक्रमांचे त्यांनी आयोजन केले. काय नाकारायचे हे सांगतानाच काय काय स्वीकारायचे याबाबत अतिशय सकस उपक्रम देणाऱ्या म. फुले यांचं कर्ते सुधारक असं अतिशय सार्थपणे वर्णन केलं जातं.

म. फुले यांनी स्थापन केलेल्या सार्वजनिक सत्यधर्माच्या प्रसारासाठी त्यांनी अखंड या काव्यप्रकाराची रचना केलेली दिसते. ज्यातला मूल्यआशय कधीही खंडित होऊ शकत नाही, कालबाह्य होऊ शकत नाही अशी शब्दरचना म्हणजे अखंड. या 'अखंडा'मधून म. फुले यांचे विचार नेमकेपणाने आपल्याला समजतात.

निसर्ग सर्वांना समान न्यायाने वागवतो, निसर्ग माणसांमाणसांमध्ये भेदभाव करत नाही तर आपण का करावा. अशा आशयाचे त्यांचे अनेक अखंड आपल्याला दिसतात.

आपल्या एका अखंडात म. फुले म्हणतात,

**एक सूर्य सर्वा प्रकाशास देतो,**
**उद्योगा लावितो प्राणीमात्रा!**
**मानवासहित प्राण्यांचे जीवन,**
**सर्वांचे पोषण तोच करी!**
**सर्वा सुख देई जनकाच्या परी,**
**नच धरी दुरी कोणी एका!**
**मानवाचा धर्म एकच असावा,**
**सत्याने वर्तावा जोती म्हणे!**

सर्व सृष्टीच्या, सर्व चराचराच्या चैतन्याचा स्त्रोत असलेला सूर्य जर सर्व प्राणीमात्रांबरोबर जनकाप्रमाणे म्हणजे आपल्या बापाप्रमाणे समान नजरेने व्यवहार करत असेल तर आपण आपापसात वेगवेगळे का आहोत? आपला धर्म एकच असायला हवा आणि तो सत्यधर्म असायला हवा.

अशाच पद्धतीने आपल्या आणखी काही अखंडांत ते पृथ्वीचे तसेच चंद्राचे उदाहरण देतात व म्हणतात,

**निर्मिकाने जर एक पृथ्वी केली,**
**वाही भार भली सर्वत्रांचा!**



**तृणवृक्षभार पाळी आम्हासाठी,**
**फळे ती गोमटी छायेसह!**
**सुखसोईसाठी गरगर फेरे,**
**रात्रंदिन सोरे तीच करी!**
**मानवांचे धर्म नसावे अनेक,**
**निर्मिक तो एक जोती म्हणे!**

या अखंडाचा अर्थ सहज कळण्याजोगा आहे. तो समजून सांगण्याचीही गरज नाही. अशाच अर्थाने आणखी एका अखंडात ते म्हणतात,

**निर्मिके निर्मिले मानव पवित्र,**
**कमी जास्त सूत्र बुद्धीमध्ये!**
**पिढीजादा बुध्दी नाही सर्वांमधी,**

**शोध करा आधी पुर्तेपणी!**

माणसांच्या अंगी असलेली कौशल्ये वेगवेगळी असतील, प्रत्येक कौशल्य महत्त्वाचं आहे. त्याचं सूत्र वेगवेगळं असेल, पण काही माणसे जन्मतः बुध्दी घेऊन आलीत आणि काही जन्मतःच ढ आहेत असं मात्र असू शकत नाही.

सर्व माणसे जन्माने समान आहेत, त्यांच्यात भेदभाव नको ही आपली भूमिका आणखी स्पष्ट करताना म. फुले म्हणतात,

**सर्वांचा निर्मिक आहे एक धनी,**
**त्याचे भय मनी धरा सर्व!**
**न्यायाने वस्तुंचा उपभोग घ्यावा,**
**आनंद करावा भांडू नये!**
**धर्मराज्य भेद मानवा नसावे,**
**सत्याने वर्तावे ईशासाठी!**
**सर्व सुखी व्हावे भिक्षा मी मागतो,**
**आर्यास सांगतो जोती म्हणे!**

म. फुले यांनी एकमय समाजाची कल्पना मांडलीय. जात, धर्म, वंश, लिंग हे भेदभाव विसरून एकमेकांशी आपलेपणाने वागणारा समाज म्हणजे एकमय समाज. आपल्याला सुखी व्हायचा अधिकार आहे तसा तो इतरांनाही आहे. आपल्यावरून जग ओळखावे अशा आशयाचा त्यांचा एक अखंड आहे.

**माझे काही कोणी घेऊ नये जनी,**
**वसे ध्यानीमनी मानवाच्या!**
**माझ्या मनी सर्व मजला असावे,**
**दुजा का नसावे जगामाजी!**
**आपल्यावरून जग ओळखावे,**
**त्यांच्याशी वर्तावे सत्य तेच!**
**मानवांचा धर्म सत्यनिती खूप,**
**करी जीवदान जोती म्हणे!**

म. फुले यांनी आपल्या सर्वांचा निर्माता तो निर्मिक अशी कल्पना मांडली आहे. पारंपारिक ईश्वर या संकल्पनेपेक्षा ही संकल्पना वेगळी आहे. आपल्या सर्वांचा पालनकर्ता तो निसर्ग. निसर्गातील सूर्य, पृथ्वी, चंद्र हे जर माणसामाणसांमध्ये भेदभाव करत नसतील तर आपण जन्माच्या आधारे कुणीतरी मोठा किंवा कुणीतरी छोटा असं मानणं हे योग्य नाही असं म. फुले आपल्याला बजावतात, हे आपण नीट समजून घेतलं पाहिजे. निसर्गाने आपल्यासाठी निर्मिलेल्या फळफळावळ, धनधान्य, खनिजे यांचा न्यायाने उपभोग घ्यावा, जेवढा आपला हक्क तेवढंच वापरावं, इतरांच्या हक्काचं खेचून घेऊ नये, तसंच निसर्गाला ओरबाडून खाऊ नये. अशा वागण्याने आपणही आनंदाने जगावे आणि इतरांनाही आनंदाने जगू द्यावे.

म. फुले यांनी खुळचट परंपरा, निरर्थक कर्मकांड यावर शब्दांमधून आणि आपल्या कृतीतून हल्ला चढवलेला आहे. आपल्या 'गुलामगिरी' या ग्रंथात ते म्हणतात, पुरोहित तुम्हाला स्वर्ग-नरक अशा थोतांडाची भीती घालतो, पाप-पुण्याची भीती घालतो, आभासी संकटाची भीती घालतो आणि मग त्यातून सुटका करून घेण्यासाठी तो तुम्हाला कधी अभिषेक घालायला सांगतो, तर कधी होमहवन करायला लावतो. या असल्या कर्मकांडात काही अर्थ नाही. ही कर्मकांडे म्हणजे पुरोहिताच्या पोटापाण्याचं साधन आहे. आपलं त्यातून काहीही भलं होत नाही. तुम्ही त्यात अडकून विनाकारण स्वतःचं आर्थिक, मानसिक नुकसान करून घेऊ नका. आपण शेजाऱ्यांशी, नातलगांशी, मित्रांशी आपलेपणाने वागणं यातच आपलं हित आहे. ही भूमिका जोरकसपणे घेतल्यामुळे ज्यांचे हितसंबंध दुखावले त्यांनी म. फुले यांच्यावर ब्राम्हणद्वेष्टे असल्याचा शिक्का मारला. पण ते अजिबात खरे नाही.

त्यांची समन्यायी किंवा सर्वसमावेशक भूमिका खालील अखंडातून आपल्याला समजते.

**धर्मराज्य भेद मानवा नसावे,**
**सत्याने वागावे ईशासाठी!**
**ख्रिस्त, महंमद, मांग, ब्राम्हणासी,**
**धरावे पोटाशी बंधूपरी!**
**निर्मिकाचा धर्म सत्य आहे एक,**
**भांडणे अनेक कशासाठी!**

कोणाही एका जातीचा द्वेष न करता जे चूक आहे ते चूक आहे, ही त्यांची रोखठोक भूमिका होती व ती आवडल्याने म. फुले यांना सर्वच जातींमधून आणि विशेषतः ब्राम्हण जातीतूनही अनेक सहकारी व हितचिंतक लाभलेले आपल्याला दिसतात. म. फुले यांच्या स्त्रीशिक्षणाच्या मोहिमेला पुरोहितशाहीने धर्माचा दाखला देऊन हिंसक विरोध केलेला असला, तरी मुलींच्या पहिल्या शाळेसाठी तात्यासाहेब भिडे यांनी आपला वाडा वापरायला दिला होता हे कुणीच विसरता कामा नये.

सर्व माणसांना सुखी जीवन जगण्याचा, आनंदाने राहण्याचा अधिकार आहे असं म. फुले सतत सांगायचे. माणसाच्या सुखाच्या रस्त्यात जसा निरर्थक कर्मकांडाचा अडथळा आहे, पाप-पुण्यावर आधारित दैववादी मानसिकतेचा अडथळा आहे, तसाच आपल्या काही वाईट सवयींचाही अडथळा आहे. आपण सतत प्रयत्नवादी असलं पाहिजे. आळस झटकून कामाला लागलं पाहिजे. आपण सतत उद्योगी असलं पाहिजे, असं ते म्हणायचे. ते स्वतः यशस्वी उद्योजक होते हे अनेकांना माहीत नाही. म. फुले यांनी शेअर बाजारावर पण काही अखंड रचले आहेत. त्यात ते म्हणतात, शेअर बाजार हा केवळ कागदांचा बाजार आहे व तो आळशांचा खेळ आहे. काही कष्ट न करता जगण्याच्या या सवयी चांगल्या नाहीत, ते असं म्हणतात,

**शेअर्स मार्केटात खप कागदाचा,**
**नफा दलालाचा बूड धन्य!**
**शेअर्स कागदास पाहून रडती,**
**शिव्याशाप देती योजी त्यास!**
**शेअर्स व्यापाराचा जळो तो उद्योग,**
**होऊन निःसंग मूढा लुटी!**
**आळशाचा खरा नित्य हाच धंदा,**
**दुरुनच वंदा जोती म्हणे!**

आळशाचा धंदा करू नये, हे सांगताना जोतीराव हे काय करावे हेही सांगतात. ते पुढे असं म्हणतात,

**सत्य उद्योगाने रोग लया जाती,**

**प्रकृती होती बळकट!**
**उल्हसित मन झटे उद्योगास,**
**भोगी संपत्तीस सर्व काळ!**

नवीन वस्तू निर्माण करणाऱ्या उद्योगाला लागावे, रोजगार वाढवणाऱ्या उद्योगात लक्ष घालावे व ते उद्योग प्रामाणिकपणे करावेत... तिथे कष्ट करायला लाजू नये.

त्यांच्या विचारांमध्ये श्रमप्रतिष्ठा हा महत्त्वाचा मुद्दा त्यांनी सतत मांडला आहे. कोणतंही काम हलकं नसतं. कष्ट करणाऱ्यांचा सन्मान राखला गेला पाहिजे आणि त्याचबरोबर कष्ट करणाऱ्यांना त्यांच्या घामाचा योग्य मोबदला मिळाला पाहिजे. हासुद्धा म. फुले यांच्या सत्यशोधक विचारांचा एक गाभा आहे. आपल्या एका अखंडात ते म्हणतात,

**स्त्री-पुरुष सर्व कष्टकरी व्हावे,**
**कुटुंबा पोसावे आनंदाने!**
**नित्य मुली-मुला शाळेत घालावे,**
**अन्नदान द्यावे विद्यार्थ्यांना!**
**सार्वभौम सत्य स्वतः आचरावे,**
**सुखे वागवावे पंगू लोकां!**
**अशा वर्तनाने सर्वा सुख द्याल,**
**स्वतः सुखी व्हाल जोती म्हणे!**

एका अर्थाने सुखी जीवनाचा मूलमंत्रच म. फुले यांनी मांडला आहे. कष्ट करावेत, मुला-बाळांना शिकवावे, अडचणीत असलेल्यांना मदत करावी, याने इतरांनाही आनंद मिळेल आणि आपणही सुखी होऊ, हेच सार्वभौम सत्य आहे.

म फुले, सावित्रीबाई फुले, फातिमा शेख यांनी बहुजनांच्या शिक्षणासाठी आयुष्यभर खस्ता खाल्ल्या, लहुजी वस्ताद यांनी याकामी त्यांना साथ दिली. इंग्रज अधिकारी हंटर यांना म. फुले यांनी बहुजनांमध्ये शिक्षणप्रसार व्हावा म्हणून सरकारने पुढाकार घेऊन मदत केली पाहिजे, यासाठी दिलेले निवेदन महत्त्वाचे आहे. त्यांनी बहुजन समाजालाही ठणकावून सांगितले, की बाबांनो, शिक्षणाला महत्त्व द्या, दारूपायी संसाराची धुळधाण करू नका, खोट्या प्रतिष्ठेसाठी, खोट्या बडेजावासाठी फुकट खर्च करू नका, असा खर्च वाचवा आणि पोरापोरींचे शिक्षण चालू ठेवा. त्यांचा एक अखंड आहे,

**थोडे दिन तरी मद्य वर्ज करा,**
**तोच पैसा भरा ग्रंथासाठी!**
**ग्रंथ वाचिताना मनी शोध करा,**
**देऊ नका थारा वैरभावा!**

ग्रंथ वाचण्याचा सल्ला देताना म. फुले सावध आहेत. त्या काळातील बहुतेक ग्रंथ उच्च वर्णीयांनी लिहिलेले असल्याने त्यात भाकडकथा, मिथके वापरून जातीआधारित विषमतेचे, स्त्री-पुरुष विषमतेचे समर्थन केलेले होते. त्यामुळे ग्रंथ वाचताना आपलं मन जागं ठेवा, आपला विवेक जागा ठेवा आणि कुठल्याही प्रकारच्या वैरभावाला, द्वेषाला थारा देऊ नका, असं ते आवर्जून सांगतात.

**विद्येविना मती गेली,**
**मतीविना गती गेली,**
**गतीविना वित्त गेले,**
**वित्ताविना शुद्र खचले,**
**एवढे अनर्थ एका अविद्येने केले**

ही त्यांची भूमिका शिक्षणाला ते किती महत्त्व देत होते हे स्पष्ट करणारी आहे.

महात्मा फुले यांनी अशा अनेक अखंडांची रचना केलेली आहे. त्यांनी रचलेल्या अखंडांमधून त्यांच्या विचारांचा जर आपण आढावा घेतला, तर आपल्याला त्याच्यात काही सूत्र दिसतात. पहिलं म्हणजे जन्माच्या आधारे सर्व माणसे समान असतात. जन्माच्या आधारे कुणी छोटा नसतो, कुणी मोठा नसतो आणि त्यामुळे केवळ जन्माच्या आधारे माणसांमाणसांमध्ये कुठल्याही प्रकारचा भेदभाव केला जाऊ नये. सर्व माणसांमध्ये काही ना काही एक कौशल्य लपलेलं असतं आणि समाजामधील प्रत्येक व्यक्तीला आपल्या अंतरंगात लपलेलं हे कौशल्य विकसित करण्याची संधी मिळाली पाहिजे आणि त्यातूनच प्रत्येकाला आपलं जीवन आनंदी बनवता आलं पाहिजे. प्रत्येकाला आनंदी बनण्याचा अधिकार आहे. सुखाने जगण्याचा अधिकार आहे, हा त्यांच्या विचारांचा महत्त्वाचा धागा आपल्याला दिसतो. महात्मा फुल्यांनी यासाठी शिक्षण हे फार महत्त्वाचे साधन मानलेले आहे.

शिक्षण सर्वांपर्यंत पोहोचलं पाहिजे. कारण शिक्षणामधूनच आपल्यातल्या सुप्त क्षमता विकसित करण्याची संधी मिळते. म्हणून त्यांनी स्त्रिया आणि शूद्र समाजातील मुली-मुलांसाठी शाळा काढल्या. शाळा सुरू करणे हे काम आजच्याइतकं त्या काळात सोपं नव्हतं. धर्मव्यवस्थेचा समाजावर पगडा होता. पुरोहितशाहीचा समाजावर पगडा होता आणि धर्म व्यवस्थेचे कायदे सातत्याने असं सांगत होते, की स्त्री, शूद्रातिशूद्रांना शिक्षणाचा अधिकार नाही. त्यामुळे धर्मसत्तेच्या विरोधात जाऊन, पुरोहितशाहीच्या विरोधात जाऊन शिक्षणाच्या प्रसाराचं काम करणं हा अवघड असा वसा महात्मा फुले, सावित्रीबाई फुले त्यांना मदत करणारे लहुजी वस्ताद, फातिमा शेख या सर्वांनी त्या काळात पुढे नेला. महात्मा फुले यांच्या विचारांचा आणखी एक वेगळा पैलू असा दिसतो, की स्वर्ग आणि नरक या भ्रामक कल्पना आहेत. पाप-पुण्य हेसुद्धा समाजामध्ये सत्ता ज्यांच्या हातात आहे त्यांनी रुजवलेला भ्रम आहे. पाप-पुण्याच्या दहशतीने, स्वर्ग-नरकाच्या भीतीने माणसाने आपल्या आयुष्याचे कुठलेही निर्णय करू नयेत. पुरोहित कर्मकांड करायला लावतात ते कर्मकांड निरर्थक आहेत, विज्ञानाच्या कसोटीवर न उतरणारी आहेत. कष्टाची कामे करावी न लागता पुरोहितांच्या पोटापाण्याची सोय होते, यापलीकडे या कर्मकांडाचा आपल्याला काही उपयोग नाही, ही भूमिका म. फुले यांनी जोरकसपणे घेतलेली दिसते. श्रमाची प्रतिष्ठा हे एक मूल्य म. फुले यांच्या कामामधून सतत समोर येताना आपल्याला दिसतं.

एकुणात म. फुले यांनी आपल्याला आनंदी जगण्याचा मार्ग दाखवला आहे. आपल्या आनंदी जगण्याच्या आड येणारे अडथळे निर्धाराने दूर करण्याचा, टाळण्याचा सल्ला आपल्याला दिला आहे. म. फुले यांच्या जयंतीदिनी एवढेच म्हणू या, की

**सत्यशोधक बनू या**
**आणि आनंदी जगूया!** ●●●

**(लेखक ज्येष्ठ समाजवादी कार्यकर्ते आहेत.)**


# महाराजा सयाजीराव आणि भारताचा स्वातंत्र्य लढा



सुरक्षा घोंगडे

**भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवातील एक गौरवशाली घटना म्हणजे बडोदा संस्थानचे राजे सयाजीराव गायकवाडयांचे भारताच्या स्वातंत्र्यलढ्याला असणारे योगदान उजेडात आणण्याचे काम बाबा भांड यांच्याकडून होत आहे. बाबा भांड यांच्या या संशोधनातून 'सार्वभौम महाराजा सयाजीराव'हा मूळ दस्ताऐवजांचा परिचय करून देणारा ग्रंथ तयार झाला आहे. हा ग्रंथ औरंगाबादच्या महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्थेने प्रकाशित केला आहे. ११ ऑगस्ट रोजी औरंगाबाद येथे भालचंद्र नेमाडे यांच्या हस्ते या ग्रंथाचा प्रकाशन समारंभ झाला. या पार्श्वभूमीवर या अज्ञात इतिहासाला उजाळा देण्याचा हा प्रयत्न.**

भारतातील ५६५ संस्थानिकांमध्ये सयाजीराव हे एकटे सार्वभौम राजे होते. १८०२ मध्ये बडोद्याच्या गायकवाडांनी ईस्ट इंडिया कंपनीशी मैत्रीचा करार केला. या तहामुळे बडोदा सरकार इंग्रजांचे मांडलिक न होता मित्र झाले. हाच तहनामा ब्रिटिश सरकारने पुढे स्वीकारला. स्वातंत्र्यासाठीच्या सशस्त्र क्रांतीच्या प्रयत्नाचे केंद्र बडोदा होते. या चळवळीचे सूत्रधार अरविंद घोष हे महाराजांचे खाजगी सचिव होते. बाळ गंगाधर टिळक यांना महाराजांनी पुण्यातील आपला गायकवाडवाडा इंग्रजांच्या डोळ्यात धूळ फेकण्यासाठी कागदोपत्री व्यवहार दाखवून भेट दिला. दादाभाई नौरोजी हे तर बडोद्याचे दिवाण होते. लंडनमधील इंडिया हाऊस बांधण्यासाठी श्यामजी कृष्ण वर्मा यांना महाराजांनी आर्थिक मदत केली होती. गोपाळकृष्ण गोखले, दादाभाई नौरोजी, मादाम कामा, तारकनाथ दास, बिपीन चंद्रपाल, दिनशा वाच्छा, बॅ. विनायक सावरकर, बाबाराव सावरकर इत्यादी लोकांना सयाजीरावांनी आर्थिक साहाय्य केले होते. भगतसिंग, सुखदेव, राजगुरू हे क्रांतिकारक बडोद्यात आश्रयाला आल्याचे पुरावे सापडतात. तर जवाहरलाल नेहरू लंडनमध्ये शिकत असताना रात्री १ वाजता गुप्तपणे सयाजीरावांना भेटल्याचे संदर्भ नेहरू समग्र वाङ्मयात सापडतात. यावरून दादाभाई नौरोजी ते पंडित नेहरू या स्वातंत्र्यलढ्याच्या प्रदीर्घ पटावरील सयाजीरावांचा प्रभाव अधोरेखित होतो.




जानेवारी १८८५ ला 'मुंबई प्रेसिडेन्सी असोसिएशन'ची स्थापना करण्यात आली. फिरोजशहा मेहता, बहरुद्दीन तैय्यबजी, दिनशा वाच्छा हे संस्थापक सदस्य होते. पुढे डिसेंबर १८८५ मध्ये अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना झाली. या दोन्ही संस्थांच्या सदस्यांशी व पदाधिकाऱ्यांशी सयाजीरावांचे जवळचे संबंध होते. मुंबई प्रेसिडेन्सी असोसिएशनच्या तीन सदस्यांना इंग्लंडला जाण्यासाठी महाराजांनी अडीच हजार रुपयांचे आर्थिक साहाय्य केले होते. सयाजीराव काँग्रेसच्या अनेक अधिवेशनास हजर राहिले होते. सयाजीरावांबरोबरच रावबहादूर माधवलाल नंदलाल, हरिलाल हर्षदराय, अब्बास तैय्यबजी, सुमंत मेहता, मोहनलाल पंड्या आणि दिवाण अंबालाल साकरलाल हे बडोदा संस्थानचे अधिकारीही काँग्रेसच्या अधिवेशनात उत्साहाने भाग घेत.

१८९२ मध्ये अ. भा. राष्ट्रीय काँग्रेस समितीचे कार्यकर्ते दादाभाई नौरोजी हे लिबरल पार्टीचे उमेदवार म्हणून इंग्लंडच्या फिन्सवारी भागातून 'हाउस ऑफ कॉमन्स'च्या निवडणुकीसाठी कॅप्टन एफ. टी. यांच्याविरुद्ध उभे होते. महाराजांनी दादाभाई नौरोजींना निवडणूक खर्चासाठी १५,००० रुपयांची मदत केली. या निवडणुकीत दादाभाई नौरोजी विजयी झाले; परंतु पक्षाने पक्षनिधी म्हणून पुन्हा १५,००० रु. ची मागणी केली. दादाभाई इतकी मोठी रक्कम देऊ शकत नसल्याने पक्ष सदस्यत्व सोडण्याचा निर्णय त्यांनी घेतला. सयाजीरावांना ही बाब कळताच त्यांनी पुन्हा दादाभाईंना १५,००० रु. दिले. सयाजीराव गादीवर येण्यापूर्वी मल्हारराव गायकवाडांच्या कारकिर्दीत दादाभाई नौरोजी हे बडोद्याचे दिवाण होते. तर दादाभाईंचे नातू जाल नौरोजी यांना सयाजीरावांनी बडोदा संस्थानात नोकरी दिली.

१८९५ ला पुण्यात झालेल्या काँग्रेस अधिवेशनाला महाराजांनी २,००० रु. ची मदत केली. १८९७ मध्ये लंडनच्या वेल्बी कमिशनसमोर भारताची बाजू मांडण्यासाठी तीन सदस्यांचे प्रतिनिधी मंडळ पाठवण्याचे ठरले. या सदस्यांमध्ये गोपाळ कृष्ण गोखलेंचादेखील समावेश होता. इंग्लंडला जाण्यापूर्वी गोखलेंनी सयाजीराव महाराजांची भेट घेवून त्यांच्याशी चर्चा केली. यावेळी

महाराजांनी गोखलेंना प्रवास खर्चासाठी २,५०० रु. दिले. १९०२ व १९०६ च्या अहमदाबाद व कलकत्ता येथील काँग्रेस अधिवेशनावेळी काँग्रेसने भरवलेल्या उद्योग व सामाजिक परिषदेचे अध्यक्ष सयाजीराव होते.

स्वातंत्र्याच्या ध्यासाने प्रेरित झालेले सयाजीराव नेहमी क्रांतिकारक राष्ट्रप्रेमी अधिकाऱ्यांच्या शोधात असत. या प्रयत्नांचाच एक भाग म्हणजे प्रसिद्ध बंगाली आय.सी.एस. अधिकारी रमेशचंद्र दत्त यांची बडोद्यात केलेली नेमणूक होय. बंगालमध्ये डिव्हिजनल कमिशनर असणारे श्री. दत्त ब्रिटिश शासनाच्या आर्थिक नीतीचे टीकाकार होते. विनायक दामोदर सावरकरांचे धाकटे बंधू नारायण सावरकर नुकतेच डॉक्टर झाले होते. त्यांची मुंबईत दवाखाना सुरू करण्याची इच्छा होती. या काळात सावरकर अंदमान येथे कैदेत होते. सावरकरांनी अंदमानहून आपल्या भावाला पत्र लिहून कळविले, की ''तू बडोद्यास जा. तेथे प्रज्ञावान आणि देशप्रेमी राजा राज्य करत आहे.''

सयाजीराव लंडनमध्ये असताना हाइड पार्कमध्ये श्यामजी कृष्ण वर्मांसोबत फिरायला जात. श्यामजींच्या मनात असणारे राष्ट्रप्रेम आणि स्वातंत्र्य प्राप्तीचा ध्यास यामुळे सयाजीराव त्यांना मदत करू लागले. लंडनमध्येच सयाजीरावांच्या मादाम कामा, तारकनाथ दास, बिपीनचंद्र पाल या क्रांतीकारकांशी भेटी होत गेल्या. अरविंद घोष तर महाराजांचे प्रायव्हेट सेक्रेटरी होते. महाराजांचा या क्रांतीकारकांशी असणारा संपर्क आणि त्यांना केली जाणारी मदत ब्रिटिश सरकारपासून लपून राहिली नाही. यासंदर्भातील महाराजांविरुद्धचे अहवाल वरिष्ठांकडे जाऊ लागले. यावर उपाय म्हणून ब्रिटिश सरकारने सयाजीरावांविरुद्ध ब्रिटिश गुप्तहेरांची नेमणूक करून त्यांच्यावर भारतात आणि परदेश प्रवासात नजर ठेवणे सुरू केले.

१९०२ मध्ये विवेकानंदांच्या शिष्या भगिनी निवेदिता यांनी बडोद्यास भेट दिली होती. भगिनी निवेदिता या तत्कालीन भारतातील महत्त्वाच्या क्रांतिकारी नेत्यांपैकी एक होत्या. त्यांचे स्वागत करण्यासाठी बडोदा रेल्वे स्टेशनवर अरविंद घोष आणि खासेराव जाधव हजर होते. भगिनी निवेदिता यांची राहण्याची व्यवस्था महाराजांच्या गेस्ट हाउसवर करण्यात आली. दुसऱ्या दिवशी त्यांनी महाराजांची भेट घेतली. भगिनी निवेदिता यांचे बडोद्यात जाहीर भाषणही झाले.

१ जानेवारी १९०३ ला इंग्लंडचे बादशहा पंचम जॉर्ज यांच्या राज्यारोहनानिमित्त तत्कालीन व्हाईसरॉय लॉर्ड कर्झन यांनी दिल्लीमध्ये दरबाराचे आयोजन केले होते. प्रत्येक संस्थानिकाने या दरबाराच्या अगोदर होणारी मिरवणूक आणि दरबार या दोन्ही कार्यक्रमांना हजर राहावे असे आदेश कर्झन यांनी काढले; परंतु सयाजीरावांनी दरबारापूर्वी होणाऱ्या मिरवणुकीत हजर राहण्यास जाणीवपूर्वक असमर्थता दर्शविली. याचे कारण म्हणजे आदल्या दिवशी हत्तीवरून कर्झन आणि देशी राजांच्या निघणाऱ्या मिरवणुकीत बॉम्ब फेकून कर्झन यांची हत्या करण्याची योजना क्रांतिकारकांनी आखली होती. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी दामू अण्णा जोशींना पुण्याहून दिल्लीला पाठविले होते. या योजनेमागे अरविंद घोष आणि बाळ गंगाधर टिळक होते; परंतु काही करणात्सव बॉम्ब फेकण्याची ही योजना कार्यान्वित होऊ शकली नाही.

मिरवणुकीतील सयाजीरावांच्या गैरहजेरीची चर्चा संपूर्ण दिल्लीत सुरू झाली. दरबाराच्या दिवशी प्रकृती अस्वास्थ्याने बेचैन सयाजीराव दरबारात पोहोचले. व्हॉइसराय लॉर्ड हार्डिंग्ज यांच्या स्वागत पर भाषणानंतर बादशहा पंचम जॉर्ज यांना मुजरा करण्याचा कार्यक्रम सुरू झाला. हैदराबादच्या निजामांनंतर दुसरा क्रमांक सयाजीराव महाराजांचा होता. बादशहा पंचम जॉर्ज समोर मुजरा केल्यानंतर महाराज दोन पावले मागे येऊन वळले आणि जागेवर परतले. सयाजीरावांच्या मुजऱ्याची ही पद्धत दरबारी रीतीला धरून नव्हती.

दिल्ली दरबारातील सयाजीरावांच्या वर्तनामुळे अनेक वृत्तपत्रांनी त्यांच्याविरुद्ध मजकूर छापायला सुरुवात केली. सयाजीरावांचे मुजरा प्रकरण सर्वत्र गाजू लागले. नामदार गोखल्यांनी प्रकरण गंभीर होत असल्याची सूचना करून जाहीर माफी मागून प्रकरण मिटवण्याची विनंती सयाजीरावांना केली. अखेर स्वत:च्या इच्छेविरुद्ध महाराजांनी माफीपत्रावर सही केली; परंतु महाराजांच्या या निर्णयावर वेगवेगळ्या वर्तमानपत्रांमध्ये उलटसुलट प्रतिक्रिया छापून आल्या. यावर महाराज म्हणाले, ''स्वत:ची बुद्धी गहाण टाकून केवळ दुसऱ्यांच्या आग्रहास्तव या जन्मात मी एक कृत्य केले. ते म्हणजे दिल्ली दरबाराच्या माफीचे होय. गोखल्यांसारख्यांची भीड मला मोडवली नाही, म्हणून मी गोत्यात आलो.''

१८९२ ला अरविंद घोष या तरुण क्रांतिकारकांची लंडन येथे महाराजांशी भेट झाली. १८९३ मध्ये अरविंद घोष बडोद्यात आले. अरविंद घोष यांचे बडोद्यात येणे आणि जहालमतवादी चळवळीला गती मिळणे तसेच अरविंद घोष यांच्या कामाला सयाजीरावांनी मूक पाठींबा देणे या बाबी ब्रिटीश सरकारला खटकत होत्या. सयाजीराव आणि ब्रिटीश यांच्यातील संघर्षाला अरविंदांच्या मार्गदर्शनाखालील क्रांतिकारक कारवाया तीव्र करणाऱ्या ठरल्या. खासेराव आणि अरविंद घोषांनी महाराजांच्या सहकार्याने बडोद्यात एक महत्त्वाची क्रांतिकारी घटना घडवून आणली. खासेरावांचे लहान बंधू माधवराव जाधव हे बडोदा सैन्यात मेजर होते. माधवरावांना स्विस सैनिकी प्रशिक्षणासाठी स्वित्झर्लंडला पाठविण्याची योजना बाळ गंगाधर टिळक, अरविंद घोष आणि खासेराव जाधवांनी तयार केली. स्विस अकादमीतील अधिकाऱ्यांना बडोद्यात बोलावून देशी सेनेला प्रशिक्षण देण्याची सयाजीरावांची प्रबळ इच्छा होती; परंतु तत्कालीन रेसिडेंट आणि लॉर्ड कर्झन यांच्या तीव्र विरोधामुळे ती पूर्ण होऊ शकली नसली तरी माधवरावांच्या माध्यमातून सयाजीरावांची ही इच्छा पूर्णत्वास आली असे म्हणता येईल.

नवीन शस्त्रांचा अभ्यास करणे, बॉम्ब बनविण्याचे प्रशिक्षण घेणे हा या प्रशिक्षणाचा मुख्य हेतू होता. या प्रशिक्षणासाठी सयाजीरावांनी माधवरावांना रजा मंजूर करून प्रशिक्षणाच्या खर्चाची तरतूदही केली. त्याचबरोबर बाळ गंगाधर टिळकांनी लंडनमधील क्रांतिकारी श्यामजी कृष्ण वर्मा यांना पत्र लिहून माधवरावांना प्रशिक्षण काळात पैसे कमी पडल्यास मदत करण्यास सांगितले. माधवरावांनी प्रशिक्षण पूर्ण करून येताना बरोबर सैनिकी व्यवस्थापनाची सुमारे दोनशे पुस्तके आणली. प्रशिक्षण घेऊन परत आल्यानंतर माधवरावांनी बडोद्यात विश्वासू अधिकाऱ्यांच्या मदतीने क्रांतिकारकांना प्रशिक्षण देण्याचे केंद्र सुरू करण्याची योजना अरविंद घोष आणि खासेरावांनी आखली.

ब्रिटीशांच्या शेतकरी विरोधी धोरणावर टीका करणाऱ्या ग्रंथाच्या प्रकाशनासाठी १८८३ मध्ये सयाजीरावांनी आर्थिक मदत केली होती. विशेष म्हणजे फुलेंचे सहकारी नारायण लोखंडे यांनी ब्रिटीशांवरील टीकेमुळे या ग्रंथाचे दीनबंधूमधून होत असलेले क्रमशः प्रकाशन थांबविले होते. वर्तमानपत्रे, मासिके आणि विविध पुस्तके यांच्या माध्यमातून राजद्रोही लेखन करून सर्वसामान्यांमध्ये ब्रिटिश सत्तेविरुद्ध असंतोष निर्माण करणाऱ्या लेखकांना सयाजीरावांचे असणारे भक्कम पाठबळ समजून घेण्यासाठी नोव्हेंबर १९११ मध्ये गव्हर्नर जनरल लॉर्ड हार्डिंग्ज यांनी परराष्ट्र खात्याच्या सचिवांकडे सादर केलेले सयाजीराव महाराजांविरुद्धचे आरोपपत्र दाखल केले.

सयाजीराव संस्थानातील राजद्रोही गोष्टींवर कोणतीही कारवाई करत नसल्याने ब्रिटिश सरकारने संस्थानात हस्तक्षेप करायला सुरुवात केली. ब्रिटीशांनी भारतातील वेगवेगळ्या ठिकाणी १६७ देशद्रोही ग्रंथ आणि पुस्तिका जप्त केल्या. या पुस्तकांमधील स्फोटक मजकूर तरुणांना ब्रिटिश सरकारविरुद्ध भडकावण्याचे काम करत असल्याचा आरोप ब्रिटीश सरकारने केला. विशेष बाब म्हणजे यापैकी १७ पुस्तिका बडोद्यातील प्रेसमध्ये छापलेल्या होत्या. अरविंद घोष यांच्या "Which way Freedom?' या इंग्रजी पुस्तकाचा 'वनस्पती नी दवाओं' या नावाने गुजराती अनुवाद केला होता. या पुस्तकात क्रांतिकारकांसाठी काही सूत्रे दिली होती. त्यातील एक सूत्र, To slay white officials is a merit, not a sin. म्हणजे, 'गोऱ्या अधिकाऱ्यास मारणे हे पाप नाही, तर ते एक पुण्यकर्म आहे.' ब्रिटिश सीआयडी अधिकारी व्हिंसेंट यांनी या पुस्तकाच्या काही प्रती बॅ. केशवराव देशपांडे राहत होते त्या बंगल्याच्या शेजारच्या विहीरीतून जप्त केल्या.

आधुनिक भारताच्या इतिहास लेखनात ज्यांनी जागतिक दबदबा निर्माण केला असे बिपीन चंद्र, सुमित सरकार, रणजीत गुहा, रामचंद्र गुहा यांसारख्या दिग्गज इतिहासकारांच्या इतिहास लेखनातसुद्धा सयाजीराव गायकवाड या नावाचा साधा उल्लेखसुद्धा ज्यावेळी होताना दिसत नाही तेव्हा आधुनिक भारताच्या इतिहास लेखनाच्या प्रचंड मर्यादा समोर येतात. मध्ययुगीन कालखंडात अर्ध्या भारतावर आपले राज्य निर्माण करून दिल्लीच्या तख्ताला निर्णायक हादरे देणाऱ्या शिवरायांचे अपूर्ण कामच जणू सयाजीराव पूर्ण करत होते हे सयाजीरावांनी स्वातंत्र्य चळवळीला लागेल ती मदत देऊन सिद्ध केले आहे. अस्सल पुराव्यांचा आग्रह धरणारी इतिहासकारांची जमात जेव्हा सयाजीरावांसंदर्भातील हजारो कागदांकडे दुर्लक्ष करून भारतीय स्वातंत्र्याची क्रांतीगाथा लिहितात तेव्हा या क्रांतीगाथेचा अपुरेपणा स्पष्टपणे पुढे येतो. लंडनच्या इंडिया हाउसमध्ये आजही सयाजीरावांसंदर्भातील १५० गोपनीय फायली इतिहासकारांची वाट पाहत आहेत. जेव्हा या फायलींच्या आधारे स्वातंत्र्य चळवळीतील सयाजीरावांच्या योगदानाचा शोध घेतला जाईल तेव्हा या महान देशभक्ताच्या स्वातंत्र्य समर्पणापुढे अखखा देश नतमस्तक होईल.

**(लेखिका सयाजी संशोधन प्रकल्प (वारणानगर) येथे कार्यरत आहेत.)**


समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी

पाक्षिक समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी
द पीपल्स पोस्ट



www.peoplespost.in

डिजीटल स्वरुपात!

नवे लेख, नवी सदरे, नवा अंक याशिवाय दैनंदिन विषयांवर नामवंत साहित्यिक, लेखक, विचारवंत यांचे भाष्य!

# सरकारी शाळा निघाल्या भांडवलशाहीच्या दावणीला




महाराष्ट्रातील सर्व सरकारी शाळा आता भांडवलशाहीच्या दावणीला बांधल्या जाणार आहेत, यामध्ये आता काही आश्चर्य राहिलेले नाही. पाच सप्टेंबर शिक्षण दिनी आपल्या शिक्षण मंत्र्यांनी याबाबत सूतोवाच करून ठेवले आहे. जणू काही शिक्षक आणि समाजाला भेट दिली असे त्यांना वाटले असावे. शिक्षणावर आणि राज्यावर होणारा खर्च आटोक्यात आणण्यासाठी कंत्राटी पद्धतीने शिक्षक भरले जाणार आहेत. त्यासाठी नऊ पॅनलना मान्यता देण्यात आली आहे. कंत्राटी शिक्षक याचा अर्थ सरकारी शाळांवर खाजगी शिक्षक असाच होतो. राज्यात खर्च वाढला, की पहिली कात्री चालते ती शिक्षणावर. मुळातच अन्य गरीब देशांच्या तुलनेने आपला शिक्षणावरचा खर्च कमी आहे. अन्य गोष्टींवरचा खर्च अफाट आहे. त्याला कात्री लावण्याऐवजी शिक्षण, समाज कल्याण, आदिवासी कल्याण यांच्यावर होणारा खर्च रोखला जातो. एकीकडे विनाअनुदानित शाळांत वेठबिगार शिक्षक आणि आता कंत्राटी शिक्षक असा प्रयोग करत शिक्षणाची जणू काही वाट लावण्याचा विडा सरकारने उचललेला दिसतो. कंत्राटी शिक्षक कसे आणि काय शिकवतील आणि त्यांना सेवाशाश्वती कोण आणि कशी देईल, हाही एक प्रश्न उरतोच. कायम आणि पूर्णपगारी शिक्षक असतानाही पाचवीच्या पोरांना जोडाक्षरे येत नाहीत, पाडे येत नाहीत हे सांगताना सरकारला काही लाज वाटलेली नाही.

सरकारी शाळा वेगवेगळ्या नावाने खाजगी क्षेत्राला हस्तांतर करण्याची प्रक्रिया कधीच सुरू झाली आहे. विकासाच्या नावाखाली हे केले जाते. त्यामुळे विरोध होत नाही. जे सेवेत आहेत ते कधी या धोरणाला विरोध करत नाहीत. आपली नोकरी आणि पेन्शन कायम आहे आणि आपली पोरे चांगल्या खाजगी शाळांमध्ये जातात, मग विरोध करण्याचे कारण काय, या भ्रमात हे 'कायम'वाले आहेत. आपल्यालाही फटका बसणार आहे हे यांना कळत नाही. एकीकडे खाजगीकरणाचा बुलडोझर शिक्षण क्षेत्रातही मस्तपणे फिरतो आहे आणि दुसरीकडे, खाजगी क्षेत्राच्या थेट दावणीलाच शाळा बांधण्याचे उघड प्रयत्न सुरू आहेत. दहा वर्षांसाठी सरकारी शाळा महाकाय उद्योग समूह म्हणजे टाटा, बिर्ला, अंबानी, अदानी किंवा स्वयंसेवी संस्थांना दत्तक दिल्या जातील. या संस्था आपले नावही शाळांच्या मूळ नावापुढे जोडतील. समाजहितासाठी करावयाच्या खर्चातील काही भाग ते या शाळांकडे देतील. थोडथोडक्या नव्हे तर बासष्ट हजार शाळा खासगी क्षेत्राच्या जबड्यात घुसवल्या जाणार आहेत. प्रचंड खर्च करून दत्तक घेतलेली ही सरकारी बाळे उद्योगपती परत करतील अशी आशा करणे केवळ भाबडेपणाचे ठरावे. कोणीही शहाण्या माणसाने विचार केला, की त्याला एक गोष्ट कळेल आणि ती म्हणजे शाळा विकण्याचा हा छुपा धंदा आहे. अशा शाळा एक तर उद्योजक घेतील किंवा स्वयंसेवी संस्था चालवणारे पुढारी घेतील. पुढाऱ्यांपैकी ऐंशी टक्के जणांच्या खाजगी किंवा स्वयंसेवी संस्था आहेत. स्वतःच निर्णय तयार करायचा आणि स्वतःच त्याचे लाभार्थी व्हायचे, असा हा लोकसेवेच्या नावाखाली तयार झालेला फंडा

आहे. महाराष्ट्रात जेवढ्या मोठ्या शिक्षण संस्था किंवा हब आहेत त्या पुढाऱ्यांच्याच आहेत, हे वेगळे सांगायला नको. सिमेंट विकणारे, तंबाखू विकणारे, बांधकाम करणारे आणि देशसेवेच्या नावाखाली राजकारणात गेलेल्या अनेक जणांनी शिक्षण क्षेत्रात आपले साम्राज्य उभे केले आहे. आता कोणी समाजसेवा म्हणून शिक्षणात येणारे फुले, शाहू, आंबेडकर किंवा कर्मवीर राहिलेले नाहीत. शिक्षण म्हणजे एक दुभती गाय, पहिल्या धारेची कमाई म्हणून शिक्षणाचा उद्योग चालवणाऱ्यांची संख्या वाढली आहे. आता त्यांच्याच दावणीला सरकारी शाळा बांधल्या जाणार आहेत. खरे म्हणजे, सरकारी शाळांत विद्यार्थ्यांवर दरडोई गुंतवणूक खासगीपेक्षा अधिक आहे. गुणवत्तेच्या बाबतीत मात्र खाजगी शाळा सिलिकॉन व्हॅलीकडे निघाल्या आहेत, तर आपल्या शाळा अजून डोंगरावरची झाडे मोजत आहेत. सर्व आदर्श शिक्षक सरकारी शाळेतून बाहेर पडतात, शिक्षण आमच्या हक्काचं हा प्रयोग सरकारी शाळेतच होतो. खिचडीपासून चड्डीपर्यंत आणि पुस्तकांपासून सायकलीपर्यंत सर्व काही मोफत वाटण्याचा कार्यक्रम येथेच होतो. मग गुणवत्ता तळालाच का चिकटते आणि कोणीही सरकारी माणूस आपली मुले सरकारी शाळेत का पाठवत नाही? त्यांना ठाऊक आहे, की सरकारी शाळेत आपली पोरे मठ्ठ होतील, मागे पडतील. जे जे सरकारी आहे ते निकृष्टच अशी भावना त्यांच्या मनात तयार झाली आहे. सरकारी शाळा असोत, दवाखाने असोत, बस असोत, या सर्वांवरची विश्वासार्हता आटत चालली आहे. सरकारी कर्मचारी आणि त्यातही सर्व शिक्षक ज्या दिवशी आपल्या मुलांना सरकारी शाळांत टाकतील, त्या दिवशी शेअर बाजारात निर्देशांक उसळून येतो तशी गुणवत्ता उसळून येईल. ज्या दिवशी प्रशासनातले पांढरे हत्ती आणि मंत्री उपचारासाठी शासकीय रुग्णालयात जातील त्या दिवशी रुग्णालये सुधारतील. ज्या दिवशी हे सारे बाबू एस.टी.ने प्रवास करतील त्या दिवशी एस.टी.ची गळती बंद होईल. पण हे होणे तूर्त तरी शक्य नाही. कारण सर्व शासकीय कर्मचारी सेवकाऐवजी मालकाच्या भूमिकेत जातात, हा खरा मुद्दा आहे. एकूणच व्यवस्था सडायला लागलीय. विकृतीचा गंज तिला चढायला लागलाय. गंज भारी असतो. मी मी म्हणणाऱ्या गोष्टी तो खाऊन टाकतो. खाजगीकरणात भांडवलशाही लठ्ठ करायची असते आणि ती लठ्ठ होण्यासाठी महत्त्वाचे, पैसा देणारे उपक्रम तिला विकावे लागतात. गेल्या काही वर्षांपासून रस्ते, विमान, जहाज, दवाखाने, गॅस असे किती उपक्रम सरकारने विकले आहेत, थोडा विचार करा. आता पाळी आहे 'स्कूल चले हम' असे म्हणणाऱ्या पोरांची आणि त्यांच्या गरीब पालकांची. कोणी रोखणार आहे या प्रक्रियेला? एकच घटक रोखू शकतो आणि तो म्हणजे शिक्षक-विद्यार्थी-पालक! व्यवस्थेनं यांनाही फितूर केल्याने आणि शिक्षकांना पगारवाढीत, बदली-बढतीत अडकवल्यामुळे त्यांचा बोन्साय झालाय. ते फळे कसे देतील! लवकरच हे सारे शिक्षक 'एक होती सरकारी शाळा' असा विषय निबंधलेखनासाठी विद्यार्थ्यांना देतील, यात कोणी शंका बाळगण्याचे कारण नाही.

खाजगीकरणात कल्याणकारी राष्ट्र खलास होते. ते शर्यतीवर उभे राहते. एक हरणारा आणि एक जिंकणारा असे दोन वर्ग तयार होतात. हरणारे संख्येने मोठे असतात. ते खिचडीतील शेंगदाणे शोधण्यातच अडकून पडतात आणि जिंकणारे जे बहुतेक शिक्षक व नोकरदारांची बालके असतात, ते भरारी घेतात. त्यांनाच मोठे पॅकेज मिळते आणि खिचडीतल्या पोरांना स्किल इंडियात ढकलले जाते. महाराष्ट्रात बंडखोरांनी सरकार स्थापन केले आहे. आपल्या बंडाचे समर्थन करताना त्यांनी काय काय आश्वासने दिली होती आणि बंडाच्या पायावर किती छान वस्त्रे घातली होती, हेही थोडे आठवा. महाराष्ट्र पुरोगामी करणार, बलवान करणार, सरकार लोकांच्या दारी जाणार, जे कोणी आंदोलने करतील त्यांच्याकडे प्रश्न सोडवण्यासाठी नव्हे, तर तडजोडीसाठी शिष्टमंडळे पाठवणार अशी किती तरी आश्वासने होती. पण त्याचबरोबर सरकारी शाळा विकणार, कंत्राट संस्कृती स्वीकारणार ही लपवलेली आश्वासने आता बाहेर पडत आहेत. जनतेच्या दारात जाऊन हा विषय आणि त्याचे पदर उलगडून सांगण्याचा प्रयत्न करावा म्हणजे काय होते ते कळेल. जेथे प्रशासनातील पांढरे हत्ती आणि राजकारणातील तांबडे हत्ती यांची मिलीजुली होते तेथे असेच घडते. पगारवाढीसाठी पांढरे हत्ती अशा आयडिया काढून त्या पुढाऱ्यांसमोर ठेवतात. या सामाजिक कार्यासाठी त्यांना बढती मिळते. खर्चात कपात करण्यासाठी कोणी लोकप्रतिनिधी, कोणी मंत्री, कोणी पांढरे हत्ती आपल्या सवलतींना कात्री लावायला तयार असत नाहीत. त्याऐवजी लोकांच्या तोंडातील घासाचा आकार कमी कसा करता येईल, याविषयी ब्रेन स्टॉर्मिंगचे वर्ग घेतले जातात. खरे तर, या सर्वांची किंमत लोकशाही मोजत होती. सर्वसामान्यांचा तिच्यावरील विश्वास डळमळीत व्हायला लागतो. एकीकडे प्रशासन आणि राजकारणातील गलेलठ्ठ पांढरे हत्ती आणि दुसरीकडे, कुपोषित जनता अशा जोड्या घेऊन लोकशाही बळकट करता येत नाही. एकीकडे, ईडी काही जणांच्या मागे लागून खोऱ्याने पैसे जमा करते आणि दुसरीकडे, कर्जबाजारीपण पचत नाही म्हणून आत्महत्या, एकीकडे इंटरनॅशनल शाळा आणि दुसरीकडे मध्येच गळणारे आणि शहरात फूटपाथवर गर्दी करणारे विद्यार्थी असे चित्र फुले-शाहू-आंबेडकर यांच्या महाराष्ट्रात असूच शकत नाही; पण ते आहे. ते कसे बदलायचे आणि कुणी बदलायचे हा देवळासमोरच्या झाडावर लटकलेल्या वटवाघुळासारखा प्रश्न आहे. खाजगीकरण प्रश्न वाढवत नेते आणि सरकार नावाची संस्था मौनात जाते. लोकप्रिय राजकारणासाठी ती काही चिकटपट्ट्या तयारही करते. पण त्या पावसाअगोदरच गळून पडत असतात. लोक जोपर्यंत विचार करत नाहीत, तोपर्यंत लोकशाहीच्या नावानं चांगभलं चालूच राहील. पुढाऱ्याला विमानानं उपचारासाठी नेलं जाईल आणि डोलीतून उपचारासाठी निघणारी आदिवासी महिला मध्येच कचकेल.

# मध्य प्रदेशातील गाईंचे रोज 'रस्ता रोको' आंदोलन

हिंदुत्वाची आणखी एक प्रयोगशाळा म्हणून मध्य प्रदेशाकडं पाहिलं जातंय. एक दोन नव्हे, तर पंधरा वर्षांपासून शिवराज तेथे मुख्यमंत्री आहेत आणि येणारी पाच वर्षे आपणच या खुर्चीत राहू असं त्यांना त्यांच्यातील मामा सांगतोय. मध्य प्रदेशात त्यांची ओळख, त्यांचं टोपणनाव 'मामा' असे आहे.




याच राज्यातील विधिमंडळाने गाईला राष्ट्रमाता असा किताब दिला. अर्थात, असा किताब गायांना कळत नसतो, तर त्यांच्या नावानं राजकारण करणाऱ्या नेत्यांनाच कळत असतो. शिवराज यांचे भगवे राजकारण गायकेंद्रित आहे. सर्व कोट्यवधी देवांचा मुक्काम गाईमध्येच असतो आणि मानवी जीवनात विकास गाईमुळेच होतो, असं एक सनातन सत्य शिवराज यांनी आपल्या राजकारणात मुख्य बनवलं. राज्यातील दारिद्र्य संपवण्यासाठी गरिबांना मोफत गाई देण्याची कल्याणकारी योजना सुरू झाली. ज्यांच्याकडे गाय बांधायला जागा नाही, त्यांनाही ती देण्यात आली. गाईसाठी मोफत किंवा सबसिडीद्वारे वैरण देण्याची योजना सुरू झाली. दूध जमा करण्यासाठी सोसायट्या सुरू झाल्या. गाईचे मुत्र अमृताची जागा घेत असते असे सांगत मुत्र विकत घेण्याची आणि त्याचे संकलन करण्याची योजना सुरू करण्यात आली. शेण विकत घेण्यासाठी व्यवस्था करण्यात आली. नंतर दर्जा आणि संरक्षणाचा प्रश्न आला. तिला देवीचा दर्जा देण्यात आला. तिच्यावर खडे मारणे, तिला त्रास देणे गुन्हा ठरवण्यात आला. गोमांस तर दूरची गोष्ट राहिली. ते विकल्याच्या किंवा खाल्ल्याच्या संशयावरून सर्वात जास्त मॉबलिंचिंग मध्य प्रदेशात झाल्या आहेत. गाईचे पोषण-पालन नीट व्हावे म्हणून शेकडो गोशाळा उभ्या राहिल्या. त्यांना भरपूर अनुदान दिले जाते. गोसेवक उभे राहिले. स्वातंत्र्य सैनिकांप्रमाणे त्यांना मासिक मानधन दिले जाते. नोकरीच्या शोधात असणाऱ्यांना नोकरी मिळत नाही. पण गोसेवक होण्याचे काम हमखास मिळते. रस्त्यावर एखाद्याने गाईला त्रास दिला, वाहनाचा धक्का बसला, तिची अप्रतिष्ठा झाली, की सेवक धावतात आणि तसे करणाऱ्याला बदडून काढतात, दंड बसवतात. तो वसूल करतात. स्वाभाविकच त्यांची आर्थिक स्थिती सुधारायला मदत होते आणि गोरक्षक, धर्मरक्षक अशी त्यांना मान्यता मिळते. मध्य प्रदेशात सर्वात मोठा आणि तरुण बुवा राहतो. तो अशा कार्याला आशीर्वाद देतो. तर कोण होतीस तू आणि काय झालीस तू, असा प्रश्न उपस्थित करता येतो. अर्थात तो गाईच्या बाबतीत. एक गाय करू शकते? राजकारण, समाजकारण, धर्मकारण, अर्थकारण बदलू शकते हे मध्य प्रदेशने सिद्ध करून दाखवले आहे. या प्रयोगाचे पुढचे अंक सुरू आहेत. हिंदूंच्या मतबँका मोठ्या करण्यासाठीही गाईचा वापर न झाल्यास नवल ठरावे.

माता, महामाता, राष्ट्रमाता ठरवण्यात आलेल्या गाई मुक्कामासाठी, विश्रांतीसाठी रस्त्यावरच ठाण मांडतात. जे गोमातेचा प्रचार करतात, ते आपल्या बंगल्यात किंवा फ्लॅटमध्ये गाई पाळू शकत नाही. तसे उदाहरण नागपूरपासून भोपाळपर्यंत आणि काश्मिरी पंडितांपासून ते कन्याकुमारीतील अध्यात्मापर्यंत कुठे सापडणार नाही. मध्य प्रदेशातील काही रस्ते चांगले आहेत. पर्यटनाच्या जागाही खूप आहेत. पण खेड्यापासून शहरापर्यंत कुठेही जा, पन्नास-शंभर मीटरपर्यंत प्रत्येक ठिकाणी स्पीडब्रेकरप्रमाणे गाईंनी ठाण मांडलेले असते. हॉर्नला त्या दाद देत नाहीत. वाहनांनी आवाज वाढवला तरी त्या दाद देत नाहीत. वाहनातून खाली उतरून त्यांना विनंती केली, तरी त्या जागा सोडत नाहीत. त्यांनी जेथे मोकळी जागा सोडली असेल तर तेथून वाहन न्यावे लागते. चुकून गाईला धक्का बसला, थोडे जरी खरचटले, तर गोसेवकांच्या टोळ्या अचानक अवतरतात. मग सुरू होते भांडण. कुणी पावत्या फाडायला लावते, कुणी वाहनांवर दगड मारून नुकसान करतं, कुणी धर्माच्या नावाने घोषणा करतं... वाहनधारक त्रस्त होतात. कारण येथे फक्त गोसेवकांचे राज्य चालते. चिरीमिरी देऊन ते सुटका करून घेतात आणि प्रवासाला लागतात. पण संपूर्ण प्रवासात रस्त्यावर गायांचा कळप नाही असा रस्ता सापडणे कठीण असते. रात्री-अपरात्री अनेकदा वाहनांच्या धक्क्याने गाई मरतात, हेही खरे आहे. त्यावेळी कोणी गोसेवक नसतात. गायांचे मालक आणि गावही झोपलेले असते. किती गाई मेल्या याचा हिशेब कुणाकडे असत नाही. रस्त्यावर ठाण मांडणाऱ्या, रस्ता रोको करणाऱ्या गाई म्हणजे आपले राजकीय आणि धार्मिक वैभव आहे, असे राजकारणी समजतात, तर प्रवासी त्यांना बेकायदेशीर टोलनाके समजतात. समाज कशी विचित्र वाटचाल करत असतो आणि यासाठीच सनातन शब्द कसा वावरत असतो, हेही मध्य प्रदेशात बघायला मिळतं. ●●●

**– तात्या विंचू**

# गांधी

तुझं असणं म्हणजे
सत्वाचं असणं,
तत्त्वाचं असणं,
मानवतेचं असणं.

तसं ते अस्तित्व वेगळंच,
बंदुकीची गोळी लागून
अमर होता येतं
हे सिद्ध करणारं...

चेहऱ्यावर निरागस स्मितहास्य घेऊन
अर्धनग्न फकिराचं

जगावर अबाधित गारुड
शांतता म्हणजे गांधी
आणि सत्य म्हणजेही....

हे समीकरण रूढ आहे...

गांधी?
सत्य!
अहिंसा!

भीती वाटते रे बाबा तुझी अजूनही....
म्हणून

भात्यात शाब्दिक बाण...
लोडेड रिव्हॉल्व्हर...
घेऊनच फिरतोय सदैव...
तुझी हत्या झाल्यापासून

आमचं चलन....
कदाचित चालणार नाही...
पण गांधी चालतोच
जगाच्या कानाकोपऱ्यात....

**– किरण शिवहर डोंगरदिवे**

# सरणावरच पेटणार का?

बिथरणार केव्हा आम्ही
केव्हा चेतणार आहोत रे
मेल्यानंतर सरणावर...
जळून राख झाल्यावर...
संविधान हटवल्यावर...
की वस्त्या आमच्या पेटवल्यावर...

केव्हा पेटणार आहोत रे
लिहिणाऱ्यांचे बोट छाटल्यावर...
गर्भवती माय बहिणीचे
पोट फाडल्यावर...
बोलणाऱ्यांचे ओठ कापल्यावर...
आमच्या नरडीचा घोट घेतल्यावर...
वाघिणीचे दूध गोठवल्यावर...

केव्हा पेटणार आहोत रे
चिमुकल्यांना त्रिशुलावर टांगल्यावर
गुलामगिरी डोक्यावर हागल्यावर..
श्वास कोंडू लागल्यावर...
पार्श्वभागावर दांडू बसल्यावर...
रक्त सांडू लागल्यावर...
सारेच गांडू बनवल्यावर...

केव्हा पेटणार आहोत रे
गाफिल आम्ही अजूनही
वैरी गोड बोलला की
विरघळून जातो आम्ही...
हाता तलवार त्यांच्या
मुंडी आमची उडणार आहे...
तलवार धारी न्यायालयात
सांगा न्याय तुम्हाला मिळणार आहे...

गाईला माता म्हणणारे
आमच्या माय बहिणीचे
चौकात लचके तोडतात...
दगडाला देव माणणारे
माणसांचे मुडदे पाडतात...
आमच्या चित्कारामुळे
त्यांचा सत्कार केला जातो
देशात दररोजच आमचा
वाढतो आकांत आहे
तरीही म्हणतो आम्ही
आमच्याशी लढायला
सांगा कुणाची औकात आहे

क्रांतीसूर्याची पिल्ले आम्ही
छातीठोक सांगतो जगाला
हा केवळ मुखवटा आहे की
बोलण्यातच जोर आहे...
शेपटी घालून सोंगाड्या
घरात जो कायर बसला
मरू द्या नामर्द नेत्याला
तो औलाद नाही बापाची
तो तर हरामखोर आहे...

चाहूल प्रलयाची लागली रे
काळोखाची पकड घट्ट झाली
आता तरी उठा रे...
वैऱ्याचे इरादे मिटवा रे
आपल्या लेकरांच्या सलामतीसाठी
संविधान वाचवा रे..
कायरता झुगारून
अस्तित्वासाठी संगर पेटवा रे...

**– निशांत गुरू**

# नाही असे नाही

समृद्ध झाले त्यातले काही
नाही असे नाही, सत्तेतही आले, कधी नव्हे एवढे
कधीच न आलेले, नाही असे नाही

ही माणसे, सूर्य न पाहिलेली
चमकताहेत, तळपताहेत
त्यातले काही,
नाही असे नाही

तरी प्रवास सारा पुनः
उलटाच का होतो आहे, बघितले होते जे स्वप्न,
ते बघतच तेवढे
राहायला तिथेच परत नेतो आहे

म्हणावे लागते आहे
परत तेच ते गाणे
एक दिवस आपलाही
येईल असेच म्हणावे लागते आहे

आपल्यालाही देईल
श्वास आपला मोकळा
करणार नाही कोणी
कोणाचा अवरूद्ध गळा

झळा त्या
भोगून झालेल्या
पुनः भोगाव्या
लागणार नाहीत

पुनः तीच
निदर्शने
तेच मोर्चे काढावे
लागणार नाहीत

वाटलेले ते
वाटतेच का आहे अजूनही
दाटलेले ते, दाटलेलेच
का आहे अजूनही?

**– श्रीपाद भालचंद्र जोशी**

POSTAL REGISTRATION NO. ABD/492/2022-2024
RNI REG. NO. MAHMAR/2018/76460



# खांब

७२ वर्षांच्या जुन्या मंदिरातील
ते चार खांब पोखरले!
कधीही ढासळेल हा डोलारा
जर वेळीच नाही सावरले!
सगळ्यांना दुसऱ्या क्रमांकाच्या
खांबाची खात्री..!
अगदी आंधळा विश्वास त्याच्यावर
दिवसा आणि रात्री..!
पण त्यालाही लागली कीड
पडला वाळवीच्या भक्षी!
उघड्या डोळ्यांना दिसत नाही
खांबावरील सुंदर तराजूची नक्षी!

पूर्वी चारही खांबांमध्ये
असायची सतत सुंदोपसुंदी!
आता पहिल्या निरंकुश खांबाला
चढलीय सत्तेची धुंदी!
खांबांना माहीत नाही की
त्यांचीच चाळणी होतेय..!
मंदिर कोसळण्याच्या वाटेवर
वाळवीचं राज्य येतंय!
घोर वाटतोय जिवाला
भारताची राजमुद्रा तरी राहील ना?
सारनाथच्या अशोकस्तंभाची
काळजी कुणीतरी वाहील ना?

कि अशोकस्तंभ गायब होऊन
घडणार नाही ना काही अमंगळ?
राजमुद्रेवर येणार नाही ना
पायाशी असलेलं उलटं कमळ?
हे भीमराया! तू ये अल्पकाळ
आणि दिलेले शिल्प वाचव!
तुला झाला असेल राग अनावर
पण आमच्यासाठी पचव!

– रामु सप्रे, मुंबई